सत्यमेव जयते

CPA COMMONWEALTH PARLIAMENTARY ASSOCIATION

अमृत महोत्सव ७५ १९३७-२०१२

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## यांनी भारताच्या घटना समितीसमोर केलेली भाषणे.

(१) मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६

(२) गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८

(३) शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९

संकलक :

**डॉ. अनंत कळसे,**

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तथा

सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,

महाराष्ट्र शाखा.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, नागपूर-०१

डिसेंबर, २०१५.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## यांनी भारताच्या घटना समितीसमोर केलेली भाषणे.

- मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६
- गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८
- शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९


संकलक :

**डॉ. अनंत कळसे,**

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तथा

सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,

महाराष्ट्र शाखा.



**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, नागपूर-०१

डिसेंबर, २०१५.

## प्रस्तावना

भारताच्या घटना समितीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी (१) मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६, (२) गुरुवार, दिनांक ४ नोव्हेंबर १९४८ व (३) शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेल्या तीन ऐतिहासिक भाषणांच्या संदर्भात माझ्या भावना मोजक्या शब्दांत व्यक्त करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

भारताच्या घटना समितीने तयार केलेला आपल्या घटनेचा मसुदा हा आपणा सर्वांसाठी एक पवित्र दस्तऐवज आहे. मसुदा समितीने मंजूर केलेला घटनेचा मसुदा देशाला सादर करतांना डॉ.आंबेडकर म्हणाले होते की *“या घटनेची अंमलबजावणी करणारे नेतृत्व आणि नोकरशहा कशा भावनेने ही घटना अंमलात आणतात आणि आपल्या समोरील महाकाय समस्यांबाबत काय भूमिका स्वीकारतात यावर या घटनेतील संकल्पनांना मूर्त स्वरूप देणे अखेर अवलंबून राहणार आहे.”*

डॉ. आंबेडकरांची ही तीन भाषणे वाचकांना आजही उपयुक्त, उद्‌बोधक आणि मार्गदर्शक वाटेल अशी मला आशा आहे. त्याचप्रमाणे आपल्या राष्ट्राच्या नियतीचा ठेवा असणारा हा अनमोल दस्तऐवज तयार करण्यासाठी विविध नामवंत व्यक्तींनी कसे भगीरथ प्रयत्न केले याचीही आपणांस कल्पना येईल.

महाराष्ट्र विधानपरिषेदेचे मा. सभापती, श्री. रामराजे नाईक-निंबाळकर व महाराष्ट्र विधानसभेचे मा.अध्यक्ष, श्री. हरिभाऊ बागडे यांनी वेळोवेळी अशा प्रकारच्या प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी मला या कार्यात प्रोत्साहन दिलेले आहे, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

या पुस्तिकेत समावेश असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समिती समोर केलेल्या तीन भाषणांपैकी मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ व शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेली ही दोन भाषणे, महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सन २००२ मध्ये प्रकाशित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे या खंडांमधून घेण्यात आली आहेत. याबद्दल मी समितीचा ऋणी आहे. उर्वरित गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजीचे भाषण स्वतंत्ररित्या भाषांतरीत करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली तीन्ही भाषणे भाषांतरीत करतांना इंग्रजी वाक्प्रचार, म्हणी, शब्दार्थांसाठी शक्यतोवर चपखल शब्दयोजना करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात आला असून पुस्तिका पुरेपूर निर्दोष होईल याकडे लक्ष पुरविण्यात आले आहे. तथापि, यामध्ये काही उणीव राहिली असल्यास पुढील आवृत्तीत दूर करण्यात येईल. वाचकांना काही शंका उद्‌भवल्यास घटना समिती संदर्भातील भाषणे भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचा अवश्य अभ्यास करावा.

या पुस्तिकेसंदर्भात विधायक सूचना, सुधारणा यांचे निश्चितच स्वागत केले जाईल.

**विधान भवन**
नागपूर
दिनांक १६ डिसेंबर, २०१५.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय तथा
सचिव, राष्ट्रकुल संसदीय मंडळ,
महाराष्ट्र शाखा.

# भारताचे संविधान (CONSTITUTION OF INDIA)

## उद्देशिका (PREAMBLE)

(दिनांक १ डिसेंबर २००७ रोजीनुसार)

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक [१][ **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** ] घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, वि वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व [२][ राष्ट्राची एकता आणि एकात्मता ] यांचे आश्‍वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा गांभिर्यपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत** आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी **याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.**

---

१. " संविधान (बेचाळिसावी सुधारणा) अधिनियम, १९७६ " कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकूराऐवजी घातले (३ जानेवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

# THE CONSTITUTION OF INDIA

## PREAMBLE

(as on 1st December 2007)

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a [1][ SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC ] and to secure to all its citizens:

**JUSTICE**, social, economic and political;

**LIBERTY** of thought, expression, belief, faith and worship;

**EQUALITY** of status and of opportunity;

and to promote among them all

**FRATERNITY** assuring the dignity of the individual and the [2][ unity and integrity of the Nation ];

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

---

1. Subs. by the Constitiution (Forty-second Amendment) Act, 1976, s.2, for " SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC " (w.e.f. 3rd January 1977).
2. Subs. by s. 2, ibid., for " unity of the nation " (w.e.f. 3rd January 1977).

# राज्यघटनेसंबंधी....

भारतीय राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आल्यानंतर भारतात ख-या अर्थाने संसदीय कामकाज पद्धतीला सुरूवात झाली. संसदीय कार्य पद्धतीचा मूळ गाभा म्हणजे **जनतेचे सार्वभौमत्व** हा आहे. जनतेचे सार्वभौमत्व हे भारतीय संविधानाच्या उद्देशिका/ प्रस्ताविकेमध्ये (Preamble) दृगोचर झालेले आहे.

संसदीय कामकाज पद्धतीच्या अभ्यासकाला राज्यघटनेची प्रस्तावना एका दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. राज्यघटनेच्या उद्देशिकेत संपूर्ण घटनेचे सार अंतर्भूत आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता व दर्जाची समानता ही चतु:सुत्री हा संसदीय लोकशाहीचा गाभा आहे. संविधानातील प्रत्येक तरतुदीचा बारकाईने अभ्यास केल्यास या मूल्यांवर आधुनिक भारतीय समाजरचनेचे जडणघडण झालेले दिसते.

संसदीय लोकशाही कार्यपद्धती आपल्या देशाला नवीन नाही. पुरातन काळात सभा, परिषदा, गणराज्ये अस्तित्वात होतीच. एवढेच नव्हे तर महाभारत काळात सुद्धा मथुरेत असणारी यादवांची सत्ता म्हणजे गणराज्याचा एक उत्कृष्ट नमुनाच होय. याचबरोबर अलेक्झांडर च्या काळात ग्रीस मध्ये नगरराज्य ही संकल्पना अस्तित्वात होती.मौर्य, गुप्त यांच्या साम्राज्यात देखील याचा उगम आपल्याला पहावयास मिळतो.

समाजातील विविध समस्या, तंटे यांचे निवारण गावाच्या चावडीवर पंचाच्या माध्यमातून होत होते. ‘ पाचामुखी परमे वर ’ हा त्या काळातील परवलीचा शब्द होता. मात्र ‘ कायद्याचे राज्य ’ (Rule of Law) ही संकल्पना आपण ब्रिटीशांकडून घेतली आहे. प्राध्यापक ए. व्ही. डायसी या तत्त्ववेत्याने १८८५ साली ही संकल्पना ख-या अर्थाने विकसित केली. कायद्याची सर्वोच्चता, कायद्यापुढे समानता व घटनाधिष्ठीत मूल्यांचे पालन (Supremacy of Law, Equality before Law and Predominance of Legal Spirit) ही त्याची तत्त्वे जगन्मान्य आहेत. ही तत्त्वे आपल्या राज्यघटनेच्या विविध तरतुदींमध्ये प्रकर्षाने आढळून येतात. किंबहुना, कायद्यापुढे समानता व कायद्याचे राज्य ही संसदीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत.

ब्रिटीश संसदेला लोकशाहीची जननी (Mother of Democracy) असे म्हटले जाते. संसदीय लोकशाहीच्या उगमाचा अभ्यास करावयाचा झाल्यास ब्रिटीश प्रथा, परंपरा, राजेशाही, संसदेने राजाविरूद्ध केलेला अधिकारासाठीचा संघर्ष, मॅग्नाकार्टा, वेगवेगळे कायदे याचा तौलानिक अभ्यास करणे गरजेचे आहे.

ब्रिटीश लोकशाहीला फार मोठा इतिहास आहे. ब्रिटीश राज्यघटना अलिखित स्वरूपाची आहे. तथापि, लोकशाहीची पाळेमुळे ब्रिटनमध्ये घट्ट रुजलेली आहेत. ब्रिटनमध्ये सुद्धा लोकशाही ख-या अर्थाने विकसित होण्यासाठी कित्येक शतके उजाडावी लागली. मॅग्नाकार्टा-१२१५, हेबिअस कार्पस कायदा-१६७९, बील ऑफ राईट-१६८९, सेटलमेंट कायदा-१७०१, रिफॉर्म कायदा-१८३२, १८६७, १८८४, म्युनिसिपल कॉर्पोरेशन कायदा-१८७२, ज्युडिकेचर कायदा-१८७३, १८७६, स्थानिक स्वराज्य कायदा-१८८८, १९२९, १९७४, रिप्रेझेंटेशन ऑफ पिपल ॲक्ट-१९१८, समान मतदानाचा १९२८ चा कायदा, स्टॅट्यूट ऑफ वेस्ट मिनिस्टर कायदा, १९३१ इ. महत्त्वाच्या कायद्यांच्या माध्यमातून ब्रिटीश संसदीय पद्धती विकसित झाली.

ब्रिटीश घटनेचे गाढे अभ्यासक प्राध्यापक डब्ल्यू. बी. मुनरो यांनी असे विधान केले आहे की, *“ The British Constitution is a complex amalgam of institutions, principles and practices. It is a composite of Charters and statutes, of judicial decisions, of common law, of prudence usages and traditions. It is not one document but hundreds of them. It is not derived from one source bent from several..... It is a child of wisdom and chance. ”*

भारतीय संसदीय प्रणाली ही ब्रिटीश संसदीय पद्धतीवरुन घेतलेली आहे. ब्रिटीश संसदेचा थोडक्यात मागोवा घेतल्यास असे दिसून येते की, सुमारे १३ व्या शतकात ‘ संसदे ’ ला प्रारंभ झाला. तत्पूर्वी राजाकडे अनियंत्रित व अमर्याद सत्ता होती व राज्याऐवजी राजा सार्वभौम आहे असे प्रतिपादन करण्यात येत होते. राजाच्या अनिर्बंध अधिकारांविरुद्ध उठाव करण्यात आला आणि सन १२१५ मध्ये मॅग्नाकार्टा - ज्याला स्वातंत्र्याचा जाहिरनामा असे संबोधले जाते - त्यावर जॉन राजाने सही केली. जनतेने हक्क प्राप्तीसाठी राजाकडे अर्ज केला होता. मॅग्नाकार्टा व इतर पाच करार असे मिळून ब्रिटीशांना स्वातंत्र्याची सनद मिळाली. या करारामुळे इंग्लंडमध्ये लोकप्रतिनिधीचा कारभार सुरू झाला नाही, पण राजाच्या सत्तेला

थोडाफार आळा बसला. पार्लमेंटचे पहिले अधिवेशन १२६५ मध्ये भरले व मर्यादित स्वरूपात का होईना पण लोकप्रतिनिधींचा कारभार सुरू झाला. पहिले अधिवेशन भरविण्याचे कामी सायमन डी. मॉटफर्ड यांनी पुढाकार घेतला होता. सरदार, जहागिरदार व शहरांचे प्रतिनिधी यांची बैठक बोलाविण्याचा सल्ला त्यानेच राजाला दिला होता व राजालाही खर्चासाठी मंजुरी घेण्यासाठी या लोकांची अनुमती हवी होती. या पहिल्या अधिवेशनात सर्वसाधारण लोकांचे प्रतिनिधी नव्हते, त्यांना १४ व्या शतकामध्ये पार्लमेंटमध्ये प्रथमतः स्थान मिळाले.

पार्लमेंटचे क्षेत्र सुरूवातीस मर्यादित होते. पण राजसत्तेशी लढा देऊन पार्लमेंटने आपले अधिकार वाढवून घेतले. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पार्लमेंटला सार्वभौम स्वरूप प्राप्त झाले. या लढ्यात पार्लमेंट, राजाकडून एकेक अधिकार मिळवित होते तर दुसरीकडे लोकांचे मताधिकार वाढवून पाया अधिक व्यापक करीत होते. ब्रिटीश पार्लमेंटला ८०० वर्षांची प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. आधुनिक विधिमंडळाची जननी म्हणून हे पार्लमेंट मानले जात आहे व सर्व लोकशाही देशांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरत आहे.

ब्रिटीश कॅबिनेट पद्धती ही सुद्धा जगातील एक आगळीवेगळी पद्धती असून, संसदीय लोकशाही या कॅबिनेट पद्धतीचा गाभा आहे. ही पद्धती विकसित करण्यास १८ वे शतक उजाडावे लागले. हॅनोवर राजाच्या कारकिर्दीमध्ये या कॅबिनेट पद्धतीचा उगम झालेला आढळून येतो. सर रॉबर्ट वालपोल, रॉबर्ट पिल, पामर्स स्टोन आणि क्लॅड स्टोन या ब्रिटीश पंतप्रधानांचे या बाबत फार मोठे योगदान आहे.

घटना समितीमध्ये स्वतंत्र भारतासाठी कोणती राज्य पद्धती स्वीकारावी यावर घटनाकारांनी साधक-बाधक चर्चा करून, सखोल विचारमंथन केले. त्यांनी विविध लोकशाही देशांचा व राज्य पद्धतींचा सखोल अभ्यास केला. अमेरीका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स, आयर्लंड इ. देशांच्या राज्य पद्धतीचे सूक्ष्म अवलोकन केले. अमेरिकेमधील संघराज्यात्मक व अध्यक्षीय लोकशाही पद्धत, ब्रिटनमधील संसदीय लोकशाही यांचा तौलानिक अभ्यास करून भारताला कोणती पद्धती अधिक योग्य राहील याचा उहापोह केला.

अमेरिकन अध्यक्षीय पद्धतीमध्ये अध्यक्ष हा थेट जनतेद्वारे निवडला जातो व तो अमेरिकन संस्थेला जबाबदार नसतो. अमेरिकन संसद निवडून आलेल्या अध्यक्षाला अवि वास प्रस्तावाच्या माध्यमातून काढू शकत नाही. सत्ता विभाजनाचा सिद्धांत व संघराज्यात्मक कार्यपद्धती ही अमेरिकन राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. संसद, कार्यकारी प्रशासन व न्याय मंडळे ही स्वतंत्र असून स्थिर शासनाच्या संकल्पनेवर अमेरिकन घटना आधारित आहे.

मात्र घटनाकारांनी भारतासाठी या अध्यक्षीय शासन पद्धतीऐवजी संसदीय शासन पद्धती सुयोग्य मानली. या पद्धतीला जबाबदार शासन पद्धती असे म्हणता येईल. अमेरीकेमध्ये अध्यक्ष कार्यकारी असून भारतात हे अधिकार संसदेला आहेत. या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकारी प्रशासन हे संसद/ विधिमंडळाला जबाबदार आहे. संसदेप्रति कार्यकारी प्रशासनाचे उत्तरदायित्व हा संसदीय कार्यपद्धतीचा गाभा आहे. या संबंधीच्या विवक्षित तरतुदी संविधानामध्ये केलेल्या आहेत. लोकनियुक्त शासनाला त्याच्या सर्व धोरणांबाबत संसदेला जाब द्यावा लागतो. एकप्रकारे संसद व विधिमंडळे ही लोकनियुक्त सभागृहे कार्यकारी प्रशासनावर नियंत्रण ठेवतात. म्हणूनच जोपर्यंत मंत्रिमंडळाला संसद वा विधिमंडळात बहुमत असते तोपर्यंतच मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते, अन्यथा मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वावर मंत्रिमंडळ काम करते.

असे जरी असले तरी भारतीय राज्यघटना ही अमेरिकन संघराज्यात्मक पद्धती व ब्रिटीश संसदीय पद्धती यांचे उत्तम मिश्रण आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे, संसदीय शासन प्रणाली, संघराज्यात्मक पद्धती, सत्ता विभाजनाचा सिद्धांत, कायद्याचे-राज्य इत्यादी तत्वांचा समावेश केलेला असून ही सर्व तत्वे ब्रिटीश संसदीय पद्धती, अमेरिकन संघराज्यात्मक पद्धती, आयर्लंडची राज्यघटना, कॅनडा व ऑस्ट्रेलियाची राज्यघटना यांवरून घेतलेली आहे. शिवाय १९३५ चा भारत सरकारचा कायदा हा भारतीय राज्यघटनेचा आधार आहे, कारण या कायद्याप्रमाणे ब्रिटीशांनी प्रथमच संघराज्यात्मक पद्धती भारतात अवलंबिली होती. या कायद्याचा उगम बघणे यासंदर्भात महत्त्वाचे आहे. याबाबत विवेचन पुढील पृष्ठावर करण्यात आले आहे.

* * * * *

# १९३५ च्या कायद्याचा जनक - लॉर्ड बटलर

चर्चिल, ईडन व मॅकमिलन यांनी पंतप्रधानपद सोडल्यावर तिन्ही वेळा ब्रिटीश हुजूर पक्षीय नेते लॉर्ड बटलर यांचे नाव त्या पदासाठी होते, पण तिन्ही वेळा त्यांची संधी हुकली. तशी ती हुकल्यानंतर जे पंतप्रधान झाले त्यांच्या मंत्रीमंडळात बटलर होते. आपली वैयक्तिक महत्वाकांक्षा व्यक्तिगत वैमनस्य वाढविण्यासाठी वा पक्षात फूट पाडण्यासाठी वापरू नये असे त्यांचे मत होते. लहानपणीच त्यांना शारीरिक दुखापत झाली होती व म्हणून पहिल्या महायुद्धाच्या वेळी त्यांना सैन्यात दाखल होता आले नाही. यामुळे कशासाठीही प्राणपणाने लढण्याची त्यांची वृत्तीच हरपली होती असे इनॉक पॉवेल यांनी त्यांच्या बद्दलच्या मृत्यू लेखात म्हटले आहे. एक पंतप्रधान पद सोडले तर बटलर यांनी परराष्ट्र, अर्थ, गृह व शिक्षण अशी सर्व महत्वाची खाती अतिशय कौशल्याने हाताळली. किंबहुना १९४४ साली त्यांनी संयुक्त मंत्रीमंडळात असतांना जे शिक्षणविषयक विधेयक मांडले त्यामुळे ब्रिटनच्या शैक्षणिक जीवनात क्रांती झाली. त्यांच्या या कामगिरीचा गौरव, मजुर व लिबरल दोन्ही विरोधी पक्ष करीत आले आहेत. ते जवळ-जवळ २७ वर्षे निरनिराळ्या मंत्री पदांवर होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी पोलीस दलात सुधारणा घडून आणल्या. शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीचा गौरव विल्सन यांचे मजूरपक्षीय मंत्रीमंडळ आले तेव्हा १९६४ साली केम्ब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी महाविद्यालयाचे मास्टर हे पद देऊन करण्यात आला. ही मुदत संपल्यानंतर महाविद्यालयाचे प्राध्यापक, पदवीधर यांनीच प्रचंड मतांनी त्यांना पुन्हा निवडून दिले. तथापि भारतीयांना बटलर यांची ओळख राहील ते १९३५ च्या कायद्याचे जनक म्हणून, हे जनकत्व कायदेशीररीत्या बोलावयाचे झाले तर त्यांच्याकडे पूर्णतः जाणार नाही. पण व्यवहारतः ते जाते. त्यावेळी भारतमंत्री होते सर सॅम्युअल होअर व बटलर त्यांचे दुय्यम मंत्री होते. बटलर यांचा जन्म हिंदुस्थानात कटक येथे झाला होता. त्यांचे वडील पूर्वीच्या मध्य प्रांताचे गव्हर्नर होते व दुसरे नातेवाईक हरकोर्ट बटलर हे उत्तर प्रदेश (तेव्हाचा संयुक्त प्रांत) याचे गव्हर्नर होते. म्हणून भारतातील परिस्थिती बटलर यांना चांगली माहिती होती. गोलमेज परिषदेनंतर ब्रिटीश सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली व विधेयक चिकित्सा समितीकडे धाडण्याचे ठरविले. चर्चिल यांनी तेथपासूनच विरोध सुरू केला. पार्लमेंट व बाहेर हुजूर पक्षाचे व्यासपीठ या दोन्ही ठिकाणी चर्चिल यांनी

जितकी अडवणूक करता येईल तितकी केली. मजूर पक्ष नाराज होता. कारण ३५ च्या विधेयकाने वसाहतीचे स्वराज्य दिले नव्हते. हे विधेयक फार मोठे होते. त्याची कलमे ४७३ व परिशिष्टे १६. त्यावर चर्चाही प्रदीर्घ झाली. कॉमन्सच्या इतिवृत्ताची (हॅन्सार्ड) चार हजार पृष्ठे भरली. एकूण दीड कोटी शब्द या इतिवृत्तात आहेत. भारतमंत्र्यांना ६०० भाषणे द्यावी लागली व १५ हजार प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. श्वेतपत्रिका, चिकित्सा समितीचा अहवाल व विधेयक यावर चर्चा करण्यात कॉमन्सची अडीच वर्षे गेली. सरकारच्या वतीने बटलर या प्रत्येक पातळीवर आघाडीवर होते. चर्चिल यांच्या हालचालींना तोंड देण्यात त्यांचा पुढाकार होता. म्हणून सॅम्युअल होअर हे भारतमंत्री असले तरी ३५ च्या कायद्याचे जनकत्व बटलर यांच्याकडे जाते. इतक्या दीर्घकालीन चर्चेवरून त्यांच्या चिकाटीची कल्पना येऊ शकते. ३५ चा कायदा यशस्वी झाला असे नव्हे. पण प्रांतिक स्वायत्तेचा नवा प्रयोग सुरू झाला. या कायद्यात संघराज्याची योजना अभिप्रेत होती. ती अंमलात येण्यापूर्वी दुसरे महायुद्ध सुरू झाले व ही योजना बारगळली. तथापि ३५ च्या कायद्याचे वैशिष्ट्य हे की, १९४७ साली स्वातंत्र्याचे विधेयक तयार करतांना त्याचा आधार घेतला गेलाच; पण स्वतंत्र भारताच्या घटनेने या कायद्यातील अनेक महत्त्वाच्या तरतुदी स्वीकारल्या. त्यांनी आपल्या आत्मचरित्रास ‘ आर्ट ऑफ द पॉसिबल ’ असे नाव दिले आहे. राजकारण हे शक्यतेच्या कलेत ते मोडीत. हुजूर पक्षातील उदारमतवादी प्रवृत्तीचे ते प्रतिनिधी होते. अत्युच्च अधिकारपद हुकले पण त्यांनी जे करून दाखविले ते विसरण्याजोगे नाही.

* * * * *

९

# भारताची राज्यघटना

## घटना समितीच्या कामकाजाचा पहिला दिवस

भारताच्या घटना समितीची पहिली बैठक नवी दिल्ली येथे ९ डिसेंबर, १९४६ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता घटना सभागृह *(आता संसदेचे मध्यवर्ती सभागृह)* येथे सुरू झाली. या ऐतिहासिक प्रसंगासाठी हे सभागृह खास सजविण्यात आले होते. त्यामुळे त्याला विलोभनीय रूप प्राप्त झाले होते. सभागृहाचे सुंदर छत आणि भिंती यांच्यावर सोडण्यात आलेल्या विजेच्या दिव्यांमुळे या सभागृहाला एक आगळी झळाळी प्राप्त झाली होती.

घटना समितीचे सन्माननीय सदस्य भारावलेल्या मनःस्थितीत असूनही विजयी भावनेने अध्यक्षीय आसनासमोर असलेल्या अर्धवर्तुळाकार रांगांमध्ये स्थानापन्न झालेले होते ज्यायोगे अध्यक्ष आणि त्यांच्यात थेट संपर्क होऊ शकणार होता. अर्धवर्तुळाकार उतार असणारी सभागृहातील छोट्या पाय-या-पाय-यांची जमीन हिरव्या गालिच्यांनी आच्छादित करून सदस्यांच्या बसण्याच्या बाकांवर सोडण्यात आलेल्या विजेच्या माळांमुळे वातावरणात काहीसा उबदारपणा जाणवत होता. दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत बैठका सुखावह व्हाव्यात यासाठी सभागृह उबदार ठेवण्याची वेगळी व्यवस्था करण्यात आली होती.

सुशोभित केलेल्या पहिल्या रांगेत पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलाम आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य जे. बी. कृपलानी, डॉ. राजेंद्र प्रसाद, श्रीमती सरोजिनी नायडू, श्री. हरेकृष्ण मेहताब, पंडित गोविंद वल्लभ पंत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री. शरत चंद्र बोस, श्री.चक्रवर्ती राजगोपालाचारी आणि श्री. एम. असफ अली स्थानापन्न झाले होते. या बैठकीला उपस्थित असलेल्या २०७ प्रतिनिधींमध्ये नऊ महिलांचा समावेश होता.

घटना समितीचे हंगामी अध्यक्ष डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांचा परिचय आचार्य कृपलानी यांनी करून देण्याने उद्‌घाटनाचे सत्र सकाळी ११ वाजता सुरू झाले. डॉ. सिन्हा आणि मान्यवरांचे स्वागत करताना आचार्य कृपलानी म्हणाले, *"आपण प्रत्येक शुभकार्याचा आरंभ ई वरी आशीर्वादाने करत असतो. त्यानुसार आज आपण हाती घेतलेले कार्य सुरळीत पार पडण्यासाठी डॉ. सिन्हा यांनी ते प्राप्त करावेत अशी मी त्यांना प्रार्थना करतो. डॉ. सिन्हा यांनी आता अध्यक्षस्थान ग्रहण करावे, अशी मी आपणा सर्वांच्या वतीने त्यांना विनंती करतो."*

टाळ्यांच्या कडकडाटात अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर डॉ.सिन्हा यांनी विविध राष्ट्रांकडून आलेले शुभेच्छा संदेश वाचून दाखविले. अध्यक्षांचे उद्‌घाटनपर भाषण आणि उपाध्यक्षांची नामनियुक्ती पार पडल्यानंतर सदस्यांना त्यांनी आपला परिचय करून देण्याची औपचारिक विनंती करण्यात आली. पहिल्या दिवसाच्या सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये सर्व २०७ सदस्यांनी आपला परिचय देऊन अभिलेख पत्रावर *(Register)* स्वाक्ष-या केल्या.

घटना सभागृहात ३० फूट उंच असलेल्या दर्शक दीर्घेत *(Galleries)* उपस्थित असलेले वृत्तपत्रांचे प्रतिनिधी आणि निमंत्रित यांनी हा अविस्मरणीय सोहळा आपल्या अनिमिष नेत्रांनी अनुभवत या घटनेचे साक्षीदार ठरले. आकाशवाणी दिल्ली केंद्राने *(All India Radio-Delhi)* या संपूर्ण कामकाजाचे वृत्तांकन थेट प्रक्षेपित करून याचे यथास्थित चित्र सर्वांसमोर उभे केले.

घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ रोजी झाली तेव्हा डॉ. सच्चिदानंद सिन्हा हे हंगामी अध्यक्ष म्हणून स्थानापन्न झाले होते. त्यानंतर डॉ.राजेंद्र प्रसाद घटना समितीचे अध्यक्ष झाले आणि त्यानंतर ते भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्रपती झाले. कलकत्ता विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि बंगालमधील एक नामवंत ख्रिश्चन विद्वान, प्रा.हरेंद्र कुमार मुखर्जी घटना समितीचे उपाध्यक्ष झाले. घटना समितीच्या अल्पसंख्याक समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.

* * * * *

## काही महत्त्वाचा तपशील

स्वतंत्र भारताच्या घटनेचा मसुदा तयार करण्याचे ऐतिहासिक कार्य घटना समितीने जवळपास तीन वर्षांत (२ वर्षे ११ महिने १७ दिवस) पूर्ण केले. या काळात समितीची अकरा अधिवेशने झाली आणि यामध्ये १६५ दिवस कामकाज झाले. यापैकी ११४ दिवस घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय झाला.

'कॅबिनेट मिशन' ने शिफारस केलेल्या योजनेनुसार प्रांतिक विधानसभांच्या सदस्यांनी अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींचा समावेश घटना समितीच्या रचनेनुसार त्यामध्ये करण्यात आला. समितीची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे असणार होती : (१) प्रांतिक विधानसभांतर्फे निवडून आलेले २९२ सदस्य (२) भारतातील संस्थानांचे प्रतिनिधी ९३ आणि (३) मुख्य आयुक्तांच्या अंमलाखाली असलेल्या प्रांतांचे प्रतिनिधी ४.

अशा प्रकारे घटना समितीची सदस्य संख्या ३८९ राहणार होती. तथापि, ३ जून, १९४७ रोजीच्या माऊंटबॅटन योजनेनुसार झालेल्या फाळणीमुळे पाकिस्तानसाठी स्वतंत्र घटना समिती स्थापन करण्यात आली. परिणामी भारताच्या घटना समितीची सदस्य संख्या २९९ झाली. ही संख्या २९९ अशी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे फाळणीमुळे काही संस्थानांच्या सदस्यांचे अस्तित्वच संपुष्टात आले.

सविधान सभेवर सदस्यांचे निर्वाचन प्रांतीय विधानमंडळाच्या निर्वाचित सदस्यांद्वारे करण्यात आले. डॉ. आंबेडकर, मुंबई विधानमंडळातून निर्वाचित होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी बंगाल विधानमंडळातून श्री. जोगेंद्रनाथ मंडल आणि इतर अनुसूचित जातींच्या सदस्यांच्या पाठिंब्यांवर संविधान सभेत प्रवेश मिळविला. बंगालच्या विभाजनाचा परिणाम म्हणून डॉ. आंबेडकर संविधानसभेचे सदस्य राहिले नाही. संविधानसभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर यांना पाठविलेल्या ३० जून,

१९४७ च्या पत्रात डॉ. आंबेडकरांची संविधानसभेवर त्वरित निवड व्हावी असे सुचविले. त्यांनी लिहिले “ अन्य बाबी सोबतच आम्हाला असे आढळून आले की, डॉ. आंबेडकरांनी संविधानसभेत आणि ज्या विविध समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली होती त्या विविध समित्यांवर त्यांनी जे कार्य केले, त्यांनी जे योगदान दिले ते एवढे श्रेष्ठ दर्जाचे आहे की आम्ही त्यांच्या सेवांपासून वंचित राहू इच्छित नाही. ते बंगालमधून निर्वाचित झाले होते. आणि त्या प्रातांचे विभाजन झाल्यामुळे आता ते संविधानसभेचे सदस्य राहीले नाहीत. १४ जुलैपासून सुरु होणा-या संविधानसभेच्या सत्रात त्यांनी उपस्थित रहावे याविषयी मी आतूर आहे. म्हणून त्यांचे त्वरीत निर्वाचन होणे अगत्याचे आहे. ” त्यानुसार १९४७ च्या जुलै महिन्यात डॉ. आंबेडकर संविधानसभेवर पुनर्निर्वाचित झाले. त्यानंतर लगेच १५ ऑगस्ट, १९४७ ला स्वांतत्र्यदिनी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना मंत्रिमंडळात सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले. डॉ. आंबेडकरांनी ते निमंत्रण स्वीकारले आणि ते भारताचे प्रथम विधीमंत्री झाले. २९ ऑगस्ट रोजी संविधानसभेने एकमताने त्यांची संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. १ नोव्हेंबर, १९४९ ला संविधान सभेत खालीलप्रमाणे सदस्य होते.

मुंबई-बालचंद्र महेश्वर गुप्ते, के. एम. मुंशी, श्रीमती हंसा मेहता, नरहर विष्णू गाडगीळ, हरी विनायक पाटस्कर, एस. निजलिंगप्पा, डॉ. बी. आर. आंबेडकर, एस. के. पाटील, जॉसिफ अल्बान डीसूजा, रामचंद्र मनोहर नलवा, कन्हैयालाल नानाभाई देसाई, आर. आर. दिवाकर, केशवराव मारुतीराव जेठे, शंकरराव देव, खंडूभाई कासनजी देसाई, जी. वी. मावलंकर, बाल गंगाधन खेर, वल्लभभाई जे. पटेल, एम. आर. मसानी, अब्दूलकादर मुहम्मद शेख व ए. ए. खान हे होते.

**भारतीय घटना समितीची राज्यनिहाय सदस्य संख्या -३१ डिसेंबर, १९४७ रोजीनुसार**

**प्रांत-२२९**

| अ.क्र. (१) | प्रांत (२) | सदस्य संख्या (३) |
|---|---|---|
| १ | मद्रास . . . . . . . . | ४९ |
| २ | मुंबई . . . . . . . . | २१ |
| ३ | पश्चिम बंगाल . . . . . . . . | १९ |
| ४ | संयुक्त प्रांत . . . . . . . . | ५५ |
| ५ | पूर्व पंजाब . . . . . . . . | १२ |
| ६ | बिहार . . . . . . . . | ३६ |
| ७ | मध्य प्रांत आणि बेरार . . . . . . . . | १७ |
| ८ | आसाम . . . . . . . . | ८ |
| ९ | ओरिसा . . . . . . . . | ९ |
| १० | दिल्ली . . . . . . . . | १ |
| ११ | अजमेर-मेरवाडा . . . . . . . . | १ |
| १२ | कूर्ग . . . . . . . . | १ |
| | **एकूण. .** | **२२९** |

| अ.क्र. | राज्य | सदस्य संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **भारतीय संस्थाने -७०** | |
| १ | अलवार .. .. .. .. | १ |
| २ | बडोदा .. .. .. .. | ३ |
| ३ | भोपाळ .. .. .. .. | १ |
| ४ | बिकानेर .. .. .. .. | १ |
| ५ | कोचीन .. .. .. .. | १ |
| ६ | ग्वाल्हेर .. .. .. .. | ४ |
| ७ | इंदूर .. .. .. .. | १ |
| ८ | जयपूर .. .. .. .. | ३ |
| ९ | जोधपूर .. .. .. .. | २ |
| १० | कोल्हापूर .. .. .. .. | १ |
| ११ | कोटा .. .. .. .. | १ |
| १२ | मयूरभंज .. .. .. .. | १ |
| १३ | म्हैसूर .. .. .. .. | ७ |
| १४ | पतियाळा .. .. .. .. | २ |
| १५ | रेवा .. .. .. .. | २ |
| १६ | त्रावणकोर .. .. .. .. | ६ |
| १७ | उदयपूर .. .. .. .. | २ |
| १८ | सिक्कीम आणि कूच बिहार गट .. .. .. | १ |
| १९ | त्रिपुरा, मणिपूर आणि खासी संस्थाने गट .. .. | १ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २० | उत्तर प्रदेश संस्थाने गट . . . . . . . . | १ |
| २१ | पूर्व राजपुताना संस्थाने गट . . . . . . . . | ३ |
| २२ | मध्य भारत संस्थाने गट (बुंदेलखंड आणि माळवा यांच्यासहित) | ३ |
| २३ | पश्चिम भारत संस्थाने गट . . . . . . . . | ४ |
| २४ | गुजरात संस्थाने गट . . . . . . . . | २ |
| २५ | दक्षिण आणि मद्रास संस्थाने गट . . . . . . | २ |
| २६ | पंजाब संस्थाने गट - १ . . . . . . . . | ३ |
| २७ | पूर्वेकडील संस्थाने गट - १. . . . . . . . | ४ |
| २८ | पूर्वेकडील संस्थाने गट - २. . . . . . . . | ३ |
| २९ | उर्वरित संस्थाने गट . . . . . . . . | ४ |
| | **एकूण . .** | **७०** |
| | **एकत्रित सदस्य संख्या** | **२२९ + ७० = २९९** |

* * * * *

**पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीस १३ डिसेंबर, १९४६ रोजी पुढीलप्रमाणे 'उद्दिष्ट ठराव' सादर केला :—**

१. भारत एक स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक असून त्याच्या भावी शासनासाठी घटना तयार करण्याचा दृढ आणि गांभीर्यपूर्वक निश्चय ही घटना समिती घोषित करत आहे;

२. ज्याअर्थी, विद्यमान ब्रिटिश शासित भारत, भारतीय संस्थाने, या दोहोंच्या बाहेर असणारा भूप्रदेश आणि राज्ये तसेच स्वतंत्र, सार्वभौम भारतात सामील होऊ इच्छिणारी संस्थाने व भूप्रदेश हे एकत्रितपणे भारत म्हणून गणले जातील; आणि

३. ज्याअर्थी, उपरनिर्दिष्ट भूप्रदेश, त्यांच्या विद्यमान सीमांसह अथवा घटना समिती निश्चित करेल त्यानुसार किंवा त्यानंतर घटनेच्या कायद्यानुसार, स्वायत्त एकक म्हणून दर्जा धारण करतील आणि कायम राखतील, तसेच उर्वरित एकत्रित अधिकार आणि सरकार तसेच प्रशासन यांचे सर्व अधिकार आणि कर्तव्ये यांचे वहन करतील; तथापि, केंद्र सरकारला प्रदान केलेला अथवा नेमून दिलेला अधिकार आणि कर्तव्ये तसेच केंद्राचे अध्याज्ञपत *(Inherent)* अथवा प्रदत्त *(Implied)* अधिकार यांचा असे अधिकार आणि कर्तव्ये यांना अपवाद असेल; आणि

४. ज्याअर्थी, सार्वभौम स्वतंत्र भारताचे तसेच त्याचे घटनात्मक घटक आणि शासनाची अंगे यांचे सर्व अधिकार आणि सत्ता भारताच्या जनतेकडून प्राप्त झाले आहेत; आणि

५. ज्याअर्थी, भारताच्या सर्व जनतेला सामाजिक - आर्थिक - राजकीय न्यायः संधी-दर्जा-कायदा याबाबतची समानता; विचार-अभिव्यक्ती - श्रद्धा - वि वास-उपासना- व्यवसाय- संघटन-कृती यांबाबतचे स्वातंत्र्य यांची कायदे आणि सार्वजनिक नीतिमत्तेच्या मर्यादेत हमी देण्यात येईल आणि ते प्राप्त करून देण्यात येतील; आणि

६. ज्याअर्थी, अल्पसंख्याक, मागास आणि आदिवासी विभाग तसेच पददलित आणि इतर मागासवर्गांना पुरेसे संरक्षण पुरविण्यात येईल; आणि

७. ज्याअर्थी, प्रजासत्ताकाच्या प्रांतांची अखंडत्वता तसेच जमीन, पाणी आणि हवा यांच्यावरील सार्वभौम प्रभुत्व न्याय आणि सुसंस्कृत देशांचे कायदे यांच्या अनुसार कायम राखण्यात येईल; आणि

८. ही प्राचीन भूमी जगातील आपले हक्काचे आणि सन्मानाचे स्थान ग्रहण करत असून विश्वशांती तसेच मानव जातीचे कल्याण साध्य करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी संपूर्णतः आणि स्वयंप्रेरणेने हातभार लावत आहे.

हा ठराव घटना समितीने २२ जानेवारी, १९४७ रोजी एकमताने स्वीकृत केला.

* * * * *

घटना समितीची बैठक १४ ऑगस्ट, १९४७ च्या रात्री उशिरा घटना सभागृहात सुरू झाली आणि मध्यरात्री बाराच्या ठोक्याला समितीने स्वतंत्र भारताच्या मध्यवर्ती कायदे मंडळाचे स्वरूप धारण केले.

घटना समितीने २९ ऑगस्ट, १९४७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतासाठी घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी मसुदा समितीची स्थापना केली. घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय करताना समितीसमोर आलेल्या ७६३५ सुधारणांपैकी २४७३ सुधारणा मांडण्यात आल्या, त्यांच्यावर चर्चा झाली आणि त्या निकालात काढण्यात आल्या.

भारताची घटना २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी स्वीकृत करण्यात आली आणि या दस्तऐवजावर सन्माननीय सदस्यांनी २४ जानेवारी, १९५० रोजी स्वाक्ष-या केल्या. घटनेवर प्रत्यक्षात २८४ सदस्यांनी अशा स्वाक्ष-या केल्या. त्यादिवशी घटनेवर स्वाक्ष-या होत असताना बाहेर मात्र वरूणराजाने जलधारांची बरसात करून एकप्रकारे या पवित्र कार्याला शुभशकुनच केला.

भारताची राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आली. त्या दिवशी मध्यवर्ती कायदेमंडळाचे अस्तित्व संपुष्टात येऊन; १९५२ मध्ये नविन संसद घटीत होईपर्यंत त्याचे रूपांतर भारताच्या हंगामी संसदेत झाले.

* * * * *

# घटना समितीची अधिवेशने

| | | |
|---|---|---|
| पहिले अधिवेशन | . . | ९-२३ डिसेंबर, १९४६ |
| दुसरे अधिवेशन | . . | २०-२५ जानेवारी, १९४७ |
| तिसरे अधिवेशन | . . | २८ एप्रिल - २ मे, १९४७ |
| चौथे अधिवेशन | . . | १४ - ३१ जुलै, १९४७ |
| पाचवे अधिवेशन | . . | १४ - ३० ऑगस्ट, १९४७ |
| सहावे अधिवेशन | . . | २७ जानेवारी, १९४८ |
| सातवे अधिवेशन | . . | ४ नोव्हेंबर, १९४८ ते ८ जानेवारी, १९४९ |
| आठवे अधिवेशन | . . | १६ मे - १६ जून, १९४९ |
| नववे अधिवेशन | . . | ३० जुलै - १८ सप्टेंबर, १९४९ |
| दहावे अधिवेशन | . . | ६ - १७ ऑक्टोबर, १९४९ |
| अकरावे अधिवेशन | . . | १४-२६ नोव्हेंबर, १९४९ |

( समितीची आणखी एक बैठक २४ जानेवारी, १९५० रोजी झाली. याप्रसंगी सन्माननीय सदस्यांनी भारतीय घटनेच्या दस्तऐवजावर स्वाक्ष-या केल्या ).

* * * * *

## घटना समितीच्या अंतर्गत समित्या

१. कार्यपद्धती नियम समिती - राजेंद्र प्रसाद

२. सुकाणु समिती- राजेंद्र प्रसाद

३. अर्थ आणि कर्मचारी समिती - राजेंद्र प्रसाद

४. अधिकार पत्र समिती - अल्लाडी कृष्णस्वामी अय्यर

५. सभागृहाची समिती - बी. पट्टाभी सीतारामय्या

६. सभागृह कामकाज क्रम समिती - कन्हय्यालाल मुन्शी

७. राष्ट्रध्वज तदर्थ समिती - राजेंद्र प्रसाद

८. घटना कायदेमंडळ कार्य समिती - जी.व्ही.मावळंकर

९. संस्थाने समिती - जवाहरलाल नेहरू

१०. मूलभूत हक्क, अल्पसंख्याक आणि आदिवासी तसेच वर्जित प्रदेश सल्लागार समिती—वल्लभभाई पटेल

११. अल्पसंख्याक उप समिती - हरेंद्र कुमार मुखर्जी

१२. मूलभूत हक्क उप समिती - जे. बी. कृपलानी

१३. ईशान्य सीमावर्ती आदिवासी प्रदेश आणि आसाम वर्जित तसेच अंशतः वर्जित प्रदेश उप समिती - गोपीनाथ बार्डोलोई.

१४. वर्जित आणि अंशतः वर्जित (आसामखेरीज) प्रदेश उप समिती - ए. व्ही. ठक्कर

१५. केंद्रीय अधिकार समिती - जवाहरलाल नेहरू

१६. केंद्रीय घटना समिती - जवाहरलाल नेहरू

१७. मसुदा समिती - बाबासाहेब आंबेडकर

* * * * *

## (१)

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ रोजी भारताच्या घटना समिती समोर केलेले भाषण.

**“ अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करु शकणार नाही ”...**

संविधान सभेच्या कामकाजाला ९ डिसेंबर, १९४६ पासून सुरुवात झाली. संविधान सभेवर एकूण २९६ सदस्य निवडून आले होते. त्यापैकी २०७ सदस्यांनी कामकाजात भाग घेतला. ८९ सदस्य अनुपस्थित होते. किंबहुना त्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकला होता हे म्हणणे संयुक्तिक होईल. या सदस्यांमध्ये बहुतांश मुस्लिम लीग आणि संस्थानिकांचे प्रतिनिधी होते.

दिनांक १३ डिसेंबर, १९४६ ला संविधानाचे साध्य आणि उद्दीष्ट सांगणारा ठराव पं.जवाहरलाल नेहरु यांनी मांडला. हात वर करुन नेहमीच्या सर्वसाधारण पध्दतीने नव्हे तर सर्वांनी उभे राहून गांभीर्याने ठराव पारित करावा अशी अपेक्षा त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. श्री. पुरुषोत्तम टंडन यांनी ठरावाला अनुमोदन देणारे भाषण केले.

डॉ. एम. आर. जयकर यांनी पं. नेहरुंच्या ठरावाला दुरुस्ती जोडणारा ठराव मांडला. त्यांच्या मते भारताला एक स्वतंत्र, लोकशाहीवादी, सार्वभौमराज्य निर्माण करण्यासाठी, संविधानाला त्या संदर्भात आकार देण्यासाठी मुस्लिम लीग आणि भारतीय संस्थानिकांच्या प्रतिनिधींच्या सहकार्याची गरज आहे.. जेणेकरुन या ठरावाला एक शक्ती प्राप्त होईल. त्यासाठी वरील दोन संघटनांचे प्रतिनिधी, जर त्यांची इच्छा असेल, सहभागी होईपर्यंत या ठरावावरील चर्चा पुढे ढकलण्यात यावी.

काही अपवाद वगळता अनेक सदस्यांनी डॉ. जयकरांच्या दुरुस्तीला कडाडून विरोध केला. कोणत्याही परिस्थितीत चर्चा स्थगित होता कामा नये अशी त्यांची भूमिका होती.

या पार्श्वभूमीवर संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बोलण्यासाठी पुकारले. हा दिवस होता मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ संविधान सभेचे कामकाज सुरु झाल्याच्या ९ व्या दिवशी डॉ. आंबेडकरांचे सभेपुढे पहिले भाषण झाले. डॉ. जयकरांप्रमाणेच डॉ. आंबेडकर सभागृहाचा रोष ओढवून घेतील आणि त्यांच्या रोषाला पात्र होतील असे अनेकांना वाटले. परंतु प्रत्यक्षात घडले ते अनपेक्षित. या प्रसंगाचे वर्णन करताना सभेचे एक सदस्य आणि प्रत्यक्षदर्शी न. वि. गाडगीळ म्हणतात " त्यांचे भाषण इतके मुत्सद्याला शोभणारे होते. इतके कटुतेशिवाय, इतके प्रामाणिकपणे आव्हान देणारे होते की, संपूर्ण सभागृह मतिगुंग झाल्याप्रमाणे ऐकत होते. प्रचंड उत्साहानी सर्व सदस्यांनी त्यांच्या भाषणाचे स्वागत केले. सभागृहाच्या लॉबीमध्ये त्यांचे अभिनंदन करण्यासाठी सर्वांनी त्यांना गराडा घातला. "

या प्रसंगाचे वर्णन करताना डॉ. आंबेडकरांचे एक चरित्रकार श्री. धनंजय कीर लिहितात, "एक मोठ्या डोक्याची खंबीर हनुवटीची, लंबवर्तुळाकार, गंभीर नि तेजस्वी चर्येची आणि उत्तम पोषाखातील भरदार व्यक्ती जयकरांच्या सूचनेला पाठिंबा देण्यास उभी राहिली. ती व्यक्ती म्हणजे डॉ. भीमराव आंबेडकर. ते काँग्रेसचे कट्टर विरोधक. त्यांनी काँग्रेसच्या मतप्रणालीची नि नेत्यांची जाहीर नि खाजगीरित्या अनेक वेळा टर उडविली होती. साहजिकच घटना समितीतील सर्व सभासदांच्या नजरा त्या वक्त्याकडे खेचल्या गेल्या. आंबेडकरांनी सर्व सभासदांवर आपली नजर एकदा फिरविली, प्रत्येक सभासदाला वाटले की, जयकारांच्या ठरावाला पाठिंबा देऊन जयकरांबरोबरच आंबेडकरही आपली पत-प्रतिष्ठा घालवून बसणार. काँग्रेसचे नेते हे राष्ट्रातील कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुमशक्तीचे प्रतीक त्यांच्याविरुध्द बोलणे म्हणजे स्वत:च्या लौकिक जीवनाची इतिश्री करुन घेण्यासारखे होते. काँग्रेसचे सभासद आपल्या कट्टर शत्रुला पाणी पाजावयास आतूर झाले होते.

राष्ट्रातील महान नेते आपल्या अवती-भवती बसलेले आहेत याची आंबेडकरांना जाणीव होती. त्यांच्या विरोधकांनी त्यांच्याविषयी अनेक गोष्टी ऐकल्या होत्या. प्रत्यक्ष भाषण ऐकण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. आंबेडकरांनी गंभीर स्वरात अन् वक्तृत्वपूर्ण भाषेत आपल्या भाषणास मोठी आत्मविश्वासाने सुरुवात केली.”

*ते म्हणाले,*

अध्यक्ष महोदय, आपण या ठरावावर बोलण्यासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल मी आपला मन:पूर्वक आभारी आहे. काही असो, आपल्या या निमंत्रणाने मी आश्यर्चचकित  झालो आहे हे कबूल करावे लागेल. मी या अपेक्षेत होतो की, माझ्याही आधी २०-२२ वक्ते भाषण करणार असल्यामुळे माझा क्रम लागलाच तर तो उद्या लागेल. आज मी कुठलीही तयारी करुन न आल्यामुळे उद्या बोलणे मला अधिक आवडले असते. आजच्या प्रसंगी मला माझे विचार पूर्णपणे व्यक्त करण्यासाठी पूर्ण तयारीनिशी बोलणे आवडले असते. शिवाय आपण माझ्याकरिता दहा मिनिटाचा अवधी निश्चित केला आहे. या मर्यादित चौकटीत आपल्या पुढील प्रस्तुत ठरावाला मी कसा न्याय देऊ शकेन हे मला कळत नाही. तरीही या संदर्भातील माझी मते शक्यतितक्या थोडक्या शब्दात मांडण्याचा मी प्रयत्न करीन.

अध्यक्ष महोदय, ज्या ठरावावर कालपासून चर्चा सुरु आहे त्याची स्पष्टपणे दोन भागात विभागणी होते. एक भाग वादग्रस्त असून दुसरा वादातीत आहे. या ठरावातील परिच्छेद ५ ते ७ शी संबंधित भाग हा वादातील आहे. या परिच्छेदात भारताच्या भावी राज्यघटनेची उद्दिष्टे नमूद केली आहेत. मला हे नमूद करावेच लागेल की, पं. जवाहरलाल नेहरुंसारख्या नामांकित समाजवाद्याने मांडलेला हा ठराव वादातीत असला तरी मला अत्यंत निराशाजनक वाटतो. माझी त्यांच्याकडून अशी अपेक्षा होती की, ठरावातील या भागात त्यांनी जे काही मांडले त्यापेक्षा ते कितीतरी पुढे जातील. इतिहासाचा अभ्यासक या नात्याने ठरावातील हा भाग कुठल्याही परिस्थितीत त्यात समाविष्ट होणारच नाही याची मी काळजी घेतली असती. ठरावातील तो भाग वाचताना फ्रांसच्या संविधान सभेने उद्‌घोषित केलेल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यातील एका कलमाची आठवण होते. प्रत्यक्षात चारशे

पन्नास वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही मानवी हक्कांचा जाहीरनामा व त्यातील अंतर्भूत तत्त्व आपल्या मानसिकतेचा अविभाज्य भाग झालेला आहे असे जर मी म्हटले तर ते योग्यच होईल. मी तर असे म्हणेन की, जगातील कोणत्याही सुसंस्कृत भागातील आधुनिक माणसाच्याच मानसिकतेचा तो अविभाज्य भाग झाला आहे असे नाही, तर खूप सनातनी, विचारात व सामाजिक संरचनेत खूप पुराणमतवादी असलेल्या आपल्या देशातसुध्दा या तत्वांची वैधता नाकारणारा कदाचितच कुणी आढळू शकेल. या ठरावात त्याची पुनरावृत्ती करणे म्हणजे शुध्द पांडित्य दर्शविण्याचाच प्रकार होय. ही तत्त्वे आपल्या निष्कलंक दृष्टिकोनाचा अविभाज्य भाग झालेली आहेत. त्यामुळे आपल्या उद्दिष्टांचा भाग म्हणून या तत्त्वांची पुन्हा घोषणा करणे अनावश्यक ठरते. या ठरावात दुसऱ्याही काही उणीवा आहेत. मला असे दिसते की ठरावातील प्रस्तुत भागात काही हक्कांची स्पष्टपणे तरतूद असली तरी उपाययोजनेचा मात्र त्यात उल्लेख नाही. आपणा सर्वांना जाणीव आहेच की, लोकांच्या हक्कांवर गदा येत असेल तेव्हा ते परत मिळविण्याची तरतूद असल्याशिवाय ते निरर्थक ठरतात. मला यात अशा उपाययोजनांची पूर्ण उणीव भासते. कोणत्याही माणसाचे जीवित, स्वातंत्र्य आणि मालमत्ता कायदेशीर कार्यवाहीशिवाय हिरावून घेता येणार नाही. हे सर्वसामान्य सूत्रही मला या ठरावात कुठेही आढळत नाही. मूलभूत हक्कांची तरतूद ही कायदा व नीतिमत्तेच्या मर्यादेत करण्यात आली आहेत. स्वाभाविकत: कायदा कायदा म्हणजे काय, नीतिमत्ता म्हणजे काय हे त्यावेळचे शासन ठरविल आणि जेव्हा एक राज्यकर्ते एक दृष्टिकोन स्वीकारतील तर दुसरे दुसरा दृष्टिकोन स्वीकारतील. तत्कालीन राज्यकर्त्यांवर जर हा निर्णय सोपविण्यात आला तर, अशा वेळी मूलभूत अधिकारांची नेमकी स्थिती काय राहील हे सांगता येत नाही. महोदय, या ठरावात आर्थिक, सामाजिक व राजकीय न्यायाची तरतूद करण्यात आली आहे. जर या ठरावामागे वास्तवता आणि प्रामाणिकपणा असेल, ज्याबद्दल मला तिळमात्र शंका नाही, हा ठराव मांडणाऱ्यांनी राज्याला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय ज्याद्वारे प्रत्यक्षात देता येईल अशी स्पष्ट तरतूद या ठरावात करायला हवी होती. या पार्श्वभूमीवर माझी अशी अपेक्षा होती की देशात आर्थिक व सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीसाठी

शेतीच्या व उद्योगाच्या अर्थव्यवस्था राष्ट्रीयीकरणाची तरतूद ठरावात करणे आवश्यक होते. समाजवादी अर्थव्यवस्था असल्याशिवाय भविष्यातील कोणतेही सरकार देशात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय कसा देवू शकेल हे मला समजत नाही. म्हणून या बाबींच्या स्पष्ट उल्लेखांना व्यक्तिश: माझी हरकत नसली तरी मला हा ठराव काहीसा निराशाजनक वाटतो. प्रस्तुत ठरावावरील एवढी माझी निरिक्षणे व्यक्त केल्यानंतर हा प्रश्न मी इथेच संपवितो.

आता मी ठरावाच्या पहिल्या भागाकडे वळतो. यात पहिल्या चार परिच्छेदांचा समावेश होतो. या सभागृहात आतापर्यंत झालेल्या चर्चेवरुन हा भाग वादग्रस्त झाल्याचे दिसून येते. ठरावात उपयोजिलेला "प्रजासत्ताक" हा शब्द वादाचा केन्द्रबिंदु असल्याचे जाणवते. "सार्वभोमत्व लोकांमधून निर्माण होते." ह्या परिच्छेद चार मधील विधानाभोवती हा वाद केन्द्रित झालेला आहे. मुस्लिम लीगच्या अनुपस्थितीत सभेने या ठरावावर चर्चा करणे संयुक्तिक होणार नाही, या माझे माझे मित्र डॉ. जयकर यांनी काल उपस्थित केलेल्या मुद्यातून हा वाद निर्माण झाला आहे. महोदय, या महान देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक भविष्यकालीन संरचनेबद्दल व उज्ज्वल भवितव्याबद्दल माझ्या मनात तिळमात्रदेखील शंका नाही. आज आपण राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विभागलेले आहोत, याची मला जाणीव आहे. आपण एक दुसऱ्यांविरुध्द लढणाऱ्या छावण्यांचा समूह आहोत आणि मी तर यापुढेही जावून हेही मान्य करेन की, बहुश: अशाच एका छावणीचा मी ही एक नेता आहे. परंतु महोदय, हे सर्व खरे असले तरी मला पूर्ण खात्री आहे की, अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करु शकणार नाही. (प्रचंड टाळ्या) विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंघ झाल्याशिवाय राहणार नाही. याबद्दल माझ्या मनात कसलीही शंका नाही. (हर्षध्वनी) आज जरी मुस्लिम लीग भारताच्या फाळणीसाठी प्रयत्नशील असला तरी एकसंघ भारतच त्यांच्याहीसाठी हिताचा आहे, असा विचार स्वत: मुस्लिम एक दिवस करायला लागतील हे सांगताना मला जराही संकोच वाटत नाही. (हर्षध्वनी व प्रचंड टाळ्या)

अंतीम ध्येयाबाबत, माझ्या मते आपल्यापैकी कुणीही भीती बाळगण्याचे कारण नाही. याबाबत कुणालाही शंका असू नये. आपली अडचण ही अंतीम भविष्याबाबतची नाही. आज एकसंघ नसलेल्या समाजातील लोकांनी एकत्रितपणे एकसंघत्वाकडे नेणाऱ्या मार्गाने कसा प्रवास करता येईल. याचा निर्णय घेणे ही आपली खरी अडचण आहे. आपली अडचण अंतीम ध्येयाबाबत नाही, सुरुवात कशी करावी याबाबत आहे. म्हणूनच अध्यक्ष महोदय, मी असा विचार केला असता की, स्वखुशीने आपले मित्र होण्याकरिता प्रत्येक पक्षाचे मन वळवण्यासाठी, या देशातील, जे अजूनही पूर्वग्रहाने मुख्य प्रवाहात सामील होण्यास तयार झाले नाहीत, अशा घटकांना सामील करुन घेण्यासाठी काही सवलती द्याव्या लागल्यात तर त्या देण्याचा उच्च दर्जाचा मुत्सद्दीपणा बहुसंख्यांक असलेल्या पक्षांनी दाखवावा, यासाठी मी हे आवाहन करीत आहे. लोकांच्या मनात भीती निर्माण होईल अशा शब्दांना व घोषणांना आपण दूर ठेवू या. आपल्या विरोधकांचे पूर्वग्रह लक्षात घेऊन त्यांना काही सवलती देऊ या, त्यांना सोबत घेऊ या, जेणेकरुन आपण ज्या मार्गावरुन वाटचाल करीत आहोत त्या मार्गावर ते स्वखुशीने येऊन मिळतील. या मार्गावर जर आम्ही सर्वांनी दीर्घकाळ वाटचाल केली तर तीच आम्हाला निश्चितपणे ऐक्याकडे घेऊन जाईल. मी इथे डॉ. जयकरांच्या उपसूचनेस पाठिंबा देतो तो एवढ्यासाठीच की, आपल्या सर्वांना याची जाणीव झाली पाहिजे, आपण बरोबर असू की चूक, आपण घेत असलेली भूमिका आपल्या कायदेशीर अधिकाराशी सुसंगत असो वा नसो, १६ मे किंवा ६ डिसेंबरच्या निवेदनाशी ती जुळणारी असो किंवा नसो ते सर्व बाजूला ठेवू या. कायदेशीर बाजूपेक्षाही हा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. हा प्रश्न कायद्याचा मुळी नाहीच. कायद्याच्या सर्व बाबी आपण दूर ठेवू या आणि असा प्रयत्न करु या की, जेणेकरुन जे लोक आज सोबत यायला तयार नाहीत ते येतील. ते येतील अशी परिस्थिती आपण निर्माण करु या. असे माझे आवाहन आहे.

या सभागृहात जी चर्चा सुरु आहे त्यात दोन प्रश्न विचारार्थ मांडण्यात आलेत. त्या प्रश्नांचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की, मी त्यांची नोंद

करुन ठेवली आहे. त्यापैकी एक प्रश्न माझे मित्र बिहारचे प्रधानमंत्री यांनी काल या सभागृहात केलेल्या भाषणात उपस्थित केला. त्यांच्या मते मुस्लिम लीगला संविधान सभेत सहभागी होण्यासाठी प्रस्तुत ठराव कसा प्रतिबंध करु शकतो ? आज माझे मित्र डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी एक दुसरा प्रश्न उपस्थित केला. तो प्रश्न म्हणजे कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावाशी प्रस्तुत ठराव विसंगत आहे काय ? महोदय, हे दोनही प्रश्न अत्यंत महत्वाचे आहेत व त्यांची उत्तरे, नव्हे स्पष्ट उत्तरे दिली गेली पाहिजेत. मला असे ठामपणे वाटते की, प्रस्तुत ठरावातून काही निष्पन्न होण्याचा उद्देश असो वा नसो, हा थंड डोक्याने घेतलेला निर्णय असो वा नसो, ही निव्वळ आकस्मिक घटना असो किंवा नसो, पण या ठरावाचा निश्चित परिणाम मुस्लिम लीगला संविधान सभेच्या बाहेर ठेवण्यातच होणार आहे. या संदर्भात ठरावातील परिच्छेद क्रमांक ३ कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो, जो माझ्या मते अतिशय अर्थपूर्ण व महत्त्वाचा आहे. परिच्छेद क्रमांक ३ मध्ये भारताच्या भावी राज्यघटनेचा विचार अंतर्भूत आहे. प्रस्तुत ठराव मांडणाऱ्याला यात काय अभिप्रेत आहे हे मला माहीत नाही. परंतु मी हे गृहीत धरतो की, प्रस्तुत ठराव संमत झाल्यावर तो संविधान सभेला परिच्छेद ३ च्या चौकटीत संविधानाच्या निर्मितीसाठी निर्देशक राहील. परिच्छेद ३ काय म्हणतो ? परिच्छेद ३ असे म्हणतो की, या देशात राज्यसंस्थेचे दोन प्रकार राहतील. एक खालच्या स्तरावर स्वायत्त प्रांत किंवा राज्ये किंवा असे इतर भाग जे अखंड भारतात सामील होऊ इच्छितात ते असतील. हे स्वायत्त घटक पूर्ण अधिकारयुक्त राहतील. त्यांना उर्वरित अधिकार सुध्दा राहतील. घटक प्रांतांच्या वरच्या स्तरावर संघराज्य राहील. त्याला काही बाबतीत कायदे करण्याचा, अंमलबजावणी करण्याचा आणि प्रशासनाचा अधिकार राहील. ठरावाचा हा भाग वाचत असताना एकत्रिकरणाच्या संकल्पेनेचा संदर्भ, तसेच एका बाजूला असलेले केन्द्र सरकार व दुसऱ्या बाजूला असलेली प्रांत सरकारे यांच्यामध्ये दुवा साधणारी मधली व्यवस्था मला कुठे आढळत नाही. कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर हा परिच्छेद वाचल्यावर किंवा काँग्रेसने वर्धेच्या अधिवेशनात पारित केलेल्या ठरावाच्याही पार्श्वभूमीवर, प्रांतांच्या एकत्रिकरणाच्या संकल्पनेचा संदर्भ मला कुठेही आढळत नाही. यामुळे

मी फार आश्चर्यचकित झालो आहे, हे मला कबूल करावेच लागेल. व्यक्तिश: असे गट करण्याची कल्पनाच मला मान्य नाही (ऐका...ऐका). मला मजबूत केंद्र सरकार आवडते (ऐका...ऐका). १९३५ च्या भारत सरकार कायद्याने निर्माण केलेल्या केन्द्र सरकारपेक्षाही अधिक मजबूत केन्द्र सरकार मला हवे आहे. परंतु महोदय, माझ्या या मतांना सदिच्छांना सद्य:स्थितीत कुठेही स्थान असल्याचे दिसत नाही. आपण खूप दूरवर प्रवास केला आहे. या देशात १५० वर्षाच्या प्रशासकीय व्यवस्थेतून निर्माण झालेले मजबूत केन्द्र सरकार जे माझ्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद, आदरयुक्त व आश्रयस्थान होते. मी जर असे म्हटले की त्याला खिळखिळे करण्याची संमती काँग्रेस पक्षाने ज्या कारणांमुळे दिली ती काँग्रेसलाच माहित. या भूमिकेचा त्याग केल्यानंतर आणि आम्हाला मजबतू केन्द्र सरकार नको ही भूमिका घेतल्यानंतर घटक राज्ये आणि केन्द्र सरकार यांना जोडणारी मधली उपसंघराज्याची व्यवस्था स्वीकारल्यानंतर, परिच्छेद ३ मध्ये एकत्रिकरणाच्या योजनेचा उल्लेख का केला नाही हे मला जाणून घ्यायचे आहे. एकत्रिकरणाशी संबंधित कलमांचा अर्थ लावण्यात काँग्रेस पक्ष, मुस्लिम लीग व ब्रिटिश सरकार यांचे एकमत नाही हे मी नीट समजू शकतो. परंतु मी हा नेहमीच विचार केला-या बाबतीत माझी चूक होत आहे. हे जर कुणी मला निदर्शनास आणून दिले तर दुरुस्ती करण्यास मी तयार आहे-निदान काँग्रेस पक्षाने हे मान्य केले होते की, विविध गटांमध्ये विभागलेल्या राज्यांनी जर संघ किंवा उपसंघराज्याला मान्यता दिली तर या प्रस्तावाला काँग्रेस विरोध करणार नाही. काँग्रेसचे हेच मनोगत असावे असा मला विश्वास आहे. माझा प्रश्न हा आहे की, ठराव मांडणाऱ्या व्यक्तीने त्याला आणि त्याच्या पक्षाला मान्य असलेल्या प्रांतांच्या एकत्वाचा किंवा प्रांतांच्या एकत्रिकरणाचा उल्लेख ठरावात का केला नाही ? या ठरावातून संघाच्या कल्पनेला पूर्णत: का वगळण्यात आले आहे ? मला याचे उत्तर दिसत नाही. कोणतेही असो ! म्हणून मला असे म्हणायचे आहे की, बिहारचे पंतप्रधान आणि डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी उपस्थित केलेले दोन प्रश्न-१६ मे च्या प्रस्तावाशी प्रस्तुत ठराव कसा विसंगत आहे किंवा या संविधान सभेत मुस्लिम लीगच्या प्रवेशाला हा ठराव कसा प्रतिबंध करतो-याचे उत्तर हा परिच्छेद ३ आहे. मुस्लिम

लीग निश्चितपणे याचा फायदा घेईल आणि आपल्या सततच्या अनुपस्थितीचे समर्थन करील. महोदय, माझे मित्र डॉ. जयकर यांनी सदर ठरावावरील निर्णय पुढे ढकलण्यात यावा यासाठी काल केलेला युक्तीवाद, त्यांना न दुखवता, मी असे म्हणेन की काहीसा कायदेशीपणाचाच होता. त्यांच्या युक्तिवादाचा आधार होता की तुम्हाला असे करण्याचा अधिकार आहे का ? संविधान सभेच्या कामकाजाशी संबंधित कॅबिनेट मिशनच्या विधानातील काही भाग त्यांनी वाचून दाखविला. त्यांच्या युक्तिवादातील मुख्य मुद्दा असा होता की, या ठरावावर निर्णय घेण्यासाठी या संविधान सभेने जी कार्यपध्दती अवलंबिली आहे ती कॅबिनेट मिशनच्या विधानातील अंतर्भूत कार्यपध्दतीशी पूर्णत: विसंगत आहे. महोदय, मी हा मुद्दा थोड्या वेगळ्या पध्दतीने मांडू इच्छितो, तो असा की, हा ठराव सरळसरळ मंजूर करण्याचा किंवा न करण्याचा अधिकार तुम्हाला आहे किंवा नाही हे मी तुम्हाला विचारीत नाही. शक्य आहे की हा अधिकार तुम्हाला असेलही. मी विचारीत असलेला प्रश्न असा की असे करणे तुमच्यासाठी दूरदर्शीपणाचे होईल काय ? तुमच्यासाठी हे शहाणपणाचे होईल काय ? अधिकार ही एक गोष्ट आहे. शहाणपणा ही सर्वस्वी वेगळी गोष्ट आहे. या सभागृहाने याचा निर्णय घेताना विचार करावा की, हे शहाणपणाचे होईल काय ? हे मुत्सेद्देगिरीचे ठरेल काय ? या घडीला असे करणे दूरदर्शीपणाचे ठरेल काय ? मी हे उत्तर देवू इच्छितो की हे दूरदर्शीपणाचे होणार नाही व शहाणपणाचे ठरणार नाही. कॉँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातील वाद मिटविण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न करावा असे मी सुचवितो. हा प्रश्न एवढा जीवनमरणाचा व इतका महत्वाचा आहे की एका किंवा दुसऱ्या पक्षाच्या प्रतिष्ठेच्या आधारावर तो कधीही सुटणारा नाही याची मला खात्री आहे. राष्ट्राच्या भवितव्याचा विचार करताना लोकांची प्रतिष्ठा, नेत्यांची प्रतिष्ठा तसेच पक्षाची प्रतिष्ठा नगण्य असते. कोणत्याही गोष्टीपेक्षा राष्ट्राचे भवितव्य अधिक महत्त्वाचे असते. याचे कारण, या संविधान सभेने एकदिलाने काम करण्यासाठीच हे हितावह होईल असे नाही, तर मुस्लिम लीगने काही निर्णय घेण्यापूर्वी तिची प्रतिक्रिया सुध्दा संविधान सभेला कळू शकेल. एवढ्याचसाठी मी डॉ. जयकरांच्या उपसूचनेस पाठिंबा देत आहे. आपण जर उताविळपणाने वागलो तर भविष्यात त्याचा काय परिणाम होईल याचा

सुध्दा आपण विचार केला पाहिजे. या सभागृहावर ज्या काँग्रेस पक्षाचा ताबा आहे त्याच्या मनात याबाबत काय योजना आहेत हे मला माहीत नाही. याविषयी ते विचार करीत आहेत काय हे वर्तविण्याचा मला अधिकार नाही. याबाबत त्यांचेजवळ कोणते उपाय आहेत, त्यांचे कोणते डावपेच आहेत हे मला माहित नाही. परंतु निर्माण झालेल्या या प्रश्नाचा, एक त्रयस्थ म्हणून विचार करताना मला असे वाटते की, याबाबतचे भवितव्य ठरविण्याचे केवळ तीनच मार्ग आहेत. एका पक्षाने दुसऱ्या पक्षापुढे शरणागती पत्करणे हा एक मार्ग, शांततामय वाटाघाटीतून उपाय शोधून काढणे हा दुसरा मार्ग आणि तिसरा मार्ग म्हणजे उघड संघर्ष. महोदय, संविधान सभेच्या काही सदस्यांकडून मी असे ऐकत आहे की, ते संघर्ष करण्याच्या तयारीत आहेत. देशातील राजकीय पेचप्रसंग युध्दाच्या मार्गाने सोडविण्याचा विचार या देशातील कोणत्याही व्यक्तीने करावा या कल्पनेनेच मी भयभीत झालो आहे. हे मी कबूल करतो. देशातील किती लोक या कल्पनेच्या पाठिशी आहेत हे मला माहित नाही. माझ्या मते बऱ्याच लोकांचा याला पाठिंबा आहे. याचे कारण कोणत्याही परिस्थितीत त्यांच्यातील बहुसंख्यांकांचा पाठिंबा, असे युध्द ब्रिटिशांच्या विरुध्द होईल असे त्यांना वाटते म्हणून आहे असे मला वाटते. परंतु महोदय, ज्या युध्दाचा याठिकाणी विचार होत आहे, जे लोकांच्या मनात आहे, ते युध्द स्थानिक, मर्यादित आणि फक्त ब्रिटिशांपुरतेच सीमित ठेवता येईल काय ? ब्रिटिशाव्यतिरिक्त आणखी कुणाबरोबर लढावं लागणार नसेल तर अशा प्रकारच्या डावपेचांना माझा फारसा विरोध असण्याचे कारण नाही. पण हे युध्द केवळ ब्रिटिशांच्या विरुध्द होईल काय ? कोणताही संकोच न बाळगता या सभागृहाला मी शक्य तितक्या स्पष्ट शब्दात सांगू इच्छितो की, जर या देशात युध्द झाले आणि या युध्दाचा संबंध आपल्यासमोर उभ्या टाकलेल्या प्रश्नांशी असेल तर युध्द ब्रिटिशांविरुध्दचे असणार नाही, ते युध्द मुसलमानांच्या विरुध्द असेल. त्यातही आणखी वाईट म्हणजे हे युध्द ब्रिटिश आणि मुसलमान यांच्या संयुक्त आघाडी विरुध्द असेल. होऊ घातलेले युध्द ज्याप्रकारे होण्याची मला भीती आहे. त्यापेक्षा वेगळ्या प्रकारे होईल असे वाटत नाही. महोदय, अमेरिकेसोबत झालेल्या तडजोडप्रसंगी बर्कनी केलेल्या महत्त्वपूर्ण भाषणातील एक परिच्छेद या सभागृहाला मी वाचून दाखवू इच्छितो.

सभागृहातील वातावरण निवळण्यासाठी त्याचा काही प्रमाणात उपयोग होऊ शकेल असा मला विश्वास वाटतो. आपणास माहित आहे की, अमेरिकेतील बंडखोर वसाहतीवर ताबा मिळविण्यासाठी ब्रिटिश लोक प्रयत्नशील होते. त्यांच्या इच्छेविरुध्द त्यांना आपल्या अधिपत्त्याखाली आणण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न होता. वसाहतींना जिंकून त्यांच्यावर ताबा मिळविण्याच्या योजनेला विरोध करताना बर्क म्हणाले.

“ महोदय, मला हे सांगण्याची परवानगी द्या की, केवळ बळाचा वापर हा तात्पुरताच असतो. काही काळाकरिताच त्याच्यामुळे सत्ता गाजवता येईल. परंतु त्यामुळे पुन्हा त्यांना अधिपत्याखाली ठेवण्यासाठी बळाचा वापर करण्याच्या गरजेला कायमचे दूर करता येणार नाही. ज्या राष्ट्राला कायमचे अधिपत्याखाली ठेवावयाचे आहे त्यावर अशा पध्दतीने शासन करता येत नाही.

माझा दुसरा आक्षेप बळाच्या परिणामकारकतेच्या अनिश्चिततेबाबत आहे. बळाच्या वापरातून नेहमीच दहशत निर्माण होईल असे नाही आणि सुसज्ज सैन्य म्हणजे विजय नव्हे. जर तुम्हाला यश मिळाले नाही तर मग कोणताही मार्ग शिल्लक राहात नाही. वाटाघाटी अपयशी ठरल्यावर फक्त बळाचा वापर उरतो. परंतु बळाचा वापरही अपयशी ठरला तर वाटाघाटीच्या आशाच उरत नाहीत. दयेच्या मोबदल्यात कधी-कधी सत्ता व अधिकार मिळवता येतात. परंतु शक्तिपात व पराभूत झालेल्या हिंसेला भीक म्हणून सत्ता व अधिकार कधीही मागता येत नाही.........

बळाच्या वापराला माझा पुढचा आक्षेप असा आहे की, प्रयत्नांची पराकाष्ठा करुन तुम्ही जे मिळवाल त्याला तुम्ही हानी पोचवाल. तुम्ही जे मिळविता ते त्याच्या मूळ स्वरुपात मिळत नसते. ते अवमूल्यन झालेले, रसातळास गेलेले, उजाड झालेले आणि नाश पावलेल्या स्वरुपात असते. ”

हे बहुमोल शब्द आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष घातक होईल.

हिंदू-मुस्लिम समस्या बळाचा वापर करुन सोडविण्याची योजना जर कुणाच्या मनात असेल, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यासाठी युध्दांचा अवलंब करुन

मुसलमानांना शरणागती पत्करायला लावून संविधानाच्या अधिपत्त्याखाली आणावयाचे असेल, त्यांच्या संमतीशिवाय तयार झालेल्या संविधानास शरण जाण्यासाठी त्यांना बाध्य करण्यात येत असेल तर या देशाला नेहमीसाठी याच प्रयत्नातून गुंतून राहावे लागेल. एकदा मिळालेला विजय हा कायमस्वरुपी असणार नाही.

मी आतापर्यंत जेवढा वेळ घेतला त्यापेक्षा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही आणि पुन्हा बर्कला उद्‌घृत करुन मी माझ्या भाषणाचा समारोप करीन. बर्कने असे कुठेतरी म्हटले आहे की, “ सत्ता देणे सोपे आहे, शहाणपण देणे कठीण आहे. ” या सभेला प्राप्त झालेल्या सार्वभौम अधिकाराचा वापर शहाणपणाने करण्याची आपली तयारी आहे, हे आपण आपल्या आचरणाने सिध्द करु या. देशातील सर्व घटकांना आपल्या सोबत नेण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. एकतेकडे जाण्याचा याशिवाय दुसरा मार्ग नाही. याबाबत आपल्या मनात कुठलीही शंका असता कामा नये. ”

*(संदर्भ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-३, १९४६ ते १९५६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, सन २००२.)*

# भारतीय राज्यघटना : चर्चा आणि मंजुरी

भारतीय घटना समितीची बैठक गुरूवार ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी नवी दिल्ली येथे घटना सभागृहात झाली.

घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी समितीसमोर अभिभाषण केले. समितीचे कामकाज कसे चालावे, कामकाजाचे स्वरूप कसे असेल याबाबतचे विवेचन त्यांनी केले. यानंतर चर्चेला सुरूवात झाली.

दुपारच्या सत्रात अध्यक्षांनी डॉ.आंबेडकर यांना आपला प्रस्ताव मांडण्याची सूचना केली. त्यानुसार डॉ.आंबेडकर यांनी घटनेचा मसुदा घटना समितीच्या विचारार्थ सादर केला.

घटनेचा मसुदा घटना समितीस सादर केल्यानंतर याच दिवशी या मसुद्यावर थोडक्यात सर्वसाधारण चर्चा झाली. या चर्चेस घटनेचे प्रथम वाचन म्हटले जाते. द्वितीय वाचन १५ नोव्हेंबर, १९४८ रोजी सुरू झाले. घटनेच्या द्वितीय वाचनात घटना खंडश: विचारात घेण्यात आली. सदर चर्चा १७ ऑक्टोबर, १९४९ रोजी समाप्त झाली.

घटना समितीची यानंतरची बैठक १४ नोव्हेंबर, १९४९ रोजी तृतीय वाचनासाठी सुरू झाली. ती २६ नोव्हेंबर १९४९ रोजी समाप्त होऊन घटना मंजूर झाल्याचे घोषित करण्यात आले. तद्नंतर समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी घटनेवर स्वाक्षरी केली.

* * * * *

# (२)

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी भारताच्या घटना समिती समोर केलेले भाषण.

---

भारताच्या घटना समितीची बैठक नवी दिल्ली येथील घटना सभागृहात सकाळी अकरा वाजता सुरू झाली. माननीय अध्यक्ष (सन्माननीय डॉ.राजेंद्र प्रसाद) बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

---

## घटनेच्या मसुद्याविषयक प्रस्ताव

**माननीय अध्यक्ष :** आता आपण चर्चेला आरंभ करावा असे मला वाटते. माननीय डॉ.आंबेडकर यांनी आपला प्रस्ताव सादर करावा अशी विनंती मी करतो.

**माननीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर (मुंबई : सर्वसाधारण) :-** माननीय अध्यक्ष महोदय, मसुदा समितीने मंजूर केलेला घटनेचा मसुदा आता मी सादर करतो आणि तो विचारात घेण्यात यावा असा प्रस्ताव मांडतो.

घटना समितीने २९ ऑगस्ट, १९४७ रोजी मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार मसुदा समितीची नियुक्ती करण्यात आली होती. केंद्रीय अधिकार समिती, केंद्रीय घटना समिती, प्रांतिक घटना समिती तसेच मूलभूत हक्क-अल्पसंख्याक-सीमावर्ती प्रदेश सल्लागार समिती आदींच्या अहवालांवर घटना समितीने घेतलेल्या निर्णयांना अनुसरून भारतासाठी एक घटना तयार करण्याची जबाबदारी मसुदा समितीवर सोपविण्यात आली होती.

घटना समितीने असे निर्देश दिले होते की, काही बाबतीत १९३५ च्या भारत सरकार कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यात यावे. मसुदा समितीने केलेले बदल आणि सुचवलेले पर्याय यांचा संदर्भ माझ्या २१ फेब्रुवारी, १९४८ च्या पत्रात देण्यात आला असून तेवढे अपवाद वगळता मसुदा समितीला देण्यात आलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन झाल्याचे आढळेल अशी मला आशा आहे.

मसुदा समितीने तयार केलेला घटनेचा मसुदा हा एक मौलिक दस्तऐवज आहे. त्यात ३१५ कलमे आणि आठ परिशिष्टे आहेत. या मसुद्याएवढी तपशीलवार घटना इतर कोणत्याही देशात करण्यात आलेली नसेल हे मान्य करावेच लागेल. या घटनेचे अध्ययन ज्यांनी केलेले नसेल त्यांना तिची गुणवैशिष्टये आणि ठळक वैशिष्टये समजणे दुरापास्त होईल.

घटनेचा मसुदा जनतेसमोर गेले आठ महिने आहे. या मसुद्यातील तरतुदींवरील प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी मित्रमंडळी, टीकाकार आणि विरोधक यांना पुरेसा अवधी मिळाला होता. त्यापैकी काही प्रतिक्रिया गैरसमज आणि घटनेच्या कलमांचे अपुरे आकलन यांच्यावर आधारित आहेत असे मी म्हणू शकतो. परंतु टीका झालेली असून या टीकेला उत्तर देणे क्रमप्राप्त आहे.

हा मसुदा विचारात घेण्याचा ठराव सादर करताना या दोन कारणांमुळे या घटनेच्या वैशिष्टयांकडे आपले लक्ष वेधणे आणि टीकेला उत्तर देणे मी आवश्यक समजतो.

याबाबत बोलण्यापूर्वी घटना समितीचे नियुक्त केलेल्या तीन समित्यांचे अहवाल मी आपणाला सादर करू इच्छितो : (१) मुख्य आयुक्त शासित प्रांत समितीचा अहवाल (२) केंद्र आणि राज्य आर्थिक संबंध तज्ञ समितीचा अहवाल आणि (३) आदिवासी प्रदेश सल्लागार समितीचा अहवाल. हे अहवाल विलंबाने आल्यामुळे घटना समिती त्यांवर विचार विनिमय करू शकली नसली, तरी त्यांच्या प्रती समितीच्या सदस्यांना वितरित करण्यात आल्या आहेत. हे अहवाल आणि त्यांच्या शिफारशी यांवर मसुदा समितीने विचारविनिमय केलेला असल्याने ते सभागृहाला सादर करणे युक्त ठरणार आहे.

आता मी मुख्य प्रश्नाकडे वळतो. एखाद्या घटनेची प्रत संविधान अभ्यासकाच्या हाती दिल्यास दोन प्रश्न तो हमखास विचारेल. पहिला प्रश्न म्हणजे या घटनेत कोणत्या स्वरूपाचे सरकार अभिप्रेत आहे आणि दुसरा प्रश्न म्हणजे या घटनेचे स्वरूप काय आहे ? कारण कोणत्याही घटनेला या दोन कळीच्या प्रश्नांचा परामर्श घ्यावाच लागतो. यापैकी पहिल्या प्रश्नावर मी आता बोलणार आहे.

प्रस्तावित घटनेत भारतीय संघराज्याच्या केंद्रस्थानी असणाऱ्यासाठी राष्ट्रपती असे संबोधन वापरण्यात येईल. या संबोधनामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोळयासमोर येतील. परंतु नामसाधर्म्य सोडल्यास अमेरिकेतील सरकार आणि भारतातील प्रस्तावित सरकारचे स्वरूप यांच्यात काहीही साम्य नाही. अमेरिकेतील शासन प्रणालीला अध्यक्षीय शासन प्रणाली म्हणतात. आपल्या प्रस्तावित घटनेत संसदीय लोकशाहीचा प्रस्ताव आहे. या दोन्ही प्रणाली मूलत:च भिन्न आहेत.

अमेरिकेतील अध्यक्षीय प्रणालीत अध्यक्ष हेच शासनाचे प्रमुख असतात. प्रशासनाचे सर्व अधिकार त्यांच्या हाती असतात. आपल्या प्रस्तावित घटनेत राष्ट्रपतींचे स्थान ब्रिटिश घटनेतील राजाच्या स्थानासमान आहे. ते राष्ट्रप्रमुख असतील परंतु शासन यंत्रणेचे (कार्यपालिका) प्रमुख नसतील. ते राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील परंतु त्याचे प्रशासन करणार नाहीत. ते राष्ट्राचे प्रतीक असतील, ज्यायोगे राष्ट्राचे निर्णय घोषित करण्यात येतील असे शोभेचे स्थान त्यांना देण्यात येईल. अमेरिकन प्रणालीत अध्यक्षांच्या हाताखाली विविध विभागांचे सचिव असतात. त्याच धर्तीवर भारताच्या राष्ट्रपतींच्या हाताखाली विविध विभागांच्या प्रशासनाचे प्रमुख असणारे मंत्री असतील. मात्र येथेही या दोहोंत एक मूलभूत फरक राहणार आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांवर त्यांच्या कोणत्याही सचिवाचा सल्ला मानण्याचे बंधन नसते. भारताचे राष्ट्रपती मात्र सर्वसाधारणपणे आपल्या मंत्र्यांचा सल्ला मानतील. भारताच्या राष्ट्रपतींना मंत्र्यांच्या सल्ल्याविरूद्ध अथवा मंत्र्यांच्या सल्ल्याविना कोणतीही कृती करता येणार नाही. अमेरिकेचे अध्यक्ष कोणत्याही सचिवाला कधीही बडतर्फ करू शकतात. मात्र संसदेतील बहुमत जोपर्यंत मंत्र्यांच्या पाठी आहे तोपर्यंत भारताच्या राष्ट्रपतींना असे करण्याचा अधिकार नसेल.

अमेरिकेची अध्यक्षीय प्रणाली कार्यपालिका आणि विधिपालिका (काँग्रेस) या दोहोंवर आधारलेली आहे. म्हणजेच अध्यक्ष अथवा त्यांचे सचिव काँग्रेसचे सदस्य नसतात. मात्र आपल्या प्रस्तावित घटनेला हे तत्व मान्य नाही. भारतीय संघराज्याचे मंत्री संसदेचे सदस्य असतील. केवळ संसद सदस्यच मंत्री होऊ शकतील. मंत्र्यांना अन्य संसद सदस्यांप्रमाणेच अधिकार असतील; म्हणजे ते संसदेत बसू शकतील, चर्चेत भाग घेऊ शकतील आणि मतदान करून शकतील. दोन्ही प्रणाली लोकशाहीवर आधारित असून त्यापैकी कोणती एक निवडायची हा निर्णय अत्यंत कठीण होता. लोकशाहीतील कार्यपालिकेला दोन अटी पूर्ण कराव्या लागतात : (१) ही कार्यपालिका स्थिर असली पाहिजे, आणि (२) ही कार्यपालिका उत्तरदायी असली पाहिजे. तथापि या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करू शकणारी प्रणाली दुर्दैवाने आजवर विकसित झालेली नाही. आपल्याला एकतर अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व असलेली प्रणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल. अमेरिकी आणि स्विस प्रणालीमध्ये अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्व आहे. याउलट ब्रिटिश प्रणालीत अधिक उत्तरदायित्व परंतु कमी स्थैर्य आहे. याचे कारण स्पष्ट आहे.

अमेरिकी प्रणालीतील कार्यपालिका संसदबाह्य आहे. याचा अर्थ असा की आपल्या अस्तित्वासाठी ही कार्यपालिका काँग्रेसमधील (विधिपालिकेमधील) बहुमतावर अवलंबून नसते. परंतु ब्रिटिश प्रणालीतील कार्यपालिका संसदेतील बहुमतावर आपल्या अस्तित्वासाठी अवलंबून असते. नेमक्या याच कारणास्तव अमेरिकी काँग्रेस कार्यपालिका बडतर्फ करू शकत नाही. मात्र संसदीय प्रणालीतील सरकारला संसदेतील बहुमत गमावता क्षणीच राजीनामा द्यावा लागतो. या दृष्टीकोणातून पाहता संसदबाह्य कार्यपालिका संसदेवर अवलंबून नसल्याने विधिपालिकेप्रती कमी जबाबदार असण्याची प्रवृत्ती आढळते तर याउलट संसदीय प्रणालीतील कार्यपालिकेत अधिक जबाबदारीची प्रवृत्ती आढळते कारण ती संसदेतील बहुमतावर अवलंबून असते. या दोन्ही प्रणालींमध्ये जबाबदारीच्या जाणीवेखेरीज आणखी एक फरक आहे. तो म्हणजे त्यांनी जबाबदारी कशी पार पाडली, याचा लेखाजोखा

घेण्याचा आणि तो घेणाऱ्या यंत्रणेचा संसदेतर प्रणालीमध्ये, *उदा.* अमेरिका, हा लेखाजोखा निश्चित कालावधीनंतर घेण्यात येतो आणि तो मतदारांमार्फत घेण्यात येतो. संसदीय प्रणाली असलेल्या इंग्लंडमध्ये कार्यपालिकेचा लेखाजोखा दररोज आणि नियत कालावधीनंतर घेतला जात असतो. दैनंदिन लेखाजोखा संसद सदस्य प्रश्न विचारून, ठरावांच्या माध्यमातून, अविश्वास ठराव, स्थगन प्रस्ताव आणि भाषणांवरील चर्चेच्याद्वारे घेत असतात. नियतकालिक लेखाजोखा मतदार निवडणुकांच्या माध्यमातून दर पाच वर्षांनी किंवा त्यापूर्वी घेत असतात. अमेरिकेत अस्तित्वात नसलेला जबाबदारीचा दैनंदिन लेखाजोखा अधिक प्रभावी मानला जातो आणि भारतासारख्या देशाला जास्त गरजेचा समजण्यात येतो. प्रस्तावित घटनेत कार्यपालिकेसाठी संसदीय प्रणालीची शिफारस करताना अधिक स्थैर्यापेक्षा अधिक उत्तरदायित्वाला पसंती देण्यात आली आहे.

आतापर्यंत मी प्रस्तावित घटनेतील शासन प्रणालीबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. आता मी दुसऱ्या प्रश्नाकडे, म्हणजे घटनेच्या स्वरूपाबद्दल बोलणार आहे.

इतिहासाला दोन प्रमुख प्रकारच्या घटना ज्ञात आहेत-एकात्मिक आणि संघराज्यात्मक. एकात्मिक घटनेची दोन वैशिष्टये आहेत : (१) मध्यवर्ती राज्यसत्तेचे सर्वश्रेष्ठत्व आणि (२) दुय्यम राज्यसत्तांच्या सार्वभौमत्वाचा अभाव. याउलट संघराज्यात्मक घटनेची दोन वैशिष्टये म्हणजे : (१) मध्यवर्ती राज्यसत्ता आणि दुय्यम राज्यसत्ता यांचे सहअस्तित्व आणि (२) प्रत्येक सत्ता आपापल्या निर्देशित क्षेत्रात सार्वभौम असणे. वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की संघराज्य म्हणजे दुहेरी राज्यसत्तेची स्थापना. प्रस्तावित घटना संघराज्यात्मक स्वरूपाची आहे कारण तिच्या अंतर्गत दुहेरी राज्यसत्ता स्थापन करण्यात येणार आहे. प्रस्तावित घटनेच्या अंतर्गत केंद्रस्थानी मध्यवर्ती राज्यसत्ता असेल आणि तिच्याभोवती राज्ये असतील. घटनेने निर्देशित केलेल्या क्षेत्रांमध्ये या दोन्ही सत्तांना सार्वभौम अधिकार देण्यात येतील. ही दुहेरी राज्यसत्ता अमेरिकी घटनेच्या धर्तीवर आहे. अमेरिकी प्रणालीसुद्धा दुहेरी राज्यसत्तेची असून तिच्यात मध्यवर्ती सरकार आणि राज्ये आहेत; प्रस्तावित घटनेतही मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारे अशीच तत्सम

रचना आहे. अमेरिकी घटनेत मध्यवर्ती सरकार केवळ राज्यांचा संघ नाही आणि राज्यांनाही केवळ प्रशासकीय घटक अथवा मध्यवर्ती सरकारच्या यंत्रणा असे स्थान दिलेले नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित भारतीय घटना म्हणजे केवळ राज्यांचा संघ नाही आणि राज्ये म्हणजेही मध्यवर्ती सरकारचे प्रशासकीय घटक अथवा प्रतिनिधी नव्हेत. भारतीय आणि अमेरिकी घटनांमधील साम्य येथे समाप्त होते. त्यांचे परस्परांपासून वेगळेपण दाखवणारे फरक आणखी मूलभुत आणि ठळक आहेत.

अमेरिकी संघराज्य आणि भारतीय संघराज्य यांच्यात दोन प्रमुख फरक आहेत. अमेरिकेत दुहेरी राज्यसत्तेप्रमाणे दुहेरी नागरिकत्वाचाही अवलंब करण्यात येतो. अमेरिकेत देशाच्या नागरिकत्वाप्रमाणेच राज्याचेही नागरिकत्व असते. अमेरिकी घटनेला करण्यात आलेल्या चौदाव्या दुरूस्तीनंतर हा दुहेरी नागरिकत्वाचा जाच मोठ्या प्रमाणात नाहीसा झाला आहे. कारण या दुरूस्तीमुळे अमेरिकी नागरिकांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण काढून घेण्यास राज्यांना मनाई करण्यात आली आहे. तथापि श्री.विल्यम अँडरसन यांनी विशद केल्यानुसार मतदानाचा अधिकार, सार्वजनिक पद धारण करणे आणि अन्य काही राजकीय विषयांमध्ये राज्ये आपल्या नागरिकांना अनुकूल ठरू शकेल अशा प्रकारे भेदभाव करू शकतात आणि करतातही. हा पक्षपात काही प्रकरणी याच्याही पुढे जातो. एखाद्या राज्यात किंवा स्थानिक प्रशासन संस्थेत नोकरी मिळवण्यासाठी बहुतेक प्रसंगी स्थानिक रहिवासी अथवा नागरिक असणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे कायदा अथवा वैद्यकीय व्यवसायाचा परवाना मिळविण्यासाठी राज्यातील निवास अथवा नागरीकत्व बहुदा वारंवार आवश्यक असते. तसेच ज्या व्यवसायांसाठी सार्वजनिक नियंत्रण कठोर असणे जरूरीचे असते अशा म्हणजे मद्यविक्री, समभाग किंवा रोखे विक्रीबाबत अशा अटी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत.

प्रत्येक राज्याला आपापल्या क्षेत्रात काही अधिकार असून आपल्या नागरिकांना विशेष लाभ देण्यासाठी त्यांचा वापर करण्यात येतो. एकप्रकारे त्या-त्या राज्यातील वन्य प्राणी आणि मासे यांच्यावर संबंधित राज्याचे स्वामित्व असते. इतर राज्यांमधून

येणाऱ्या नागरिकांकडून शिकार आणि मासेमारी परवाना देताना आपल्या राज्यातील नागरिकांपेक्षा अधिक शुल्क घेण्याची प्रथा आहे. तसेच राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून अनिवासी अर्जदारांना अधिक शिक्षण शुल्क आकारण्यात येते तर राज्यातील रूग्णालये आणि मनोरूग्ण उपचार केंद्रांमध्ये आणीबाणीची अवस्था वगळता केवळ राज्यातील निवासींनाच दाखल करून घेण्यात येते.

थोडक्यात म्हणजे एखादे राज्य आपले नागरिक किंवा निवासी यांना देत असलेले अनेक अधिकार अनिवासींना कायदेशीररित्या नाकारू शकते अथवा नाकारते किंवा निवासींपेक्षा अधिक कठोर अटी लादून अनिवासींना उपलब्ध करते. राज्यातील नागरिकांना देण्यात येणारे हे लाभ राज्य नागरिकत्वाचे खास अधिकार असतात. एकंदरीत पाहता एखाद्या राज्याचे नागरिक आणि इतर लोकांच्या अधिकारात बरीच तफावत असते. फिरस्ता आणि तात्पुरता रहिवासी प्रत्येक ठिकाणी हा खास भेदभाव अनुभवत असतो.

प्रस्तावित भारतीय घटनेत दुहेरी राज्यसत्ता असून त्यामध्ये एकच नागरिकत्व देण्यात आलेले आहे. संपूर्ण भारतासाठी एकच नागरिकत्व असणार आहे. ते भारतीय नागरिकत्व असेल. राज्य नागरिकत्व ठेवण्यात आलेले नाही. प्रत्येक भारतीयाला, तो कोणत्याही राज्याचा निवासी असला तरी, नागरिकत्वाचे समान अधिकार आहेत.

प्रस्तावित घटनेत भारत आणि अमेरिकी यांच्या दुहेरी राज्यसत्ता संकल्पनेत आणखी एक फरक आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती घटना आणि राज्यांच्या घटना यांच्यातील दुवा सैल आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती आणि राज्य सरकार यांच्या संबंधांबाबत 'ब्राईस' म्हणतो :-

" *एकाच भूखंडावर एक मोठी इमारत असावी, तिच्याभोवती अनेक छोट्या इमारती असाव्यात आणि या सर्व इमारती परस्परांपासून भिन्न दिसाव्यात तसेच मध्यवर्ती अथवा राष्ट्रीय सरकार आणि राज्य सरकारे यांचे आहे......* "

अमेरिकेतील राज्य सरकारे मध्यवर्ती सरकारपेक्षा किती भिन्न आहेत ? या भिन्नतेची कल्पना पुढील वस्तुस्थितीवरून येऊ शकेल :-

*१. सरकारचे प्रजासत्ताक हे स्वरूप कायम राखून प्रत्येक राज्याला आपली घटना तयार करण्याचे स्वातंत्र्य अमेरिकेत आहे.*

*२. मध्यवर्ती सरकारपासून कोणत्याही राज्याच्या नागरिकांना आपली घटना बदलण्याचा कायमस्वरूपी स्वतंत्रपणे अधिकार आहे.*

पुनश्च एकवार 'ब्राईस' च्या शब्दांत सांगायचे म्हणजे :-

"*(अमेरिकेतील) कोणतेही राज्य त्याच्या घटनेमुळे राष्ट्रकुल म्हणून अस्तित्वात असते आणि सर्व राज्यसत्ता - विधिपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका - घटनेची निर्मिती असून घटनेच्या आधीन असते.* "

हे भारताच्या प्रस्तावित घटनेला लागू पडणार नाही. कोणत्याही राज्याला (निदान खंड एक मधील) स्वत:ची घटना तयार करण्याचा अधिकार नसेल. मध्यवर्ती घटना आणि राज्यांची घटना एकाच चौकटीत असेल आणि त्यातून कोणालाही बाहेर पडता येणार नाही, तसेच या चौकटीतच त्यांना काम करावे लागेल.

आतापर्यंत मी अमेरिकी संघराज्य आणि प्रस्तावित भारतीय संघराज्य यांच्यातील फरक दाखविला आहे. परंतु प्रस्तावित भारतीय संघराज्याची काही खास वैशिष्टये केवळ अमेरिकी संघराज्यच नव्हे तर इतर सर्व संघराज्यांपेक्षा वेगळेपण अधोरेखित करतात. अमेरिकेसह सर्व संघराज्यीय प्रणाली संघराज्याच्या कठोर चौकटीत बंदिस्त आहेत. परिस्थिती कशीही असो, या चौकटीचे स्वरूप अथवा आकार बदलत नाहीत. ही प्रणाली कदापि एकात्मिक होऊ शकत नाही. याउलट आपली प्रस्तावित घटना काळ आणि परिस्थिती यांच्या गरजेनुसार एकात्मिक आणि संघराज्यात्मक अशी दोन्ही रूपे धारण करू शकते. सर्वसामान्य परिस्थितीत संघराज्यात्मक प्रणाली म्हणून ती अंमलात असावी अशी रचना केलेली आहे. परंतु युद्धकाळात ती एकात्मिक प्रणाली असल्यासारखी काम करू शकेल अशी व्यवस्था केलेली आहे.

एकदा भारताच्या राष्ट्रपतींनी कलम २७५ च्या तरतुदीनुसार आपले अधिकार वापरून उद्‌घोषणा केली की संपूर्ण चित्र बदलते आणि आपली प्रणाली एकात्मिक होऊन जाते. मध्यवर्ती सरकारला इच्छा असल्यास उद्‌घोषणेद्वारा पुढील बाबी साध्य करता येतात : (१) राज्य सूचीत असलेल्यांसह कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा अधिकार स्वत:कडे घेणे (२) राज्यांच्या अखत्यारीत असलेल्या विषयांबाबत त्यांनी आपले कार्यकारी अधिकार कशाप्रकारे वापरावे याबाबतचे निर्देश देण्याचे अधिकार स्वत:कडे घेणे (३) कोणत्याही कारणासाठी कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्याचे अधिकार स्वत:कडे घेणे, आणि (४) घटनेच्या अर्थविषयक तरतुदी स्थगित करण्याचे अधिकार स्वत:कडे घेणे. अशाप्रकारे स्वत:चे रूपांतर एकात्मिक राज्यसत्तेत करण्याचे अधिकार इतर कोणत्याही संघराज्यात अस्तित्वात नाहीत. आपली प्रस्तावित घटना आणि आपल्याला ज्ञात असलेली इतर सर्व संघराज्ये यांच्यात हा फरक आहे.

प्रस्तावित भारतीय संघराज्य आणि इतर संघराज्ये यांच्यात हा एकमेव फरक नाही. संघराज्यात्मकतेचे वर्णन "दुर्बल नाही परंतु क्षीण" शासकीय प्रणाली असे करण्यात येते. संघराज्याच्या दोन दुर्बलता मानण्यात येतात. पहिली म्हणजे कठोरता आणि दुसरी म्हणजे अधिनियमबद्धता. हे दोष संघराज्यात्मकतेमध्ये अंगभूत आहेत याबाबत दुमत नाही. संघराज्याची घटना केवळ लिखितच असू शकते आणि लिखित घटना केवळ कठोरच असू शकते. संघराज्यात्मक घटना म्हणजे मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारे यांच्यातील सार्वभौमत्वाची घटनाविषयक कायद्याने केलेली विभागणी आणि अशा विभागणीचे दोन अटळ परिणाम :- (१) राज्यांवर सोपवलेल्या क्षेत्रांमध्ये मध्यवर्ती सरकारने आक्रमण करणे किंवा याउलट घडणे म्हणजे घटनेचा भंग आणि (२) असा भंग झाल्यास त्याबाबतचा निवाडा न्यायपालिकेने देणे. संघराज्यात्मकतेचे हे स्वरूप असल्याने अमेरिकेच्या घटनेत याचा प्रकर्षाने प्रत्यय येतो.

संघराज्यात्मक प्रणालीतील अंगभूत कठोरता आणि अधिनियमबद्धता यांच्यामुळे होणारी हानी कमी करण्याचा प्रयत्न नंतरच्या काळात संघराज्यात्मकतेचा स्वीकार

केलेल्या राष्ट्रांनी केलेला आहे. यासंदर्भात ऑस्ट्रेलियाचे उदाहरण उद्‌बोधक ठरेल. आपले संघराज्य कमी कठोर करण्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या घटनेत पुढील उपयांचा अवलंब करण्यात आला आहे.:-

१. संसदेला समाईक कायदे करण्याचा व्यापक अधिकार आणि विशेष कायदे करण्याचा थोडा अधिकार, आणि

२. घटनेच्या काही कलमांना तात्पुरती मुदत देणे आणि " संसदेने अन्यथा तरतूद " करेपर्यंत ती कलमे अंमलात आणणे.

यावरून असे स्पष्ट होईल की अमेरिकी कॉंग्रेसच्या अधिकारात नसलेल्या अनेक गोष्टी ऑस्ट्रेलियाच्या संसदेला ऑस्ट्रेलियाच्या घटनेनुसार करता येतील. या गोष्टी करायच्या असल्यास अमेरिकी सरकारला सर्वोच्च न्यायालयाचा आसरा घ्यावा लागेल आणि असे अधिकार वापरण्यासाठी आवश्यक ते तत्व शोधून काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची क्षमता, कल्पकता आणि तयारी यांच्यावर अवलंबून रहावे लागेल.

कठोरता आणि अधिनियमबद्धता यांच्या बंधनांवर मात करण्यासाठी आपल्या प्रस्तावित घटनेत ऑस्ट्रेलियातील तरतुदींचा वापर ऑस्ट्रेलियापेक्षाही फार अधिक प्रमाणात करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाच्या घटनेप्रमाणे या प्रस्तावित घटनेतही समवर्ती सूचीमधील विषयांची यादी मोठी आहे. ऑस्ट्रेलियाच्या समवर्ती सूचीत ३९ विषय आहेत. आपल्या प्रस्तावित घटनेत असे ३७ विषय आहेत. ऑस्ट्रेलियाच्या घटनेच्या धर्तीवर प्रस्तावित घटनेतील सहा कलमे तात्पुरत्या स्वरूपाची असून संसदेच्या इच्छेनुसार कालानुरूप तरतुदींचा समावेश करण्यासाठी मूळ तरतुदी कोणत्याही वेळी प्रसंगानुरूप कधीही बदलता येतील. ऑस्ट्रेलियाच्या घटनेपुढे जाणारे प्रस्तावित घटनेतील सर्वात मोठे पाऊल म्हणजे संसदेला विशेष (Exclusive) कायदे करण्याचा देण्यात आलेला अधिकार. विशेष कायदे करण्याचा ऑस्ट्रेलियाच्या संसदेचा अधिकार तीन बाबींपुरता मर्यादित असून प्रस्तावित घटनेत असा अधिकार ९१ बाबींबाबत असावा असे सुचविण्यात आले आहे. स्वभावत: कठोर असलेल्या संघराज्यात्मक प्रणालीत प्रस्तावित घटनेने अशा प्रकारे शक्य असलेली कमाल लवचिकता आणलेली आहे.

प्रस्तावित घटना ऑस्ट्रेलियाच्या घटनेचे अनुकरण करते अथवा तिचे मोठ्या प्रमाणावर अनुकरण करते एवढेच म्हणणे पुरेसे होणार नाही. येथे या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे की संघराज्यात्मक प्रणालीतील कठोरता आणि अधिनियमबद्धता टाळण्यासाठी अभिनव मार्गाचा अवलंब करण्यात आलेला असून हे प्रस्तावित घटनेचे वैशिष्ट्य अन्यत्र कोठेही सापडणार नाही.

पहिले म्हणजे निव्वळ प्रांतिक विषयांबाबतचे फायदे सर्वसामान्य काळात करण्याचा संसदेला दिलेला अधिकार. मी २२६, २२७ आणि २२९ या कलमांचा उल्लेख करत आहे. एखादा विषय राज्यांच्या अखत्यारीत असला आणि तरीही त्याबाबतचा अधिकार केंद्राने वापरावा असा प्रस्ताव वरिष्ठ सभागृहाने २/३ बहुमताने मंजूर केल्यास आणि असा विषय केवळ प्रांतिक महत्वाचा न राहता राष्ट्रीय महत्वाचा बनल्यास कलम २२६ अंतर्गत संसद अशा विषयावर कायदा करू शकेल. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात संसदेला असाच अधिकार कलम २२७ अन्वये देण्यात आला आहे. याच अधिकाराचा वापर करण्यास प्रांतांची संमती असल्यास कलम २२९ अंतर्गत संसदेला तसे करता येईल. यापैकी अखेरची तरतूद ऑस्ट्रेलियाच्या घटनेत असली तरी पहिल्या दोन तरतुदी म्हणजे प्रस्तावित घटनेची वैशिष्ट्य आहेत.

कठोरता आणि अधिनियमबद्धता टाळण्यासाठी केलेला दुसरा उपाय म्हणजे घटनादुरूस्ती सुलभ व्हावी म्हणून केलेली तरतूद. घटना दुरूस्तीविषयक तरतुदींची विभागणी घटनेत दोन गटांमध्ये करण्यात आली आहे. एका गटात पुढील कलमे ठेवण्यात आली आहेत. (अ) केंद्र आणि राज्ये यांच्यातील कायदे करण्याबाबतच्या अधिकारांची विभागणी (ब) राज्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व, आणि (क) न्यायालयांचे अधिकार. अन्य सर्व कलमे दुसऱ्या गटात ठेवण्यात आली आहेत. दुसऱ्या गटातील कलमांनी घटनेचा मोठा भाग व्यापला आहे आणि संसदेतील दुहेरी बहुमताने ती दुरूस्ती करता येतील. याचा अर्थ असा की संसदेच्या प्रत्येक सभागृहात उपस्थित सदस्यांपैकी दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसेल इतक्या उपस्थितीने आणि मतदानाने तसेच प्रत्येक सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येपैकी बहुमताने. या कलमांच्या

दुरूस्तीस राज्यांची संमती आवश्यक नसेल. केवळ पहिल्या गटातील कलमांच्या दुरूस्तीसाठी जादा सुरक्षा म्हणून राज्यांची संमती आवश्यक आहे.

त्यामुळे भारतीय संघराज्य कठोरता आणि अधिनियमबद्धता या दोषांनी ग्रस्त होणार नाही असे कोणालाही सहजपणे म्हणता येईल. या संघराज्याचे वैशिष्ट्य म्हणजे हे लवचिक संघराज्य आहे.

इतर संघराज्यांपेक्षा वेगळेपण दाखवणारे आणखी एक खास वैशिष्ट्य प्रस्तावित भारतीय संघराज्यात आहे. एखादे संघराज्य स्वाभाविकत: स्वतंत्र विधिपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्या अधिकार विभाजनामुळे कायदे, प्रशासन आणि न्यायिक संरक्षण यांच्याबाबतीत विविधतापूर्ण असते. एका मर्यादेपर्यंत या वैविध्यामुळे फरक पडत नाही. स्थानिक गरजा आणि स्थानिक परिस्थिती यांच्यानुसार सरकारचा सत्ता वापरण्याचा प्रयत्न म्हणून त्याचे स्वागतही करता येईल. परंतु ही विविधता एका मर्यादेपलिकडे गेल्यास निर्णायकी निर्माण करू शकते आणि अनेक संघराज्यांमध्ये असा गोंधळ निर्माण झालेला आहे. भारतात २० राज्ये निर्माण झाली आणि विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, कौटुंबिक नातेसंबंध, करार, हानी, गुन्हे, वजने आणि मापे, धनादेश आणि बिले, बँकिंग आणि वाणिज्य आदींबाबत २० वेगवेगळे कायदे झाले, न्याय मागण्याच्या २० प्रक्रिया निर्माण झाल्या आणि २० प्रशासकीय पद्धती असल्या तर काय गोंधळ माजेल याचा केवळ विचारच केलेला बरा. यामुळे केवळ राष्ट्रच दुर्बल होत नसून एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर करणाऱ्या नागरिकांबाबतही असहिष्णु होते, कारण एका राज्यात कायदेशीर असणारी बाबी दुसऱ्या राज्यात बेकायदा असल्याचे त्याला आढळते. घटनेच्या मसुद्याने साधने आणि पद्धती यांच्यात एकात्मता आणण्याचा प्रयत्न केला आहे ज्यायोगे भारतात एकाच वेळी संघराज्य असेल आणि देशाचे ऐक्य टिकवण्यासाठी

आवश्यक मूलभूत बाबींमध्ये समानता असेल. मसुदा समितीने तीन साधनांचा अवलंब केलेला आहे:-

*(१) एकच न्याययंत्रणा,*

*(२) दिवाणी आणि गुन्हेगारी विषयक मूलभूत कायद्यांमध्ये समानता, आणि*

*(३) महत्वाच्या पदांची जबाबदारी सांभाळण्यासाठी समाईक अखिल भारतीय नागरी सेवा.*

संघराज्यात अंगभूत असणाऱ्या दुहेरी राज्यसत्तेचा तर्कशुद्ध परिणाम म्हणजे दुहेरी न्याय यंत्रणा, कायदे आणि नागरी सेवा यांचे द्वैत. अमेरिकेत मध्यवर्ती न्याययंत्रणा आणि राज्यांच्या न्याययंत्रणा भिन्न आणि एकमेकांपासून स्वतंत्र असतात. भारतीय संघराज्य म्हणजे दुहेरी प्रणाली असली तरी त्यात दुहेरी न्याययंत्रणा अजिबात असणार नाही. उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय येथे एकच एकात्म न्याययंत्रणा असेल जिचे अधिकारक्षेत्र घटनाविषयक, दिवाणी अथवा फौजदारी अशा सर्व प्रकारच्या दाव्यांना लागू राहील आणि त्याबाबतचे उपाय ही न्याययंत्रणा उपलब्ध करील. दाद मागण्याच्या प्रक्रियेतील भिन्नता समाप्त करण्यासाठी असे करण्यात आले आहे. कॅनडा हा एकमेव देश याबाबतीत प्रस्तावित घटनेच्या निकट आहे. ऑस्ट्रेलियातील पद्धत केवळ समान दिसते.

नागरी जीवन आणि उद्योग-व्यवसाय यांच्या पायाभूत कायद्यांमधील सर्व भिन्नता नाहीशी करण्याची काळजी घेण्यात आली आहे. नागरी प्रक्रिया संहिता, गुन्हेगारी प्रक्रिया संहिता, पुरावा कायदा, मालमत्ता हस्तांतरण कायदा, विवाह-घटस्फोट-वारसाहक्क कायदा आदींचा समावेश समवर्ती सूचीत करण्यात आला आहे ज्यायोगे संघराज्यात्मक प्रणालीला धक्का न लावता आवश्यक त्या एकसमानतेचे जतन करता येईल.

संघराज्यात्मक प्रणालीतील दुहेरी राज्यसत्तेत मी म्हटल्याप्रमाणे दुहेरी सेवा सर्व संघराज्यांमध्ये आढळते. मध्यवर्ती नागरी सेवा आणि राज्य नागरी सेवा अशी

रचना सर्व संघराज्यांमध्ये असते. भारतीय संघराज्यातही दुहेरी राज्यसत्ता व दुहेरी सेवा असेल परंतु त्यास एक अपवाद असेल. प्रशासनाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक देशात मोक्याची म्हणता येतील अशी काही पदे प्रशासनात असतात. काही प्रशासनाच्या विशाल आणि गुंतागुंतीच्या यंत्रणेत अशी पदे ओळखणे सोपे नसू शकेल. परंतु अशा मोक्याच्या पदांवर नेमलेल्या सनदी अधिकाऱ्यांच्या गुणवत्तेवर प्रशासनाचा दर्जा अवलंबून असतो याबाबत शंका नसावी. आपल्या सुदैवाने संपूर्ण देशासाठी समाईक असणाऱ्या सनदी सेवा यंत्रणेचा वारसा आपल्याला प्राप्त झाला आहे आणि अशा महत्वाच्या पदांची माहिती आपल्याला आहे. राज्यांचा राज्यस्तरीय सनदी सेवा निर्माण करण्याचा अधिकार काढून न घेता घटनेत केलेल्या तरतुदीनुसार देशात एक भारतीय नागरी सेवा असेल. जिच्यात पूर्णत: राष्ट्रीय स्तरावर भरती करण्यात येईल, समान अर्हता असेल, वेतनमान समान असेल आणि देशभरातील या महत्वाच्या पदांवर केवळ याच सेवेतील अधिकारी नेमता येतील.

प्रस्तावित संघराज्याची ही खास वैशिष्ट्य आहेत. आता मी टीकाकारांनी याबाबत काय म्हटले आहे याचा परामर्श घेतो.

असे म्हटले गेले आहे की प्रस्तावित घटनेत काहीच नवीन नाही, त्यातील जवळपास निम्मा भाग १९३५ च्या भारत सरकार कायद्याची नक्कल आहे आणि उर्वरित भाग इतर देशांच्या घटनांमधून उसना घेण्यात आला आहे, अगदी थोडा अंश अस्सल आहे. जगाच्या इतिहासात या घटकेला तयार करण्यात आलेल्या घटनेत नवे काय असू शकते, असा प्रश्न यासंदर्भात विचारता येईल. पहिली लिखित घटना लिहिण्याला शंभरावर वर्षे होऊन गेली आहेत. त्यानंतर अनेक देशांनी आपल्या घटना लिखित स्वरूपात शब्दबद्ध केल्या आहेत. घटनेचा आवाका काय असावा याचा निर्णय घेऊन बराच काळ लोटला आहे. त्याचप्रमाणे घटनेची मूलभूत तत्वे काय असावीत याबाबतही जगभर मान्यता मिळालेली आहे. ही वस्तुस्थिती पाहता सर्व घटना त्यांच्या प्रमुख तरतुदींबाबत एकसारख्याच दिसणार. त्यात जर नाविन्य असलेच तर ते एवढेच असेल की एवढ्या उशीरा तयार

केलेल्या घटनेतील बदल आधीचे दोष दूर करणारे असतील आणि त्या देशाच्या गरजा पूर्ण करणारी ही घटना असेल.

प्रस्तावित घटनेच्या अपुऱ्या अभ्यासामुळेच इतर देशांच्या घटनांची सहीसही नक्कल केल्याचा आरोप झाला आहे अशी मला खात्री आहे. प्रस्तावित घटनेत नवीन काय आहे हे मी दाखवून दिले आहे. मला असे नक्की वाटत आहे की मसुदा समितीने आपली जबाबदारी पार पाडताना अशी आंधळी नक्कल आणि गुलामी वृत्तीचे अनुकरण केलेले नाही, ही बाब इतर घटनांचे अभ्यासक आणि या प्रश्नाकडे तटस्थ वृत्तीने पाहण्यास तयार असणारे सर्वजण मान्य करतील.

प्रस्तावित घटनेत १९३५ च्या भारत सरकार कायद्यातील तरतुदींचा बराच भाग घेतला असल्याच्या आरोपाबाबत मी क्षमायाचना करणार नाही. उसने घेण्याची लाज वाटण्याची गरज नाही. हे कोणत्याही प्रकारचे वाङ्मय चौर्य नाही. घटनेच्या मूलभूत तत्वांवर कोणाचाही मालकी हक्क नसतो. माझी खंत एवढीच आहे की १९३५ च्या भारत सरकार कायद्यातून घेतलेल्या तरतुदी बव्हंशी प्रशासकीय तपशीलासंबंधीच आहेत. घटनेत प्रशासकीय तपशीलाला स्थान नसावे हे मला मान्य आहे. हा समावेश घटनेत त्यांचा समावेश करण्याचे टाळण्याचा एखादा मार्ग मसुदा समितीला सापडावा अशी मला फार इच्छा आहे. परंतु या समावेशाच्या समर्थनार्थ हे जरूर म्हणावे लागेल. ग्रीसमधील इतिहासकार ‘ग्रोटे’ म्हणतो:-

“ *स्वतंत्र आणि त्याचबरोबर शांततामय सरकार असण्यासाठी अनिवार्य अट म्हणजे घटनात्मक नैतिकतेचा प्रसार कोणत्याही एका वर्गातील बहुतांश सदस्यांमध्ये होणे पर्याप्त ठरणार नाही, तो प्रत्येक सदस्यापर्यंत झाला पाहिजे, कारण एखादा सामर्थ्यवान परंतु अडेलतट्टू अल्पसंख्य गट आपली स्वत:ची प्रगती घडवण्याएवढा सक्षम नसला तरी तो स्वतंत्र संस्थेचे कामकाज अव्यवहार्य करून टाकू शकेल.* ”

‘ घटनात्मक नैतिकता’ या शब्दप्रयोगाद्वारे ‘ग्रोटे’ ला असे म्हणायचे आहे की “घटनेच्या ढाच्याबद्दल असीम आदरभाव, या ढाच्यानुसार कार्य करणाऱ्या सत्तेचे आज्ञापालन मात्र त्याचबरोबर मुक्तपणे बोलण्याची सवय, निश्चित कायद्याच्या मर्यादेत कृती आणि त्याचवळी या सत्तेच्या कामकाजाबद्दल अनिर्बंध टीका करतानाच

पक्षीय स्पर्धेच्या कटुपणातही प्रत्येक नागरिकाच्या हृदयातील असा आत्मविश्वास की त्याच्याएवढा घटनेच्या ढाच्याबद्दलचा आदरभाव त्याच्या विरोधकांमध्येही वसत आहे. ” (टाळ्यांचा कडकडाट)

लोकशाही घटनेचे कामकाज शांततेने होण्यासाठी घटनात्मक नैतिकतेचा प्रसार होण्याची आवश्यकता सर्वांनाच मान्य असली तरी त्याबरोबर संलग्न दोन बाबी सर्वसाधारपणे दुर्देवाने लक्षात घेतल्या जात नाहीत. पहिले म्हणजे घटनेच्या स्वरूपाबरोबर प्रशासनाच्या स्वरूपाचे निकटचे नाते असते. घटनेच्या स्वरूपाला साजेसे स्वरूपच प्रशासनाचे असले पाहिजे. दुसरे म्हणजे घटनेचे स्वरूप न बदलता तिचे विकृतीकरण करणे बिलकुल शक्य आहे. प्रशासनाचे स्वरूप बदलून ते घटनेच्या आत्म्याशी विसंगत करून आणि प्रतिकूल करून असे विकृतीकरण होऊ शकते. त्यामुळे हे स्पष्ट आहे की ‘ग्रोटे’ने वर्णन केल्याप्रमाणे जेथे लोकांमध्ये घटनात्मक नैतिकतेचा पुरेपुर प्रसार झाला असेल तेथेच प्रशासकीय तपशील घटनेतून गाळून विधिमंडळाने तो ठरवावा असा धोका पत्करता येतो. प्रश्न असा आहे की असा घटनात्मक नैतिकतेचा प्रसार झाल्याचे आपण गृहित धरू शकतो काय? घटनात्मक नैतिकता म्हणजे नैसर्गिक भावना नव्हे. तिची जोपासना करावी लागते. आपल्या लोकांनी हे अजून शिकायचे आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. मूलत: लोकशाहीवादी नसलेल्या भारतीय भूमीत लोकशाही ही केवळ सजावट आहे.

अशा परिस्थितीत प्रशासनाचे स्वरूप सुचविण्यासाठी विधिमंडळावर विश्वास टाकणे सूज्ञपणाचे ठरणार नाही. घटनेत या तपशीलाचा समावेश करण्याचे हे समर्थन आहे.

प्रस्तावित घटनेवर होणारी दुसरी टीका म्हणजे तिच्या कोणत्याही भागातून प्राचीन भारतीय राजप्रणाली दृग्गोचर होत नाही. भारतात प्राचीन काळी अस्तित्वात असलेल्या हिंदू राज्यपद्धतीवर नवी घटना आधारित असायला हवी होती आणि पाश्चिमात्य सिद्धांत या नव्या घटनेत सम्मिलीत करण्याऐवजी ग्रामपंचायत आणि जिल्हा पंचायत यांचा आधार घेऊन ती तयार करायला हवी होती; याखेरीज

आणखीही काहीजण आहेत आणि त्यांनी टोकाची भूमिका घेतली आहे. त्यांना कोणतेही मध्यवर्ती अथवा प्रांतिक सरकार नको आहे. भारतभर ग्राम सरकारे त्यांना हवी आहेत. बुद्धीवादी भारतीयांचे ग्रामीण समाजाबद्दलचे प्रेम करूण नसले तरी अमर्याद जरूर आहे. (हंशा ! )

हे प्रेम 'मेटकाफ' याने या ग्राम सरकारांवर उधळलेल्या स्तुतीसुमनांपोटी प्रामुख्याने निर्माण झाले आहे. ही ग्रामीण सरकारे म्हणजे छोटी प्रजासत्ताक राज्ये असून त्यांना लागणारे जवळपास सर्व काही त्यांच्याच परिसरात उपलब्ध असते आणि परराज्यांशी संबंध ठेवण्याची त्यांना बव्हंशी गरज नसते, अशा शब्दांत 'मेटकाफ' याने त्यांचे वर्णन केले आहे. भारतीय जनतेचे जतन होण्यासाठी इतर कोणत्याही कारणापेक्षा या ग्राम समुहांचे अस्तित्व कारणीभूत ठरले, असे सांगताना 'मेटकाफ' म्हणतो की, या दरम्यान झालेली प्रत्येक क्रांती आणि प्रत्येक बदल यांना हे ग्राम समूह सामोरे गेले; तसेच त्यांची समाधानी वृत्ती, स्वातंत्र्याचा आणि मुक्ततेचा उपभोग यांना ही रचना साह्यभूत ठरली. इतर काहीही टिकत नसताना ग्राम समूह टिकले हे नि:संशय; परंतु देशाचा कारभार आणि नियती यांच्याबाबत या ग्राम समुहांचा सहभाग किती अल्प आहे याचा विचार त्यांच्याबद्दल अभिमान बाळगणारे करत नाहीत; आणि का ? देशाच्या भाग्यनिर्मितीत त्यांचा सहभाग कितपत होता याचे वर्णन करताना 'मेटकाफ' म्हणतो:

"*एकामागून एक राजधराणी कोसळतात. क्रांतिमागून क्रांती येते. हिंदू, पठाण, मुगल, मराठा, शीख, इंग्रज हे आळीपाळीने शासक होतात. पण ग्राम समूह आहे तसाच राहतो. परचक्र आले असता ते शस्त्रे धारण करतात आणि स्वसंरक्षण करतात. शत्रुपक्षाचे सैन्य देशातून जाते. मात्र ग्राम समूह आपली गुरे आपल्या तटबंदीत जमा करतात आणि या सैन्याला विनातक्रार पार होऊ देतात.*"

ग्राम समुहांनी आपल्या देशाच्या इतिहासात अशी भूमिका पार पाडली आहे. हे ठाऊक असताना त्यांच्याबाबत काय अभिमान बाळगायचा ? सर्व प्रकारच्या उलथापालथीनंतरही ते बचावले आहेत ही वस्तुस्थिती आहे. माझी अशी धारणा आहे की अर्थातच खालच्या आणि स्वार्थी पातळीवर या ग्राम प्रजासत्ताकांनी

भारताचे वाटोळे केले आहे. त्यामुळे प्रांतवाद आणि जातीयवाद यांचा धिक्कार करणारे खेड्यांची तळी उचलून धरत असल्याचे मला आश्चर्य वाटते. स्थानिक डबके, अज्ञानाची गुहा, संकुचित मनोवृत्ती आणि जातीयवाद म्हणजेच खेडे नाही काय ? प्रस्तावित घटनेत खेडे हा घटक न धरता प्रत्येक व्यक्ती या एककाचा स्वीकार केल्याबद्दल मला आनंद आहे.

अल्पसंख्याकांना सुरक्षा पुरविल्याबद्दलही प्रस्तावित घटनेवर टीका होत आहे. याबाबतची कोणतीही जबाबदारी मसुदा समितीची नाही. घटना समितीच्या निर्णयाचे याबाबतीत अनुकरण करण्यात आले आहे. माझ्यापुरते बोलायचे झाल्यास घटना समितीने अल्पसंख्याकांसाठी या सुरक्षा उपाययोजनांची तरतूद करण्याची सूज्ञ कृती केली आहे. या देशात बहुसंख्य आणि अल्पसंख्य हे दोघे चुकीच्या मार्गाने गेले आहेत. अल्पसंख्याकांचे अस्तित्व बहुसंख्याकांनी नाकारणे चुकीचे आहे. त्याचप्रमाणे अल्पसंख्याकांनी स्वत:चे स्थायीकरण करणे तेवढेच चूक आहे.

याबाबत दुहेरी उद्दिष्ट साध्य करणारा तोडगा काढणे जरूरीचे आहे. याचा आरंभ अल्पसंख्याकांचे अस्तित्व मान्य करून व्हायला हवा. तो असाही असला पाहिजे की एके दिवशी बहुसंख्य आणि अल्पसंख्य यांना परस्परात विलीन होणे शक्य व्हावे. घटना समितीने प्रस्तावित केलेला तोडगा स्वागतार्ह म्हटला पाहिजे कारण त्याच्यातून हे दुहेरी उद्दिष्ट साध्य होत आहे. अल्पसंख्य संरक्षणाविरूद्ध धर्मांध भूमिका घेणाऱ्या कट्टरवाद्यांना मी दोन गोष्टी सांगू इच्छितो. पहिली म्हणजे अल्पसंख्याक ही एक स्फोटक शक्ती असून तिचा उद्रेक झाल्यास राष्ट्रीय ढाचा उध्वस्त होऊन जाईल. युरोपचा इतिहास या वस्तुस्थितीचा पर्याप्त आणि भयानक पुरावा आहे. दुसरी म्हणजे भारतातील अल्पसंख्याकांनी आपले अस्तित्व बहुसंख्याकांच्या हाती सोपवणे मान्य केले आहे. आयर्लंडची फाळणी टाळण्यासाठी चालू असलेल्या वाटाघाटीमध्ये ‘कार्सन’ यास उद्देशून ‘रेडमंड’ म्हणाला, “*प्रॉटेस्टंट अल्पसंख्याकांसाठी हवी ती सुरक्षा उपाययोजना माग, परंतु अखंड आयर्लंड कायम राहू दे* त्याला ‘कार्सन’ चे प्रत्युत्तर होते, “*खड्ड्यात जाऊ दे,*” *ती उपाययोजना, तुमची राजवटच आम्हाला नको.*” भारतातील कोणत्याही अल्पसंख्य

समाजाने अशी भूमिका घेतलेली नाही. त्यांनी निष्ठापूर्वक बहुसंख्याकांची राजवट स्वीकारलेली आहे; जी मूलत: धार्मिक बहुसंख्याकांची आहे, राजकीय बहुसंख्याकांची नव्हे. अल्पसंख्याकांविरूद्ध भेदभाव होणार नाही हे आपले कर्तव्य असल्याचे बहुसंख्याकांनी समजून घेतले पाहिजे. अल्पसंख्याक राहतील की नाहीसे होतील हे बहुसंख्याकांच्या या सवयींवर अवलंबून असले पाहिजे. अल्पसंख्याकांविरूद्ध भेदभाव करण्याची बहुसंख्याकांची संवय ज्या क्षणाला नाहीशी होईल त्या क्षणी अल्पसंख्याकांना आपले अस्तित्व ठेवण्याचे कारण उरणार नाही. ते नाहीसे होतील.

प्रस्तावित घटनेचा सर्वात टीकाग्रस्त भाग म्हणजे मूलभूत हक्कांबाबतचा (FUNDAMENTAL RIGHTS) या हक्कांची व्याख्या करणाऱ्या कलम १३ बद्दल असे म्हटले गेले आहे की त्यात अपवाद एवढ्या संख्येने आहेत की त्यांनी अधिकारांनाच स्वाहा करून टाकले आहे. ही एक प्रकारची फसवणूक असल्याचीही टीका झाली आहे. टीकाकारांच्या मते मूलभूत अधिकार निरंकुश असल्याखेरीज ते मूलभूत अधिकार होऊ शकत नाहीत; आपल्या युक्तिवादाचा आधार म्हणून ते अमेरिकी घटना आणि या घटनेच्या पहिल्या दहा दुरूस्त्यांमधील अधिकार सनद (BILL OF RIGHTS) यांचा आश्रय घेतात. अमेरिकेच्या अधिकार सनदेतील मूलभूत अधिकार वास्तव आहेत कारण त्यांच्यावर कोणत्याही मर्यादा नाहीत आणि त्यांना कोणतेही अपवाद केलेले नाहीत.

मूलभूत अधिकारांबाबतची सर्व टीका चुकीच्या कल्पनेवर आधारलेली आहे हे सांगण्यास मला खेद होत आहे. पहिले म्हणजे मूलभूत अधिकार आणि इतर अधिकार यांच्यात फरक दाखवू पाहणारी टीका तर्कशुद्ध नाही. मूलभूत अधिकार निरंकुश असतात आणि इतर अधिकार निरंकुश नसतात हे म्हणणे चुकीचे आहे. दोहोंमधील खरा फरक असा आहे की इतर अधिकार दोन्ही बाजूंच्या करारांमधून निर्माण झालेले असतात तर मूलभूत अधिकार ही कायद्याची देणगी आहे. मूलभूत अधिकार ही राष्ट्राने दिलेली देणगी असल्यामुळे राष्ट्र त्याबाबत निश्चिती करू शकत नाही हे म्हणणे तर्कसंगत नाही.

दुसरे म्हणजे अमेरिकेतील मूलभूत अधिकार निरंकुश आहेत हे म्हणणे चुकीचे आहे. अमेरिकी घटना आणि घटनेचा मसुदा यांच्यातील भूमिकेतील फरक आहे तो स्वरूपाचा, मूळ गाभ्याचा नव्हे. अमेरिकेतील मूलभूत अधिकार निरंकुश नाहीत ही बाब वादातीत आहे. प्रस्तावित घटनेतील प्रत्येक अपवादाच्या समर्थनार्थ अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या किमान एका निर्णयाचा संदर्भ देता येईल. प्रस्तावित घटनेच्या कलम १३ मध्ये भाषण स्वातंत्र्यावर घातलेल्या बंधनाच्या समर्थनार्थ अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या किमान एका निर्णयाची पुनरूक्ती येथे करणे पुरेसे ठरावे. हिंसक परिवर्तन घडावे या उद्देशाने केलेल्या वक्तव्यांबद्दल शिक्षेची तरतूद असणाऱ्या न्यूयॉर्क राज्यातील "गुन्हेगारी निर्णायकी" कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या "गिटलो विरूद्ध न्यूयॉर्क" खटल्यात अमेरिकी सर्वोच्च न्यायालय म्हणते :-

"*घटनेने भाषण आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य दिलेले असले तरी जबाबदारी न स्वीकारता आपणाला हवे ते काहीही बोलण्याचा अथवा छापण्याचा निरंकुश अधिकार त्यामुळे प्राप्त होत नाही हे फार पुर्वीच प्रस्थापित झालेले मूलभूत तत्व असून त्यायोगे भाषेचा अनिर्बंध आणि बेलगाम वापर करण्याचा परवानाही मिळत नाही अथवा या स्वातंत्र्याचा गैरवापर करणाऱ्यांना शिक्षा करण्यावर प्रतिबंध येत नाही.* "

त्यामुळे अमेरिकी घटनेतील मूलभूत अधिकार निरंकुश आहेत, परंतु प्रस्तावित घटनेत ते तसे नाहीत हे म्हणणे चुकीचे आहे.

असा युक्तिवाद करण्यात येतो की मूलभूत अधिकार निश्चित करायचे असले तर हे निश्चितीकरण घटनेतच करण्यात यावे, जसे ते अमेरिकी घटनेत करण्यात आले आहे आणि ज्या ठिकाणी ते करण्यात आलेले नसेल तेथे ते निश्चित करण्याचे काम सर्व अनुषंगिक बाबी विचारात घेऊन न्याययंत्रणेवर सोपविण्यात यावे. मला सांगण्यास खेद होतो की, हे सर्व अमेरिकी घटनेबद्दलच्या गैरसमजातून घडत नसल्यास; ती पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने सादर करण्यामधून घडत आहे. अमेरिकी घटना असे काहीही करत नाही. अमेरिकी नागरिकांना हमी देण्यात

आलेल्या मूलभूत अधिकारांवर अमेरिकी घटनेने एक बाब वगळता - *एकत्र जमण्याचा अधिकार* - स्वत:हून कोणतेही बंधन घातलेले नाही. त्याचप्रमाणे अमेरिकी घटनेने मूलभूत अधिकारांवर बंधन घालणे न्याययंत्रणेवर सोपविल्याचे म्हणणेही बरोबर नाही. अशी बंधने घालण्याचा अधिकार अमेरिकी काँग्रेसला (संसदेला) आहे. टीकाकार गृहित धरत असल्यापेक्षा वस्तुस्थिती मात्र निराळी आहे.

अमेरिकेत घटनेने दिलेले मूलभूत अधिकार निरंकुश होते हे खरे आहे. तथापि लवकरच काँग्रेसला असे आढळून आले की या मूलभूत अधिकारांवर निर्बंध घालून त्यांचे निश्चितीकरण करणे अनिवार्य आहे. या निर्बंधांच्या घटनात्मकतेचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर आला तेव्हा असा युक्तिवाद करण्यात आला की घटनेने अमेरिकी काँग्रेसला असा कोणताही अधिकार दिलेला नाही. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने 'पोलिसी अधिकार' हा सिद्धांत शोधून काढला आणि निरंकुश मूलभूत अधिकाराच्या समर्थकांचा प्रतिवाद करताना असे म्हटले की प्रत्येक राष्ट्राचे 'पोलिसी अधिकार' अंगभूत असतात आणि ते घटनेने राष्ट्रावर हेतुपूर्वक सोपविण्याची आवश्यकता नसते. मी यापूर्वीच संदर्भ दिलेल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालय म्हणते :-

" *सार्वजनिक कल्याणाला प्रतिकूल, सार्वजनिक नीतिमत्ता भ्रष्ट करू पाहणारी, गुन्हेगारीला चिथावणी देणारी अथवा सार्वजनिक शांतता बिघडवणारी वक्तव्ये या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन करणाऱ्यांना आपले पोलिसी अधिकार वापरून राष्ट्र शिक्षा करू शकते; याबाबत आता प्रश्न करता येणार नाही.* "

घटनेत मूलभूत अधिकार निरंकुश स्वरूपात समाविष्ट करायचे आणि आपल्या सर्वोच्च न्यायालयाने पोलिसी अधिकारांच्या सिद्धांताचा शोध लावून संसदेची सुटका करायची, असा मार्ग स्वीकारण्याऐवजी प्रस्तावित घटनेत राष्ट्रालाच मूलभूत अधिकारांवर थेट बंधने घालण्याची अनुमती दिली आहे. दोन्हींच्या परिणामात काहीही फरक नाही. एकाने जे अप्रत्यक्षरित्या केले ते दुसरा प्रत्यक्षपणे करत आहे. दोन्ही ठिकाणी मूलभूत अधिकार निरंकुश नाहीत.

प्रस्तावित घटनेत मूलभूत अधिकारांच्या नंतर ‘मार्गदर्शक तत्वे’ (DIRECTIVE PRINCIPLES) येतात. संसदीय लोकशाहीसाठी तयार केलेल्या घटनेचे हे आगळे वैशिष्ट्य आहे. संसदीय लोकशाहीसाठी तयार केलेली आणि अशी तत्वे समाविष्ट असलेली अन्य अशी एकमेव घटना स्वतंत्र आयर्लंड या राष्ट्राची आहे. या मार्गदर्शक तत्वांवरही टीका करण्यात आली आहे. ही तत्वे म्हणजे केवळ पवित्र घोषणा आहेत, असे म्हटले गेले आहे. त्यांना कोणतीही अनिवार्यता नाही (असेही म्हटले आहे). अशी टीका अर्थातच उथळ आहे. तसे घटनेतच अनेकप्रकारे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

मार्गदर्शक तत्वांना कायद्याचे कोणतेही बळ नाही, असे म्हटले गेले आहे. ही टीका मला मान्य आहे. परंतु त्यांना बिलकुल अनिवार्यता नाही हे मात्र मान्य करण्यास मी तयार नाही. त्याचप्रमाणे ती कायद्याने अनिवार्य नसल्याने निरूपयोगी आहेत, हे सुद्धा मी मान्य करणार नाही.

ब्रिटिश सरकारने १९३५ च्या कायद्यानुसार वसाहती आणि भारत यांचे गव्हर्नर-जनरल आणि गव्हर्नर्स यांच्यासाठी जारी केलेले सूचनापत्र आणि प्रस्तावित मार्गदर्शक तत्वे एकसारखी आहेत. प्रस्तावित घटनेनुसार ही मार्गदर्शक तत्वे राष्ट्रपती आणि राज्यांचे राज्यपाल यांच्यासाठी जारी करावयाची आहेत. या सूचनापत्रांचा मजकूर घटनेच्या चौथ्या सूचीमध्ये आढळेल. मार्गदर्शक तत्वे म्हणजे सूचनापत्राचे केवळ अन्य नामाभिधान होय. फरक एवढाच आहे की या सूचना विधिपालिका आणि कार्यपालिका यांच्यासाठी आहेत. मला वाटते याचे स्वागत झाले पाहिजे. शांतता, सुव्यवस्था आणि सुशासन यांच्यासाठी ज्या-ज्या ठिकाणी सत्ता देण्यात आलेली असेल त्या-त्या ठिकाणी या सत्तेचे नियंत्रण करणाऱ्या सूचना देणे आवश्यक आहे.

घटनेच्या मसुद्यात प्रस्तावित केल्यानुसार या सूचनांचा समावेश घटनेत करणे अन्य एका कारणासाठी समर्थनीय आहे. प्रस्तावित घटना देशाचे प्रशासन करण्यासाठी फक्त एका यंत्रणेची तरतूद करत आहे. इतर काही देशांत घडल्याप्रमाणे एखादा विशिष्ट पक्ष सत्तारूढ करण्याचा हा छुपा प्रयत्न नव्हे. या पद्धतीने लोकशाहीची

परीक्षा पार करायची असेल तर सत्तेवर कोण येणार याचा निर्णय लोकांवरच सोपवावा लागेल. परंतु सत्तेवर कोणीही आले तरी त्यांना ही सत्ता मनास येईल तशी वापरण्याचे स्वातंत्र्य राहणार नाही. सत्तेचा वापर करताना त्यांना मार्गदर्शक तत्वे असे नामाभिधान असलेल्या या सूचनांचा आदर करावाच लागेल. त्यांना त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यांचा भंग केल्याबद्दलचा जाब त्यांना न्यायालयात द्यावा लागणार नाही. परंतु निवडणुकीच्या काळात त्यांना मतदारांना निश्चितच याचे उत्तर द्यावे लागेल. उजव्या शक्ती जेव्हा सत्ता काबीज करण्याचे कपट करतील तेव्हा या मार्गदर्शक तत्वांचे मूल्य किती महान आहे याचा अधिक चांगला प्रत्यय येईल.

या मार्गदर्शक तत्वांना कायदेशीर अनिवार्यता नसल्याने त्यांचा घटनेत समावेश करण्याला विरोध करणे हा युक्तिवाद होऊ शकत नाही. या तत्वांना घटनेत कोठे स्थान द्यावयाचे याबाबत मतभिन्नता असू शकते. सकारात्मक बंधन असलेल्या तरतुदींच्या दरम्यान असे बंधन नसणाऱ्या तरतुदी समाविष्ट करणे काहीसे चमत्कारिक असल्याचे मला मान्य आहे. राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्यासाठीचे सूचनापत्र समाविष्ट असलेल्या तिसऱ्या (अ) आणि चौथ्या सूचीत त्यांचे योग्य स्थान आहे असे माझे मत आहे. कारण मी म्हटल्याप्रमाणे विधिपालिका आणि कार्यपालिका यांनी आपल्या अधिकारांचा वापर कसा करावा याबाबतच्या खरे तर त्या सूचना आहेत. परंतु ही बाब केवळ स्थान देण्याची आहे.

मध्यवर्ती सरकार फारच सामर्थ्यवान असल्याचे काही टीकाकारांनी म्हटले आहे. इतरांनी म्हटले आहे की ते आणखी सामर्थ्यशाली असले पाहिजे. प्रस्तावित घटनेत समतोल साधण्यात आला आहे. केंद्राला सत्ता नाकारली तरी सामर्थ्यवान होण्यापासून केंद्राला रोखणे अत्यंत कठीण आहे. आधुनिक जगातील परिस्थिती अशी आहे की सत्तेचे केंद्रीकरण अटळ आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती सरकारचा विस्तार घटनेने त्यास अत्यंत मर्यादित सत्ता देऊनही एवढा झाला आहे की त्यामुळे राज्यांची सरकारे झाकोळून आणि झाकली गेली आहेत. हे आधुनिक परिस्थितीमुळे घडले आहे. भारत सरकारच्या बाबतीत हीच परिस्थिती असणार आहे. हे अनिवार्य

आहे आणि कोणी काहीही केले तरी केंद्र अधिकाधिक सामर्थ्यशाली होण्यापासून त्याला रोखता येणार नाही. याउलट ते अधिक सामर्थ्यशाली होण्याच्या प्रवृत्तीला आपण विरोध केला पाहिजे. त्याला पचेल त्यापेक्षा जास्त खाणे देता येणार नाही. त्याच्या वजनानुसारच त्याचे सामर्थ्य असले पाहिजे. ते आपल्याच भारामुळे कोसळेल एवढे सामर्थ्यशाली करणे ही घोडचूक ठरेल.

केंद्र आणि प्रांतांच्या दरम्यान एक प्रकारचे घटनात्मक नाते तर केंद्र आणि संस्थाने यांच्या दरम्यान अन्य प्रकारचे घटनात्मक नाते असल्याबद्दल प्रस्तावित घटनेवर टीका करण्यात आली आहे. केंद्रीय सूचीतील संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि दळणवळण हे विषय सोडता संपूर्ण यादी स्वीकारण्याचे बंधन संस्थानांवर नाही. समवर्ती सूचीतील विषयही स्वीकारण्याचे बंधन त्यांच्यावर नाही. प्रस्तावित घटनेतील राज्य सूची स्वीकारायचीही त्यांच्यावर सक्ती नाही. त्यांना स्वत:ची घटना समिती स्थापन करण्याची आणि स्वत:ची घटना तयार करण्याचे स्वातंत्र्य आहे. हे सर्व अत्यंत दुर्दैवी आणि असमर्थनीय आहे. ही विसंगती देशाच्या कार्यक्षम कारभाराला धोका निर्माण करू शकेल. ही विसंगती अस्तित्वात असेपर्यंत अखिल भारतीय स्वरूपाच्या विषयांबाबतच्या केंद्राच्या सत्तेच्या परिणामकारकतेत घट होऊ शकते. कारण प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक प्रकरणी जी वापरता येत नाही ती सत्ताच नव्हे. युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास महत्वाच्या अधिकारांवर अशा मर्यादा येण्याने संपूर्ण राष्ट्रजीवनाला धोका निर्माण होऊ शकतो. यामध्ये सर्वात वाईट बाब म्हणजे प्रस्तावित घटनेनुसार भारतातील संस्थाने आपले स्वत:चे लष्कर बाळगू शकतील. माझ्या मते ही तरतूद अत्यंत प्रतिगामी आणि हानिकारक असून तिच्यामुळे भारताचे ऐक्य भंग पावू शकेल आणि केंद्र सरकार उलथून टाकले जाऊ शकेल. मसुदा समिती या तरतुदीला बिलकुल अनुकूल नव्हती असे मी नमूद करणे अस्थानी ठरणार नाही. केंद्राबरोबरच्या घटनात्मक संबंधांबाबत प्रांत आणि संस्थाने यांच्यात समानता असावी अशी समितीच्या सदस्यांची तीव्र इच्छा होती. दुर्देवाने याबाबतीत सुधारणा करण्याची ते काहीही करू शकले नाहीत. त्यांच्यावर घटना समितीच्या निर्णयांचे बंधन होते आणि घटना समितीवर दोन वाटाघाटी समित्यांच्या कराराचे बंधन होते.

परंतु जर्मनीत जे काही घडले त्यावरून आपणास धीर यायला हरकत नाही. बिस्मार्कने १८७० मध्ये स्थापना केलेले जर्मन साम्राज्य संमिश्र राष्ट्र होते आणि त्यात २५ घटक होते. त्यापैकी २२ घटकांमध्ये राजेशाही होती आणि ३ घटकांमध्ये शहरी प्रजासत्ताक होते. आपणास ठाऊक आहे की कालांतराने हा भेद नाहीसा होऊन जर्मनी एक देश बनला, त्यातील सर्व लोक जर्मन झाले आणि देशात एकच घटना अस्तित्वात राहिली. जर्मनीपेक्षा भारतातील संस्थानांच्या सामिलीकरणाची प्रक्रिया फारच वेगवान असणार आहे. आपल्याकडे १५ ऑगस्ट १९४७ रोजी ६०० संस्थाने अस्तित्वात होती. संबंधित प्रांतांमधील विलिनीकरणामुळे, परस्पर विलिनीकरणामुळे अथवा केंद्रशासित भूप्रदेश म्हणून केंद्राने ताबा घेतल्याने आता सक्षम म्हणता येतील अशी २५-३० संस्थानेच उरली आहेत. ही प्रक्रिया आणि प्रगती अत्यंत जलद आहे. ज्याप्रकारे भारतीय प्रांत राष्ट्राचे पूर्ण घटक बनले आहेत त्याप्रमाणे या संस्थानांनीही त्यांचे अनुकरण करावे असे आवाहन मी करीत आहे. त्यायोगे भारताला आवश्यक असणारे सामर्थ्य ते देऊ शकतील. त्यामुळे स्वत:ची घटना समिती स्थापन करून स्वत:ची वेगळी घटना तयार करण्याचा त्यांचा त्रास वाचेल आणि त्यांच्यासाठी मौल्यवान असणारे काहीही त्यांना गमवावे लागणार नाही. मला अशी आशा आहे की माझे आवाहन व्यर्थ जाणार नाही आणि ही घटना मंजूर होण्यापूर्वी प्रांत आणि भारतीय संस्थाने यांच्यातील भेद आपण नाहीसा करू शकू.

प्रस्तावित घटनेच्या कलम एक मधील भारत या शब्दाचे वर्णन ‘राज्यांची संघटना’ असे केल्याबद्दल काही टीकाकारांनी आक्षेप घेतला आहे. असे म्हटले गेले आहे की योग्य शब्दप्रयोग संघराज्य असा असावा. दक्षिण आफ्रिका हे एकात्मिक राष्ट्र असून त्याचे वर्णन संघटना असे करण्यात आले आहे हे खरे आहे. परंतु कॅनडा हे संघराज्य असून त्याचे वर्णन संघटना असे करण्यात आले आहे. म्हणजे भारताची घटना संघराज्यात्मक असली आणि त्याचे वर्णन संघटना असे केले तरी शब्दप्रयोगाचा कोणताही गैरवापर होत नाही. मात्र महत्वाची गोष्ट अशी आहे की, संघटना या शब्दाचा वापर जाणीपूर्वक करण्यात आला आहे. कॅनडाच्या घटनेत ‘संघटना’ हा शब्द का वापरण्यात आला हे मला माहित नाही. मात्र मसुदा समितीने तो का वापरला हे मी सांगू शकतो.

मसुदा समितीला हे स्पष्ट करायचे होते की भारत हे एक संघराज्य राहणार असले तरी भारतीय संस्थानांनी केलेल्या करारातून या संघराज्याची निर्मिती झालेली नाही आणि अशा करारातून संघराज्याची निर्मिती झालेली नसल्याने कोणत्याही संस्थानाला या संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार राहणार नाही. संघराज्य ही संघटना असल्याने ती अविनाशी आहे. राष्ट्र आणि लोक वेगवेगळ्या राज्यांमध्ये प्रशासकीय सुविधेसाठी विभागले असले तरी संपूर्ण देश एकात्म आहे, त्याचे नागरीक एक आहेत, त्यांच्यावरील 'सार्वभौम शक्तीचा' उगम एकच आहे. राज्यांना फुटून निघायचा अधिकार नाही आणि संघराज्य अविनाशी आहे हे प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकी जनतेला नागरी युद्ध करावे लागले. एखाद्या कलहाला किंवा कयासाला संधी देण्यापेक्षा ही बाब आरंभीच स्पष्ट केलेली बरी असे मसुदा समितीला वाटले.

घटना मसुद्याच्या टीकाकारांनी घटना दुरूस्तीबाबतच्या तरतुदींवर कटु शब्दांत हल्ला केला आहे. घटनेच्या मसुद्यातील या तरतुदींमुळे घटना दुरूस्ती करणे कठीण होईल असे म्हटले गेले आहे. किमान काही वर्षे तरी घटना दुरूस्ती साध्या बहुमताने शक्य व्हावी असे सुचविण्यात आले आहे. हा युक्तिवाद अत्यंत चलाख आणि चाणाक्ष आहे. हा युक्तिवाद असा आहे की घटना समितीची निवड प्रौढ मताधिकार तत्वावर झालेली नसली आणि भावी संसद या तत्वावर निवडून येणार असली तरी घटना साध्या बहुमताने मंजूर करण्याचा अधिकार समितीला देण्यात असूनही हा अधिकार भावी संसदेला मात्र नाकारण्यात आला आहे. घटनेच्या मसुद्यातील विसंगती म्हणून या मुद्याचा वापर करण्यात आला आहे. त्याचा प्रतिवाद मी करणे आवश्यक आहे कारण तो निराधार आहे. प्रस्तावित घटना दुरूस्त करण्याबाबतच्या तरतुदी किती सुलभ आहेत हे समजण्यासाठी अमेरिकेची आणि ऑस्ट्रेलियाची घटना वाचली पाहिजे. त्यांच्या तुलनेत प्रस्तावित घटनेतील तरतुदी अत्यंत सोप्या असल्याचे आढळेल. एखादी परिषद भरवून किंवा सार्वमत घेण्यासारख्या जटिल आणि कठीण प्रक्रिया प्रस्तावित घटनेने नाहीशी केलेल्या आहेत. दुरूस्तीचे अधिकार प्रांतिक आणि केंद्रीय विधिमंडळांना देण्यात आले

आहेत. काही अगदी थोड्या विशिष्ट तरतुदींच्या दुरूस्तीसाठी - *ज्या अगदी थोड्या आहेत* - राज्य विधिमंडळांची मान्यता आवश्यक ठेवण्यात आली आहे. घटनेची इतर सर्व कलमे दुरूस्त करण्याचा अधिकार संसदेकडे ठेवण्यात आला आहे. त्यात एवढेच बंधन ठेवण्यात आले आहे की अशी दुरूस्ती करताना प्रत्येक सभागृहात उपस्थित सदस्यांचे दोन-तृतीयांश पेक्षा कमी नसेल एवढे बहुमत आणि मतदान असले पाहिजे आणि प्रत्येक सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येपैकी बहुमत असले पाहिजे. घटना दुरूस्त करण्यासाठी यापेक्षा सोपी प्रक्रिया सापडणे अवघड आहे.

दुरूस्ती विषयक प्रक्रिया विसंगत असल्याची टीका घटना समिती आणि या घटनेनुसार निवडण्यात येणारी संसद यांच्या भूमिकांबाबतच्या गैरसमजुतीमधून निर्माण झाली आहे. घटना तयार करणाऱ्या समितीचा कोणताही पक्षीय हेतु नाही. एक चांगली आणि काम करू शकणारी घटना देण्यापलीकडे या समितीला काहीही साध्य करावयाचे नाही. घटनेच्या कलमांवर विचारविनिमय करताना एखादी बाब खास करून मंजूर करून घेण्यावर समितीचा डोळा नव्हता. भावी संसदेची बैठक घटना समिती म्हणून झाल्यास तिचे सदस्य पक्षीय भूमिकेतून वावरतील आणि त्यांच्या पक्षांची धोरणे पुढे जावी यासाठी घटना दुरूस्त करण्याचा प्रयत्न करतील; कारण घटनेचे एखादे कलम त्यांच्या मार्गात अडथळा बनल्याने संसदेत अशी धोरणे मंजूर करून घेणे त्यांना शक्य झाले नसेल. संसदेला नाराजीचे काहीतरी कारण असेल, परंतु घटना समितीला असे कोणतेही कारण नाही. घटना समिती आणि भावी संसद यामध्ये हा फरक आहे. हे यावरून स्पष्ट होईल की, मर्यादित जनादेशावर निवडण्यात आलेल्या घटना समितीवर साध्या बहुमताने घटना मंजूर करण्याबाबत विश्वास ठेवता येतो परंतु घटना दुरूस्तीबाबत तसाच विश्वास प्रौढ मताधिकाराचा कौल घेऊन निवडून आलेल्या संसदेवर ठेवता येत नाही.

मसुदा समितीने तयार केलेल्या घटनेच्या मसुद्यावरील सर्व टीकेला मी यथार्थ उत्तर दिलेले आहे असा मला विश्वास आहे. गेले आठ महिने ही घटना

जनतेसमोर असलेल्या काळात याबाबतचे कोणतेही महत्वाचे मतप्रदर्शन अथवा टीका यांचा परामर्श घेण्याचे माझ्याकडून राहून गेले असावे असे मला वाटत नाही. मसुदा समितीने तयार केलेली घटना स्वीकारायची की ती मंजूर करण्यापूर्वी त्यात बदल करावयाचा हे आता घटना समितीने ठरवावयाचे आहे.

मात्र हे मला नमूद करायचे आहे की, घटनेवर भारतातील काही प्रांतिक विधानसभांनी चर्चा केली आहे. मुंबई, मध्य प्रांत, पश्चिम बंगाल, बिहार, मद्रास आणि पूर्व पंजाब येथे त्याविषयी चर्चा झाली आहे. काही प्रांतिक विधानसभांमध्ये घटनेच्या अर्थविषयक तरतुदींना गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत हे खरे आहे. मद्रासमध्ये कलम २२६ ला आक्षेप घेण्यात आला. हे अपवाद वगळता कोणत्याही प्रांतिक विधानसभेने घटनेच्या कलमांना गंभीर हरकत घेतलेली नाही. कोणतीही घटना परिपूर्ण नसते आणि खुद्द मसुदा समितीने घटनेचा मसुदा सुधारण्यासाठी काही दुरूस्त्या सुचविल्या आहेत. परंतु प्रांतिक विधानसभांमधील झालेल्या चर्चेने असे म्हणण्याचे धैर्य मला प्राप्त झाले आहे की मसुदा समितीने तयार केलेली घटना या देशात आरंभ करण्याएवढी नक्कीच चांगली आहे. मला असे वाटते की ही घटना काम करू शकेल, ही घटना लवचिक आहे आणि शांततेच्या तसेच युद्धाच्या काळात देश एकसंघ ठेवण्याएवढी ती नक्कीच समर्थ आहे. मला असे खरोखरच म्हणावेसे वाटते की नव्या घटनेच्या अमलामुळे परिस्थिती बिघडली तर आपली घटना वाईट आहे हे कारण त्यासाठी नसेल. आपल्याला असे म्हणावे लागेल की मानव भ्रष्ट होता. महोदय, मी ठराव सादर करतो.

(मूळ भाषण http://164.100.47.132/LssNew/constituent/vol 7p1.html या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

*(डॉ.आंबेडकर यांच्या भाषणानंतर घटना समितीच्या सदस्यांनी घटनेच्या मसुद्यावर आपले विचार मांडले. डॉ.आंबेडकर यांनी आणि मसुदा समितीने केलेल्या कामाची प्रशंसा केली. या भाषणांचे काही अंश - संपादक)*

शुक्रवार, ५ नोव्हेंबर, १९४८

---

घटना समितीची बैठक सकाळी दहा वाजता घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सुरू झाली. माननीय अध्यक्ष (सन्माननीय डॉ.राजेंद्र प्रसाद) अध्यक्षस्थानी होते.

---

श्री. फ्रँक अँथनी (मध्य प्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : माननीय अध्यक्ष महोदय, डॉ.आंबेडकर सभागृहात हजर नसले तरी आपल्या घटनेच्या मसुद्याचा पाया असलेल्या तत्वांबाबत त्यांनी केलेल्या संतुलित आणि ओघवत्या विश्लेषणाबद्दल किमान एक वकील म्हणून त्यांचे अभिनंदन मी केले पाहिजे. या घटनेच्या मसुद्याबद्दल आपली काहीही वेगवेगळी मते असली तरी मला असे वाटते की अन्य कोणत्याही कारणाने नाही तरी आकाराने ही घटना अतिविशाल आहे हे मान्य करावे लागेल. एवढा विस्तृत दस्तऐवज तयार करण्यासाठी मसुदा समितीच्या सदस्यांनी केलेले अमर्याद श्रम आणि कौशल्याचा वापर यांच्यासाठी या सदस्यांना खास धन्यवाद न देणे आपल्यासाठी बालिशपणा ठरेल असेही मला ठामपणे वाटते.....

* * * * *

डॉ. आंबेडकर यांनी अल्पसंख्याकांच्या वतीने याबाबतच्या तरतुदींचा गौरव करताना व्यक्त केलेल्या भावनेला मी दुजोरा देतो. मला ठाऊक आहे की अल्पसंख्याक अथवा त्यांच्या समस्यांबद्दल बोलणे (भारताच्या आताच्या अनुभवानंतर) हा नकोसा विषय आहे. आणि मी ते करणारही नाही. अल्पसंख्याक विषयी या तरतुदींची तरफदारी मला यासाठी करायची नाही की त्या सल्लागार समितीने आधीच स्वीकारलेल्या आहेत. या तरतुदी काँग्रेस पक्षाने स्वीकारल्या आहेत, घटना समितीने सुद्धा स्वीकारल्या आहेत. या अडचणीच्या प्रश्नावर काँग्रेस पक्षाने

*घेतलेल्या वास्तववादी आणि मुत्सद्दी भूमिकेबद्दल मी काँग्रेसला धन्यवाद दिले पाहिजेत आणि या पक्षाचे अभिनंदनही केले पाहिजे.*

*सरदार पटेल यांच्या अत्यंत वास्तववादी आणि मुत्सदी भूमिकेसाठी त्यांचे मुद्दाम आभार मानले पाहिजेत. या देशात अल्पसंख्याक आहेत या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येणार नाही अथवा त्यापासून पळ सुद्धा काढता येणार नाही. परंतु ज्याप्रकारे काँग्रेसने या प्रश्नाकडे पाहण्यास आरंभ केला आहे त्याचे अनुकरण आपण केल्यास या देशात दहा वर्षांत अल्पसंख्याकांची समस्याच उरणार नाही अशी मला खात्री आहे. हे राष्ट्र खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्र व्हावे आणि असे कमीतकमी काळात घडावे अशी इच्छा नसणारी एकही अल्पसंख्यांक जमात नाही असे; महोदय, निदान मला तरी वाटते. यावर आपण विश्वास ठेवा आणि यावर आपण विश्वास ठेवायलाच पाहिजे की, या उद्दिष्ट प्राप्तीत या देशातील कोणत्याही अल्पसंख्यांक गटाला सर्वात मोठी हमी लाभणार आहे. डॉ.आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे आपण या विषयावर सुवर्णमध्य गाठला आहे. यास अल्पसंख्याकही साह्यभूत झाले आहेत....*

*महोदय, अखेरीस मला असे म्हणायचे आहे की ते उद्दिष्ट आपण पूर्णपणे साध्य करणे या छापील घटनेतील लिखित शब्दांवर अवलंबून न राहता आपल्यासमोरील प्रचंड समस्यांना आपले नेते आणि प्रशासक काय भावनेने सामोरे जातात आणि आपण या घटनेतील भावना प्रत्यक्षात कशी आणतो यावर ते अवलंबून राहणार आहे, आपला विश्वास असलेल्या आदर्शांची पूर्तता कितपत होते यावर त्याचे मोजमाप होणार आहे.*

*श्री. कृष्णचंद्र शर्मा (संयुक्त प्रांत : सर्वसाधारण) : डॉ.आंबेडकर यांनी सभागृहाला सादर केलेली सुगठित योजना, त्यांनी उपसलेले कष्ट आणि कालचे त्यांचे जोमदार आणि ओघवते भाषण यांच्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याच्या सभागृहाच्या आल्हाददायी कार्यात मी सहभागी होत आहे.*

*महोदय, आपली घटना लोकशाहीवादी आहे. लोकशाहीत सरकारचाही समावेश असतो. घटना म्हणजे केवळ साध्य नव्हे. घटना काही उद्दिष्टांसाठी तयार*

*करण्यात येते; साधारणपणे लोकांचे भले व्हावे, राष्ट्राचे स्थैर्य आणि व्यक्तीची वाढ तसेच विकास ही ती उद्दिष्टे होत. भारतात जेव्हा आपण व्यक्तीची वाढ आणि विकास असे म्हणतो तेव्हा त्याची स्वयं अनुभूती, स्वयंविकास आणि स्वयंसाध्यता आपणास अभिप्रेत असते. आपण जेव्हा लोकांचा विकास असे म्हणतो तेव्हा समर्थ आणि एकसंघ राष्ट्र असा अर्थ आपण अभिप्रेत धरतो......*

*महोदय, घटनेबद्दल विचार करताना आपण या वस्तुस्थितीची नोंद घेतली पाहिजे की ती लोकांची, लोकांनी केलेली आणि लोकांसाठी आहे. लोकशाहीत लोकांचे एकत्रित शहाणपण एखादा राजा, जुलुमी हुकूमशहा अथवा लोकांचा एखादा गट यांच्यापेक्षा श्रेष्ठ असते. याखेरीज लोकांचे कल्याण हे सर्वश्रेष्ठ मंगल असण्यावर लोकशाहीचा भर असतो. हे साध्य करण्यापुरतेच राजकीय संस्थांचे समर्थन करता येते, त्यांचा भपका आणि देखावा यांच्यामुळे नव्हे. ही लोकशाहीची मूलभूत तत्वे असल्याने आपल्याला सादर करण्यात आलेली घटना व्यक्तीची स्वयं अनुभूती, स्वयंविकास आणि स्वयंसाध्यता यांच्या शक्यतेसह भारत एक समर्थ एकसंघ राष्ट्र बनवू शकेल काय याचा निवाडा आपल्याला करायचा आहे.*

*श्री. टी. टी. कृष्णम्माचारी (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय अध्यक्ष महोदय, या सभागृहात डॉ.आंबेडकर यांचे भाषण अत्यंत काळजीपूर्वक ऐकणाऱ्यांपैकी मी एक आहे. हा घटनेचा मसुदा तयार करण्याच्या कामी त्यांनी किती मेहनत घेतली आणि त्यात कसा उत्साह ओतला याची मला पूर्ण जाणीव आहे. त्याचप्रमाणे मसुदा समितीला या कामाकडे कसे लक्ष पुरवावे लागले याचीही मला कल्पना आहे. आपण नामनियुक्त केलेल्या सात सदस्यांपैकी एकाने सभागृहाचा राजीनामा दिला आणि त्याजागी दुसऱ्याची निवड करण्यात आली हे सभागृहाला ज्ञात आहे. एका सदस्याचे निधन झाले आणि ती जागा भरण्यात आली नाही. एक सदस्य अमेरिकेत होता तर दुसरा राष्ट्राच्या कारभारात गुंतला होता आणि या दोन्ही जागाही रिक्त राहिल्या. एक-दोघे दिल्लीपासून दूर होते आणि बहुधा प्रकृतीच्या कारणांमुळे ते हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे डॉ.आंबेडकर यांनी ज्या परिस्थितीत ही कामगिरी पार पाडली त्याबद्दल नि:संशय त्यांची प्रशंसा करतानाच आपण त्यांचे*

*ऋणीही आहोत. तथापि माझा मुद्दा असा आहे की या प्रश्नाकडे संपूर्ण समितीने लक्ष द्यावयास हवे होते तेवढे लक्ष दिलेले नाही. या सभागृहाचे सदस्य आणि सर्वसामान्य लोक यांनी सुचवलेल्या विविध दुरूस्त्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्रीय अधिकार समिती, केंद्रीय घटना समिती आणि प्रांतिक घटना समिती अथवा या समित्यांचे सदस्य आणि काही निवडक मंडळींनी भेटावे असे आपण ठरविल्याचे घटना समिती सचिवालयाने मला आणि इतर काही जणांना एप्रिलमध्ये कळवले होते. त्यानुसार एप्रिल महिन्यात दोन दिवस बैठक पार पाडली. आणि या बैठकीत चांगले कामकाज झाले. यापैकी काही दुरूस्त्या स्वीकारण्याचे डॉ.आंबेडकर यांनी मान्य केल्याचे दिसत आहे. परंतु यानंतर या समितीबद्दल मात्र काहीही ऐकिवात आलेले नाही.*

*यानंतर मसुदा समिती, निदान डॉ.आंबेडकर आणि श्री.माधवराव यांची बैठक होऊन त्यात या दुरूस्त्यांवर विचार झाला आणि काही सूचना करण्यात आल्या. परंतु तांत्रिकदृष्ट्या ही मसुदा समितीची बैठक बहुधा नव्हती. यासंदर्भात आपल्या निर्णयाबद्दल मी प्रश्न करणार नसलो तरी एखाद्या समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर तिचे अस्तित्व समाप्त होते हे मान्य होईल आणि आपण मसुदा समितीची फेररचना केल्याचे मला स्मरत नाही......*

* * * * *

*श्री. विश्वनाथ दास (ओरिसा : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, डॉ.आंबेडकर यांनी घटना समितीसमोर केलेल्या घटनेच्या प्रतिभाशाली विश्लेषणाबद्दल मी आरंभीच त्यांना धन्यवाद देणे आवश्यक समजतो. या सभागृहाला सादर केलेली घटना तयार करण्यासाठी त्यांच्या सहकाऱ्यांनी सहा महिने केलेल्या अथक परिश्रमांबद्दल मी त्यांचेही आभार मानतो......*

*मसुदा समितीने सतत खपून आकार आणि रूप दिलेल्या घटना विधेयकावर आज आपण विचारविनिमय करत असून भारताला एक योग्य सार्वभौम घटना देण्यासाठी आपल्या इच्छेनुसार त्यात आपल्याला बदल करायचे आहेत. डॉ.आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वंदन करतानाच तुमच्या सल्लागारांचेही साजेसे अभिनंदन मला केले पाहिजे.....*

*श्री. लोकनाथ मिश्रा (ओरिसा : सर्वसाधारण) : ........ महोदय भारताच्या सार्वभौमत्वाचे प्रतिनिधित्व करणारी आणि आपल्या स्वातंत्र्याला आकार, रूप आणि प्रतिष्ठा देणारी ही घटना समिती आपल्या भवितव्याची पालक ठरणाऱ्या घटनेवर येथे विचारविनिमय करीत आहे. त्यादृष्टीने आपल्या नेत्यांनी भरपूर परिश्रम घेऊन तयार केलेल्या घटनेच्या मसुद्यावर आता आपण चर्चा करणार आहोत.*

*महोदय, माझा पहिला मुद्दा असा आहे की, डॉ.आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिभाशाली, उद्‌बोधक, स्पष्ट आणि ओघवत्या भाषणाद्वारे घटनेच्या मसुद्याचे संपूर्ण विश्लेषण केले आहे.....*

*.....डॉ.आंबेडकर यांच्या भाषणावर प्रकाश टाकण्यासाठी मी जरा जास्त वेळ घेतला असता. त्यांच्या ज्ञानाला, धैर्याला मी वंदन करतो, त्यांच्या भाषणाच्या स्पष्टतेसमोर मी नतमस्तक आहे. परंतु एवढा विद्वान, भारताचा एवढा महान सुपुत्र भारताबद्दल मात्र एवढा अनभिज्ञ असावा याचे मला आश्चर्य वाटते. डॉ.आंबेडकर नि:संशय घटनेच्या मसुद्याचा आत्मा आहेत आणि या मसुद्यात त्यांनी अगदी अभारतीय असे काही दिलेले आहे. त्यांनी कितीही प्रतिवाद केला तरी हा मसुदा म्हणजे पश्चिमेची गुलामी, नक्कल नव्हे तर गुलामी शरणागती आहे, असा अभारतीय या शब्दाचा अर्थ आहे.*

*काजी सय्यद करीमुद्दीन (मध्य प्रांत आणि बेरार : मुस्लीम) : माननीय अध्यक्ष महोदय, भारताच्या घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय करण्यासाठी प्रस्ताव सादर केल्याबद्दल डॉ.आंबेडकर यांचे मी अभिनंदन करतो. त्यांचे भाषण विलक्षण होते आणि त्यांचे नाव भविष्यात महान घटनाकार म्हणून नोंदले जाईल अशी मला खात्री आहे........*

* * * * *

*प्रा. के. टी. शाह (बिहार : सर्वसाधारण) : महोदय, या सभागृहास सादर करण्यात आलेल्या अत्यंत विस्तृत घटनेबद्दल मसुदा समिती आणि तिचे अध्यक्ष*

*यांच्या अभिनंदनाच्या सांघिक गायनात मलाही सहभागी व्हायचे आहे. मला विशेषकरून कायदामंत्र्यांचा सन्मान करायचा आहे तो त्यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत घटनेची ठळक वैशिष्टये आपल्या विचारार्थ सादर करण्यासाठी केलेल्या भाषणाबद्दल:- त्यांनी आपल्याला विचारप्रवृत्त करणाऱ्या संकल्पना देताना काही बाबी समाविष्ट का केल्या आहेत आणि इतर काही बाबी विवक्षित प्रकारे का समाविष्ट केल्या आहेत याची कारणेही दिली आहेत........*

* * * * *

*पंडित लक्ष्मीकांत मैत्रा (पश्चिम बंगाल : सर्वसाधारण) : महोदय, माझे सन्माननीय स्नेही आणि जुने सहकारी डॉ.आंबेडकर यांच्या कालच्या महान भाषणाबद्दल मी आरंभीच त्यांचे अभिनंदन न केल्यास मी कर्तव्यात चुकलो असे म्हणावे लागेल. घटनात्मक प्रस्तावांना निश्चित आकार देण्यासाठी त्यांनी केलेले अफाट परिश्रम आणि खर्ची घातलेला एवढा प्रचंड वेळ यांबद्दल हे सभागृह कृतज्ञता प्रकट करत आहे........*

* * * * *

*श्री.रामनारायण सिंग (बिहार : सर्वसाधारण) : महोदय, हे घटना विधेयक सादर करण्याची संधी मिळालेले माझे सन्माननीय स्नेही डॉ.आंबेडकर यांचे मी अभिनंदन करतो आणि या प्रस्तावाचे समर्थन करतो.....*

* * * * *

*डॉ. पंजाबराव देशमुख (मध्य प्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : महोदय, प्रस्तावित घटनेवर माझे विचार व्यक्त करण्याची संधी मला दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. वेळ मर्यादित असल्याने माझी निरीक्षणे अत्यंत ढोबळ असणार आहेत. विविध कलमांवर विचार होताना दुर्देवाने मी येथे उपस्थित नसेन. त्यामुळे हा मोजका वेळ मिळाल्याबद्दल मी अधिकच कृतज्ञ आहे.*

*माझे सन्माननीय स्नेही डॉ.आंबेडकर यांचे भाषण अत्युकृष्ट होते आणि येथे सादर झालेल्या मसुद्यावरील प्रभावी समालोचन होते. डॉ.आंबेडकर नामांकित*

वकील असल्याचे सर्वज्ञात असून या मसुद्यावर त्यांनी सक्षम युक्तिवाद केला असे मला वाटते. त्यांना वाव मिळाला असता तर त्यांनी कदाचित घटनेला वेगळा आकार दिला असता. आपण प्रशासन एका दिवसात बदलू शकत नाही असे ते म्हणाले तेव्हा त्यांनी आपली अडचण पूर्णपणे मान्य केली असे मला वाटते. आणि प्रस्तुत घटनेचे थोडक्यात वर्णन करणे शक्य झाल्यास विद्यमान प्रशासनास ती साजेशी करण्यात आली आहे.......

* * * * *

श्री. एस. नागप्पा : माननीय उपाध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे सन्माननीय अध्यक्ष आणि सदस्य यांचे अभिनंदन करण्यात आधीच्या वक्त्यांबरोबर मी सहभागी होत आहे. सर्व समस्यांचे सर्व पैलू आणि विविध समित्यांचे सर्व अहवाल यांचा एकत्रित विचार करण्याची काळजी त्यांनी घेतलेली आहे......

महोदय, आपण अगदी नुकतेच स्वातंत्र्य प्राप्त केलेले असल्याने समर्थ केंद्रीय सरकारचा मी एक पुरस्कर्ता आहे. हे स्वातंत्र्य दृढ करण्यासाठी आणि ते चिरंतन टिकावे म्हणून आपल्याला पुरेसा अवधी हवा आहे. केंद्रीय सरकार समर्थ असावे यासाठी दुसरेही कारण आहे. आपण आताच धार्मिक आणि जातीय अशा अनेक कारणांमुळे विभाजित झालेलो आहोत. आता प्रांतिक आधारावर आपले विभाजन व्हायला नको. म्हणून सर्व प्रांतांचे ऐक्य करून आणखी एकी निर्माण करण्यासाठी समर्थ केंद्र असणे देशहिताचे आहे.

समर्थ केंद्र का असावे याचा आणखी एक कारण मी सांगणार आहे. काही लोकांचे असे म्हणणे आहे की युद्धाची मनोवृत्ती असलेले समर्थ केंद्र असावे. अशी मनोवृत्ती असावी असे मला बिलकुल वाटत नाही. अहिंसक आणि सत्याचे उपासक असल्याचे प्रशिक्षण आपल्याला देण्यात आले आहे. ही आपली तत्वे आहेत. असे असताना केंद्र युद्धखोर मनोवृत्तीचे असणे संभवत नाही.

आपला अहवाल आणि घटनेचा मसुदा सादर करताना डॉ.आंबेडकर म्हणाले की घटनेची रचना संघराज्यात्मक आहे पण स्वरूप एकात्मिक आहे. महोदय, या

*प्रकारची घटना विशेषत: या घडीला आपल्याला आवश्यक आहे असा मला विश्वास आहे. त्यांनी भारत सरकार कायद्यातून उसनवारी केल्याचे आपल्याला सांगण्यात आले होते. आपल्याला चांगले दिसते त्याचे आपण अनुकरण करतो. आपल्या प्रथा आणि संस्कृती यांना उपयुक्त आणि साजेसे इतर घटनांमध्ये आढळल्यास त्याचा अंगीकार करणे गैर नाही.*

*या घटनेत अल्पसंख्याकांसाठी चांगल्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. याचा मला आनंद आहे आणि अल्पसंख्याकांचे हितरक्षण करण्यासाठी या सभागृहात परतलेले प्रतिनिधीही आनंदी आहेत. यासाठी बहुसंख्याक समाजाचे आपण अभिनंदन केले पाहिजे. अल्पसंख्याकांना काही विशेषाधिकार मान्य केल्याबद्दल आपण बहुसंख्याक समाजाचे अभिनंदन केले पाहिजे.....*

*महोदय, मी पुनश्च एकवार डॉ.आंबेडकर यांना हा घटनेचा मसुदा तयार करण्याचे कष्ट घेतल्याबद्दल धन्यवाद देत आहे. ही कामगिरी अत्यंत जटिल आहे यात शंका नाही, परंतु त्यांनी ती अत्यंत यशस्वीपणे आणि एवढ्या अल्पावधीत पार पाडली आहे.*

* * * * *

## *शनिवार ६ नोव्हेंबर, १९४८*

---

*घटना समितीची बैठक घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सकाळी दहा वाजता सुरू झाली. माननीय उपाध्यक्ष (डॉ.हिरेन कुमार मुखर्जी) अध्यक्षस्थानी होते.*

---

*श्री. अरूण चंद्र गुहा (पश्चिम बंगाल : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय.... आता घटनेच्या मसुद्याकडे. मसुदा समिती आपल्या कक्षेबाहेर गेली आहे. घटना समितीने आखून दिलेल्या प्रमुख तत्वांपलिकडे आपल्याला सादर करण्यात आलेली घटना गेली आहे. या संपूर्ण घटनेच्या मसुद्यात काँग्रेसचा दृष्टीकोण अथवा गांधीवादी राजकीय आणि सामाजिक दृष्टीकोण कोठेही आढळत नाही. विद्वान डॉ.आंबेडकर यांना आपल्या प्रदीर्घ विद्वत्ताप्रचुर भाषणात गांधीजी किंवा काँग्रेस यांचा संदर्भ देण्याची एकही संधी सापडली नाही. यात आश्चर्यकारक काहीच नाही कारण संपूर्ण घटनेत खासकरून काँग्रेसचे आदर्श आणि काँग्रेसची विचारधारा यांचा अभाव आहे. आपण घटना तयार करतो तेव्हा ती केवळ एक राजकीय रचना आपण करत नसतो, केवळ एक प्रशासकीय यंत्रणा उभी करत नसतो तर राष्ट्राच्या समाजिक आणि आर्थिक भवितव्यासाठी ही रचना असते....*

*डॉ. आंबेडकर हे विद्वान प्राध्यापक असून त्यांची विद्वता आणि क्षमता मी मान्य करतो. घटनेचा मसुदा ही प्रामुख्याने त्यांची निर्मिती आहे असे मला वाटते. मूलभूत अधिकारांबाबत आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ.आंबेडकर यांनी पराभौतिक चर्चा सुरू केली. त्यांनी एका नव्या संज्ञेचा परिचय करून दिला आहे:- महोदय, जगात कोणताही अधिकार अनिर्बंध नसतो अशी माझी भावना आहे. प्रत्येक अधिकाराबरोबर एक बंधन येते; बंधनाशिवाय कोणताही अधिकार असू शकत नाही.....*

* * * * *

*माननीय उपाध्यक्ष (डॉ. हिरेन कुमार मुखर्जी) : पुढील वक्त्याला भाषणासाठी पाचारण करण्यापूर्वी माझ्याकडे ४० इच्छुक वक्त्यांची नावे आली आहेत. हा विषय एवढा तातडीचा आणि महत्वाचा आहे की प्रत्येकाला या घटनेच्या मसुद्यावर मतप्रदर्शन करण्याची संधी लाभावी असे मला वाटते. म्हणून मी घालून दिलेली दहा मिनिटांची कालमर्यादा कोणत्याही वक्त्याने ओलांडू नये असे आवाहन मी करतो.*

*श्री. टी. प्रकाशम (मद्रास : सर्वसाधारण) : मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी सादर केलेला घटनेचा मसुदा हा एक फार विशाल दस्तऐवज आहे. त्यांनी आणि या कामगिरीबरोबर संलग्न असणाऱ्यांनी अपार मेहनत घेतली असणार. घटना समितीचे पाच ते सहा सदस्य गळणे आणि त्यांच्या जागा रिकाम्या राहणे यांमुळे निर्माण झालेल्या अडचणीतही डॉ.आंबेडकर कसे काम करत होते याचे स्पष्टीकरण माझे स्नेही सन्माननीय श्री.टी.टी.कृष्णम्माचारी यांनी केले आहे.....*

* * * * *

*डॉ. जोसेफ अल्बान डिसोझा (मुंबई : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष, या महान देशाच्या हजारो वर्षांच्या इतिहासात असा ऐतिहासिक क्षण कधी आला नसेल अथवा येणारही नाही जेव्हा या सन्माननीय सभागृहात आपल्या घटनेचा मसुदा एक स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही भारतीय प्रजासत्ताकाच्या निर्मितीसाठी कलमवार आणि तपशीलवार चर्चिला जाईल - या क्षणाची गरज आहे आपल्या वैयक्तिक सद्विवेकबुद्धीबाबत अंतर्मुख होण्याची; गरज आहे, बंधुभावाची आणि सहकार्याची ज्यायोगे शांतता, सांमजस्य आणि सदिच्छा हे आपल्या व्यक्तिगत आणि सामूहिक अस्तित्वाची गुणवैशिष्टये ठरतील, गरज आहे व्यापक दृष्टीकोनाची ज्यायोगे या घटनात्मक रचनेबाबतचे गुंतागुंतीचे आणि अवघड प्रश्न या राष्ट्राची भरभराट आणि प्रगती यांच्या संदर्भात तपासता येतील आणि अखेर गरज आहे ' शेजाऱ्यांवर प्रेम करा ' या सिद्धांताचा मुक्तपणे आणि निस्वार्थी भावनेने अवलंब करण्याची, ज्यायोगे राष्ट्राच्या सर्वपरी हिताच्या दृष्टीने मूलभूत धोरणाविषयक निर्णयांवर भावनिक, भावुक, संकुचित घटकांचा प्रभाव पडणार नाही.*

*बहुतेक अनेक प्रत्यक्षात प्रत्येक वक्त्याने माझ्यापूर्वी बोलताना घटनेचा मसुदा ही एक श्रेष्ठ कामगिरी असल्याचे मान्य केले आहे. सन्माननीय डॉ.आंबेडकर आणि त्यांच्या मसुदा समितीने अनेक महिन्यांच्या परिश्रमानंतर हा स्मरणीय दस्तऐवज सादर केला आहे. ही कामगिरी विशेषज्ञांची आहे, ती अथपासून इतिपर्यंत तौलनिक, वेचक आणि कार्यक्षम स्वरूपाची आहे........*

* * * * *

*श्री. के. संतानम (मद्रास : सर्वसाधारण) : ........ मसुदा समितीने उत्तम कामगिरी केली असली तरी टीकेच्या दोन मुद्यांपासून तिची सुटका होणार नाही. या घटना समितीने खुल्या अधिवेशनात मंजूर केलेल्या काही महत्वाच्या तरतुदी मसुदा समितीने स्वत:च्या जबाबदारीवर बदलल्या आहेत.....*

* * * * *

*श्री. आर. के. सिधवा (मध्य प्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, एक सक्षम आणि निष्णात वकील या नात्याने डॉ.आंबेडकर यांनी घटनेचा मसुदा या सभागृहात अत्यंत सुबोध पद्धतीने सादर करून बाह्य जगताला आणि या सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांना प्रभावित केले असले तरी घटनेचे मूल्यमापन करण्याचा तो निकष नाही. या देशातील लोकशाहीसाठी ही घटना तयार केलेली आहे आणि डॉ.आंबेडकर यांनी स्थानिक प्राधिकरणे तसेच खेडी यांच्याकडे दुर्लक्ष करून लोकशाहीची मूळ कल्पनाच नकारात्मक केली आहे....*

* * * * *

*श्री. जयनारायण व्यास (जोधपूर) : माननीय उपाध्यक्ष महोदय, डॉ. आंबेडकर आणि त्यांचे सहकारी तसेच टंकलेखक आणि कागदपत्रांच्या नकला करणारे अशा सर्वांचे आपल्यासमोर असलेली विशाल घटना तयार करण्याच्या परिश्रमांबद्दल आभार मानले पाहिजेत. हा मसुदा अत्यंत विशाल असून त्यात अनेक गोष्टींचा समावेश केलेला आहे......*

* * * * *

*श्री. बी. ए. मंडलोई (मध्यप्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत घटना मसुद्याच्या गुणवैशिष्ट्यांचे विवेचन केले आहे. सरकारचे स्वरूप काय राहणार आणि देशाची घटना काय आहे, असे प्रश्न उपस्थित करण्यात आले आणि त्यांनी असे स्पष्ट केले की, समर्थ केंद्र आणि संसदीय प्रणालीत एकच न्याययंत्रणा आणि मूलभूत हक्कांबाबत समानता असेल. ते असेही म्हणाले की स्थैर्यापेक्षा जबाबदारीवर अधिक भर देण्यात आला आहे. शांततेच्या आणि युद्धकाळातही ती पुरेशी शक्तिशाली असेल. घटनेच्या मसुद्यावर करण्यात आलेल्या विविध टीकेचा परामर्श त्यांनी घेतला असून त्यांचे भाषण घटनेवर पूर्ण प्रकाश टाकणारे आहे असे माझे मत आहे. केंद्रीय अधिकार समिती, प्रांतिक घटना समिती, सल्लागार समिती आणि अल्पसंख्याक समिती आदींच्या अहवालांवर मसुदा समितीने तयार केलेला घटनेचा मसुदा आधारित आहे. घटना समितीने आपल्या पहिल्याच अधिवेशनात आपल्या घटनेच्या उद्दिष्टांबाबत एक ठराव मंजूर केला. हा ठराव आपले आदरणीय नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडला आणि तो एकमताने मंजूर करण्यात आला. त्या मूलभूत ठरावावर - म्हणजे उद्दिष्ट ठरावावर - आपली घटना आधारित असल्याचे आपणाला निश्चित करायचे आहे. त्यात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांना मान्यता देण्यात आली आहे. मसुदा घटना त्या उद्दिष्ट ठरावाच्या अनुसार आहे आणि त्यामुळे तिने आपले उद्दिष्ट साध्य केले आहे असे आपण म्हणू शकतो.*

*आपला देश आणि आपले राष्ट्र यांच्या उद्देशाच्या कसोटीवर आपली घटना उतरते का हे तपासण्याचा आणखी एक मार्ग आहे. आपले स्वातंत्र्य, आपली लोकशाही, सर्वधर्मभावाचे सरकार यांचे या घटनेमार्फत जतन होईल का, ही ती कसोटी आहे. त्यादृष्टीने पाहिले तर ही घटना आपला हेतू साध्य करते असे माझे मत आहे.......*

*महोदय, संपूर्ण जगातील सुसंस्कृत राष्ट्रांच्या घटनांच्या तौलनिकतेमधून आपली घटना विकसित झाली आहे. आपल्या देशाच्या हितासाठी आवश्यक ते सर्व चांगले*

*मुद्दे गरजेनुसार बदल करून घेण्यात आले आहेत. ही घटना आपण विश्वासपूर्वक आणि प्रामाणिकपणे अंमलात आणली तर मला अशी खात्री आहे की आपला देश संपन्न आणि समर्थ होईल, सुखी होईल आणि आपण केवळ आपण आपले स्वातंत्र्य जतन करणार नसून आपले राष्ट्रपिता, आपले दिवंगत नेते यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणू शकू. त्यांनी म्हटले होते की त्यानंतर भारताचे स्थान असे असेल की त्यायोगे अन्य परतंत्र राष्ट्रे स्वतंत्र होतील आणि संपूर्ण जगात शांतता आणि भरभराट नांदेल.*

*महोदय, एवढे बोलून डॉ.आंबेडकर यांनी मांडलेला प्रस्ताव सभागृहाने मंजूर करावा अशी मी विनंती करतो.*

*पंडित बाळकृष्ण शर्मा (संयुक्त प्रांत : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष आणि माननीय कायदामंत्र्यांचे अभिनंदन इतक्या मित्रांनी केले आहे की या घटनेच्या मसुद्याबद्दल मी पुनश्च तशाच भावना प्रकट करणे म्हणजे पुनरूक्ती भासेल. परंतु विद्वान कायदामंत्र्यांना मी माझे नम्र आणि आदरपूर्ण अभिनंदन अपर्ण न केल्यास माझ्या कर्तव्यात कसूर करणे ठरेल. ज्या अत्यंत ओघवत्या शैलीत त्यांनी हा घटनेचा मसुदा आपल्या विचारार्थ सादर केला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.*

*अनेक मित्रांनी आणि टीकाकारांनी येथे येऊन आपल्या घटनेवर काही आरोप केले आहेत. ही घटना अत्यंत भलीमोठी बोजड असल्याची टीका वारंवार करण्यात आली आहे. या आकारमानाकडे खुद्द ठरावकर्त्यानेच निर्देश केला आहे. इतर देशांची पोटकलमे आणि उपकलमे आपण विचारात घेतल्यास आपली घटना नक्कीच जाडजूड आहे. आपल्या घटनेत ३१५ कलमे आहेत तर महोदय, ब्रिटीश उत्तर अमेरिका म्हणजेच कॅनडाच्या घटनेत फक्त १४७, राष्ट्रकुल ऑस्ट्रेलियाच्या घटनेत सुमारे १२८, दक्षिण आफ्रिका संघराज्याच्या घटनेत १५३, आयरिश घटनेत फक्त ६३, अमेरिकेच्या घटनेत २८, सोव्हिएत संघराज्याच्या घटनेत १४६, स्विस संघराज्याच्या घटनेत १२३, जर्मन राष्ट्राच्या घटनेत १८१ आणि जपानच्या घटनेत १०३ कलमे आहेत. या घटनांकडे एक दृष्टीक्षेप टाकल्यास असे आढळेल की*

*यापैकी कोणत्याही घटनेत २०० पेक्षा जास्त कलमे नसून आपल्या घटनेत मात्र ३१५ कलमे आहेत.*

*टीकाकारांनी या आकारमानाबद्दल बरीच चर्चा केली आहे. परंतु आपला मोठा देश ३३ कोटींचा आहे आणि जगातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास एक-पंचमांश लोकांसाठी ही घटना आपण तयार करत असल्याचे विसरता कामा नये. त्यामुळे आपली घटना विशाल असल्याचे आश्चर्य वाटायला नको........*

*महोदय, आपल्या देशाच्या स्वत:च्या समस्या आहेत. जगातील इतर कोणत्याही देशात आपल्या सारखी संस्थाने नाहीत. आजच्या लोकशाही तत्वांबरोबर या साऱ्या घटकांची सुसंगती साधणे आपल्या घटनाकारांनी मोजकी कलमे समाविष्ट करूनही त्यांना हे शक्य झाले नसल्यास त्यात आश्चर्यकारक असे काहीही नाही. त्यामुळे आपली घटना जाडजूड असल्याचा आरोप मला थिल्लरपणाचा वाटतो.......*

*पंडित ठाकुरदास भार्गव : ..........मी इंग्रजीत बोलावे असा आग्रह अनेक मित्रांनी केल्याने त्यांच्या इच्छेचा मी आदर करतो. हिंदीत मी अधिक सहजपणे बोलू शकतो ही वस्तुस्थिती असली तरी सभागृहाच्या सर्व सदस्यांना माझे म्हणणे समजावे अशी मला इच्छा आहे.*

*महोदय, मसुदा समितीवर झालेल्या प्रशंसेच्या वर्षावात मलाही सहभागी होण्याची इच्छा असली तरी विनाआक्षेप मी तसे करू शकत नाही. येथे काही मित्रांनी केलेल्या तक्रारी पाहता मसुदा समितीने आपल्याला अपेक्षित असणारे केलेले नाही अशी माझी भावना आहे. काही सदस्य अनुपस्थित होते, काही सहभागी झाले नाहीत तर काहींनी पूर्ण विचार केला नाही...... या घटनेने भारताच्या खऱ्या आत्म्याचे प्रतिनिधित्व केलेले नाही आणि खेड्यांच्या स्वायत्ततेची पूर्ण तरतूद या घटनेत नाही आणि या कॅमेऱ्यात (मसुदा घटनेची प्रत दाखवत) अनेक लोकांना हव्या असलेल्या भारताचे चित्र नाही. मसुदा समितीला गांधीजींचे मन जाणता आले नाही, या कॅमेऱ्यात भारतातील कोट्यवधी जनतेचे प्रतिबिंब दिसावे अशी इच्छा असणाऱ्यांचे मन समजले नाही. तथापि डॉ. आंबेडकर यांचे परिश्रम, मेहनत आणि क्षमता यांची प्रशंसा करण्यावाचून मला राहवत नाही. या*

*सभागृहासमोर त्यांनी व्यक्त केलेल्या सर्वच भावना मला मान्य नसल्या तरी त्यांच्या भाषणासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.*

*महोदय, मला असे वाटते की या घटनेचा आत्मा तिच्या उद्देशिकेत (PRE-AMBLE) असून " बंधुभाव " हा शब्द त्यात समाविष्ट केल्याबद्दल डॉ.आंबेडकर यांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. महोदय, मला आता या उद्देशिकेची कसोटी संपूर्ण घटनेला लावायची आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या घटनेत सापडू शकले, हा आदर्श आपण या घटनेत आणू शकलो तर ही घटना चांगली आहे अशी माझी भूमिका आहे.*

* * * * *

*प्रा. शिब्बनलाल सक्सेना (संयुक्त प्रांत :सर्वसाधारण) : ......माननीय उपाध्यक्ष महोदय, आपल्या घटनेच्या मसुद्यातील आधारभूत तत्वांवर चर्चा करण्यासाठी आज आपल्याला सांगण्यात आले आहे. सर्वप्रथम मी आपणासमोर ही घटना प्रस्तावित करणाऱ्या विद्वान डॉक्टरांचे अभिनंदन करतो. त्यांचे भाषण मी अनेकदा वाचले असून घटनेवर प्रकाश टाकणारी ही महाकृती आहे असे मला वाटते. घटनेच्या मसुद्याची यापेक्षा समर्थ वकिली करता आली नसती असे मला वाटते.........*

*........अखेरीस मी मसुदा समितीला एक अत्त्युत्तम घटना दिल्याबद्दल धन्यवाद देतो. मी केलेल्या सूचनांवर घटना दुरूस्तीच्या प्रसंगी विचार होईल अखेर आपल्या देशाच्या घटनेत त्यांना स्थान लाभेल अशी मला आशा आहे. महोदय, एवढे बोलून सभागृहाने हा प्रस्ताव स्वीकारावा अशी शिफारस मी करतो.*

* * * * *

*श्री. सारंगधर दास (ओरिसा संस्थाने) : माननीय उपाध्यक्ष महोदय, आधीच्या सर्व वक्त्यांप्रमाणे मी सुद्धा मसुदा समिती आणि विशेषकरून समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांचे त्यांनी केलेल्या परिश्रमांबद्दल आभार मानतो. त्याचबरोबर त्यांच्या भाषणातील काही बाबी मला मान्य नाहीत.....*

* * * * *

*श्री. आर. आर. दिवाकर (मुंबई : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय माझ्या आधी बोललेल्या सन्माननीय सदस्यांनी पुरेसा तपशील मांडला असून त्याची पुनरूक्ती करण्यात सभागृहाचा वेळ घ्यावा असे मला वाटत नाही. आपल्या देशाला नवीन घटना देण्याच्या बेतात आपण असताना माझ्या दृष्टीने महत्वाचे असलेले काही मुद्दे मी मांडणार आहे. मला स्पष्ट करायची असणारी एक बाब म्हणजे आपल्या समोर असणारा घटनेचा मसुदा ही एक महाकृती असून आपण सर्वांनी मसुदा समिती आणि या सभागृहात याबाबतचा प्रस्ताव मांडणारे समितीचे अध्यक्ष यांचे अभिनंदन आपण यापूर्वीच केले आहे. माझ्या मते मसुदा समितीने केवळ घटना समितीचे निर्णय शब्दबद्ध केलेले नसून त्यापेक्षाही बरेच काही केले आहे. मी असे म्हणेन की समितीने निर्णयांचे पुनर्विलोकन केले आहे, काही निर्णयांचे पुनर्लेखन केले आहे आणि बहुधा अनेक निर्णयांची पुनर्रचना केली आहे. प्राप्त परिस्थितीत तसे करणे अनिवार्य असू शकले तरी आपण घटनेचा मसुदा विचारात घेताना आणि आपल्या दुरूस्त्या देण्याबाबत विचार करत असताना घटना समितीचे सदस्य म्हणून आपल्याला या वस्तुस्थितीची जाणीव असणे आवश्यक आहे....*

*    *    *    *    *

*सोमवार ८ नोव्हेंबर, १९४८*

---

*भारताच्या घटना समितीची बैठक घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सकाळी दहा वाजता सुरू झाली. माननीय उपाध्यक्ष (डॉ.हरेन कुमार मुखर्जी) अध्यक्षस्थानी होते.*

---

*महबूब अली बेग साहिब बहादूर (मद्रास : मुस्लीम) : माननीय उपाध्यक्ष महोदय, डॉ.आंबेडकर यांचे विश्लेषण आणि समीक्षा अत्यंत ओघवती, आधिकारिक आणि उद्‌बोधक तसेच स्पष्टीकरणात्मक होती. हा प्रस्ताव या सभागृहाच्या विचारार्थ मांडताना त्यांनी केलेल्या अभूतपूर्व भाषणाबद्दल त्यांचा गौरव न करणे अशक्य आहे, अगदी त्यांची मते मान्य नसली तरी........*

* * * * *

*श्री. झेड. एच. लॅरी (संयुक्त प्रांत : मुस्लीम) : ...... या तरतुदींचे मूल्यमापन करताना आपण दोन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पहिली म्हणजे या ठरावाचे सादरकर्ते, अर्थातच डॉ.आंबेडकर यांनी कबूल केलेल्या काही बाबी आणि दुसरी म्हणजे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या १५ महिन्यांत लोकशाहीच्या क्रियान्वयनाचा आपला अनुभव. घटनेच्या मसुद्याचा पाया असणारा ठराव सभागृहाने मंजूर केला तेव्हा आपणास असा कोणताही अनुभव नव्हता, जो आता आहे. सन्माननीय सादरकर्त्यांनी दिलेली पहिली कबुली मी त्यांच्याच शब्दांत मांडतो: " मूलत: लोकशाहीवादी नसलेल्या भारतीय भूमीत लोकशाही ही केवळ सजावट आहे...... प्रशासनाचे स्वरूप सुचवण्यासाठी विधिमंडळांवर विश्वास टाकणे सूज्ञपणाचे ठरणार नाही. " मी आदरपूर्वक सांगतो की त्यांचे म्हणणे मुख्यत: बरोबर आहे.*

* * * * *

*श्री. हुसेन इमाम (बिहार : मुस्लीम) : ......मसुदा समितीच्या अध्यक्षांची परिस्थिती कठीण असल्याचे मला नमूद केले पाहिजे. सोव्हिएत घटनेची नक्कल न केल्याबद्दल त्यांच्यावर डाव्यांनी हल्ला केला आहे तर ग्रामपंचायत हे एकक न मानल्याबद्दल उजव्यांनी. भारतीय लोकांच्या सर्व व्याधींसाठी घटनेने काहीतरी द्यावे अशी इच्छा करणाऱ्या आमच्या मित्रांच्या मनात गोंधळ आहे. अन्न आणि वस्त्र पुरविणे हा घटनेचा भाग नव्हे. या उद्दिष्टाची एकही तरतूद घटनेत नसल्याबद्दल या घटना समितीच्या एका अत्यंत आदरणीय सदस्याने खेद व्यक्त केला. मला असे म्हणावयाचे आहे की, घटना ज्या देशात क्रियान्वित व्हायची, त्या देशाच्या गरजांवर घटना आधारित असते. आपल्या परिस्थितीजन्य वैशिष्ट्यांचा परामर्श ही घटना घेते की नाही हे आपणास पहायचे आहे.....*

* * * * *

*बेगम ऐजाज रसूल (संयुक्त प्रांत : मुस्लीम) : महोदय, घटनेच्या मसुद्याचे सुस्पष्ट आणि उद्‌बोधक विवेचन केल्याबद्दल सन्माननीय डॉ.आंबेडकर यांचे मी अभिनंदन करते. डॉ.आंबेडकर आणि मसुदा समिती यांच्यावर सोपविलेली कामगिरी सामान्य नव्हती आणि म्हणून आपण त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.*

*घटना तयार करण्यासमवेत संलग्न होणे हा मी माझा एक मोठा बहुमान समजते. या प्रसंगाच्या गांभीर्याची मला जाणीव आहे. दोन शतकांच्या गुलामीनंतर भारत वेठबिगारीच्या अंध:कारातून स्वातंत्र्याच्या प्रकाशात प्रवेश करत आहे आणि आज या ऐतिहासिक क्षणी आपण येथे स्वतंत्र भारतासाठी घटना तयार करण्यासाठी एकत्र झालो आहोत. या प्रचंड उपखंडात निवास करणाऱ्या ३० कोटी लोकांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थान निश्चितीबरोबर आपले भवितव्य ही घटना आखून देणार आहे. येथे राहणाऱ्या लोकांच्या गरजा, संस्कृती आणि बुद्धिमत्ता यांना साजेशी सर्वोत्तम व्यवस्था कशी विकसित करायची याबाबतच्या आपल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव ठेवून ही कामगिरी आपल्याला सुरू करायची आहे......*

*.......ग्राम पद्धतीबाबत डॉ.आंबेडकर यांनी केलेल्या मतप्रदर्शनावर येथे बरीच टीका झाली आहे. महोदय, त्यांचे म्हणणे मला पूर्णपणे मान्य आहे. नागरिकांच्या हक्कांबाबत आधुनिक प्रवृत्ती कोणत्याही सत्ता एकवटण्याविरूद्ध असून ग्राम पंचायती अत्यंत हुकूमशाही स्वरूपाच्या असू शकतात.....*

*महोदय, कोणताही लिंगभेद करण्यात येणार नाही ही वस्तुस्थिती एक महिला म्हणून मला अतिशय समाधानकारक वाटते. घटनेच्या मसुद्यात अशी तरतूद करणे अत्यंत इष्ट असून नव्या घटनेनुसार महिला समान संधीबाबत आश्वस्त राहू शकतील. अशी मला खात्री आहे.*

* * * * *

*डॉ. मनमोहन दास (पश्चिम बंगाल : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, आपले प्रतिभावान कायदामंत्री आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांनी या सभागृहास घटनेचा मसुदा सादर करून काही दिवस लोटले आहेत. या काही दिवसांत घटनेच्या मसुद्यावर या सभागृहाच्या विभिन्न सदस्यांनी कडाडून टीका केली आहे. घटनेचा मसुदा मंजूर करण्याबाबत या सभागृहाची सक्षमता आणि अधिकृतता, वैधता यांच्यावर प्रश्नचिन्ह उभे करणाऱ्या काही मोजक्या सदस्यांचा अपवाद वगळता बाकी सर्व सदस्यांनी याबाबत एकमताने निर्णय दिला आहे. आरंभ करण्यासाठी या घटनेच्या मसुद्यातील काही कलमे आणि उपकलमे यांच्यात काही बदल करून, काही भर घालून आणि काही वगळून या सर्वांनी मान्य केली आहे. या घटनेचे अत्यंत आश्वासक असे वैशिष्ट्य म्हणजे एक नागरिकत्व. मसुदा समितीच्या अध्यक्षांनी म्हटल्याप्रमाणे - घटनेच्या मसुद्याने आपल्याला एक नागरिकत्व, म्हणजे भारताचे नागरिकत्व दिलेले आहे. हे वैशिष्ट्य अमेरिकी घटनेत आढळत नाही. प्रांतवादाच्या या घटकेला, जेव्हा प्रत्येक प्रांत शेजारच्या प्रांतावर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आहे, जेव्हा आपण शेजारच्या प्रांताची सहानुभूती आणि सदिच्छा गमावलेली आहे, अशा प्रसंगी हे वैशिष्ट्य अतिशय आश्वासक आहे.*

*ही घटना मंजूर झाल्यानंतर भारतभर समान अधिकार आणि समान विशेषाधिकार देणारे, एकच नागरिकत्व प्रदान करणारे कलम मंजूर झाल्यानंतर शेजारी प्रांतांचे दरवाजे आपल्यासाठी खुले होतील हे जाणवून मला, विशेषत: पश्चिम बंगालचा सदस्य म्हणून अभिमान वाटत आहे कारण त्यायोगे पूर्व पाकिस्तानातील आपल्या दुर्देवी बांधवांना आपल्या शेजारील प्रांतांमध्ये श्वास घेण्यापुरती जागा मिळू शकेल.....*

* * * * *

*श्री. व्ही. आय. मुनिस्वामी पिलाई (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, या सन्माननीय सभागृहाला घटनेचा मसुदा मंजूर करण्यासाठी सादर करणाऱ्या मसुदा समितीचे परिश्रम आणि तिने दिलेली सेवा यांची या सभागृहातील अथवा बाहेरीलही कोणी हेटाळणी करू शकणार नाही. या महान उपखंडाच्या उत्थानासाठी मसुदा समितीने जगातील विविध घटनांचे मनन करून आवश्यक त्या तरतुदी संकलित केल्याबद्दल भावी पिढीला या मसुदा समितीचा निश्चितच अतिशय अभिमान वाटेल....*

*या मोजक्या निरीक्षणांसह मसुदा समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी या सभागृहाला सादर केलेल्या घटनेच्या मसुद्यासाठी दिलेल्या महत्तम योगदानाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि हा प्रस्ताव स्वीकृत करावा अशी शिफारस करतो.*

*श्रीमती दक्षायनी वेलायुधान (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, आता घटनेचा मसुदा आपल्यासमोर सर्वसाधारण चर्चेसाठी असल्याने आपण मला याबाबतचा माझा दृष्टीकोन व्यक्त करण्याची अनुमती द्यावी ही विनंती. नूतन भारताच्या सर्वसाधारण मर्यादेत मसुदा समितीच्या प्रतिभाशाली आणि निष्णात अध्यक्षांनी आपले कर्तव्य उत्तमप्रकारे पार पाडले आहे. मला असे वाटते की सत्तांतराच्या व्यापक तत्वांपलिकडे त्यांना इच्छा असली तरी ते जाऊ शकले नसते आणि त्यामुळे माझी अशी भावना आहे की त्यांच्यावर करण्यात आलेली टीका पूर्णपणे असहिष्णु आणि अस्थानी आहे. यात कोणताही दोष असलाच तर आणि मला वाटते की तो आहे- तो येथे उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचा आहे, घटना*

*तयार करण्यासाठी येथे पाठविण्यात आलेल्यांचा आहे आणि स्वातंत्र्यासाठी कष्ट सोसलेल्या कोट्यावधी मुक्या जनतेने मोठ्या आशेने ज्यांच्यावर जबाबदारी सोपवून या सभागृहात पाठविले, त्यांचा आहे. तथापि, याचा अर्थ असा नव्हे की या मसुद्यात टीकास्पद असे काहीही मला दिसलेले नाही......*

*श्री. देशबंधु गुप्ता (दिल्ली) : अध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांचे अभिनंदन सभागृहातील विविध सदस्यांनी केले असले तरी मी त्यांचे अभिनंदन करू शकत नसल्याबद्दल दिलगीर आहे.......*

*श्री.गोकुळभाई दौलतराम भट्ट (मुंबई संस्थाने) : ........ मला हे म्हणायचे होते. दिल्ली आणि इतर भूप्रदेशांबद्दल माझी अशी विनंती आहे की दिल्ली ही राजधानी असल्याची वस्तुस्थिती विचारात घेऊन तिला विशेष दर्जा देण्यात यावा. याबाबतीत लाला देशबंधु गुप्ता यांच्याबरोबर मी सहमत आहे. परंतु अजमेर-मारवाड, कुर्ग, पंतपिपलोदा यांसारखे छोटे भूप्रदेश प्रांतांमध्ये विलीन करावेत. डॉक्टर साहेबांना माझे हे निवेदन आहे. ते स्वत: एक प्रकांड विद्वान असून हा देश म्हणजे सुद्धा विद्वतेची भूमी आहे असे त्यांनी समजावे. त्यांनी या घटनेत भारताच्या आत्म्याला स्थान द्यावे असे माझे आवाहन आहे...*

* * * * *

*ग्यानी गुरमुखसिंह मुसाफिर (पूर्व पंजाब:शीख) : अध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर कोणत्याही अभिनंदनास पात्र नाहीत असे माझे मित्र सन्माननीय श्री.देशबंधु गुप्ता यांच्याप्रमाणे मी म्हणू शकत नाही. अनेक बाबींसाठी विविध कारणांनी ते अभिनंदनास पात्र आहेत आणि ही पहिली घटना तयार करण्यासाठी समितीने केलेले परिश्रम खचित प्रशंसनीय आहेत. असे असूनही एखाद्याला एखादी चूक आढळल्यास तिची नोंद ते समजूतदारपणे घेतात....*

*रेव्हरंड जे. जे. एम. निकोल्स-रॉय (आसाम : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, हा घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी स्वीकारलेल्या प्रचंड जबाबदारीबद्दल डॉ.आंबेडकर आणि मसुदा समितीच्या अन्य सदस्यांचा सन्मान करण्यासाठी सहभागी*

*होणे खरोखर हे मोठे सौभाग्याचे आहे. हे सर्वजण आपल्या विशेष धन्यवादास पात्र आहेत....*

*सहाव्या सूचीत स्वायत्त जिल्हे असे नामाभिधान देण्यात आलेल्या आसाम मधील डोंगरी जिल्ह्यांसाठी स्वायतत्ता प्रदत्त जिल्हा परिषदा निर्माण करण्याचा मसुदा स्वीकारल्याबद्दल मी मसुदा समितीला खास धन्यवाद देतो.*

* * * * *

*श्री. मोहम्मद इस्माईल साहिब (मद्रास : मुस्लीम) : माननीय उपाध्यक्ष महोदय, ..........घटनेचा मसुदा विचारात घेण्यासाठीच्या प्रस्तावावर या सभागृहात डॉ.आंबेडकर यांनी केलेले भाषण खरोखर अत्यंत महान आहे. स्पष्टता, आर्जव, प्रभाव आणि तर्कशुद्धता यांच्या निकषांवर यापेक्षा चांगले भाषण करता येईल असे मला वाटत नाही. त्यांचे हार्दिक अभिनंदन परंतु या भाषणात त्यांनी सांगितलेले सर्वच मान्य आहे असेही नाही....*

* * * * *

*श्री.अलादी कृष्ण अय्यर (मद्रास:सर्वसाधारण): महोदय, घटनेच्या मसुद्याबद्दल थोडे बोलण्यापूर्वी डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिभावान आणि प्रभावी भाषणाबद्दल, घटनेच्या तत्वांबद्दल त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणाबद्दल त्यांच्या करण्यात आलेल्या प्रशंसेत मी सुद्धा सहभागी होत आहे... तथापि, भारतातील ग्रामीण समुहांबद्दल माझ्या सन्माननीय स्नेह्यांनी प्रकट केलेल्या; " लोकशाही म्हणजे भारतीय भूमीवरील सजावट आहे " या त्यांच्या निरीक्षणाबद्दलची माझी ठाम प्रतिकूलता मला व्यक्त केलीच पाहिजे...*

*घटनेच्या मसुद्याबद्दल माझे मत मांडण्यापूर्वी माझे सन्माननीय स्नेही श्री.टी.टी.कृष्णमाचारी यांनी मसुदा समिती आणि तिच्या सदस्यांच्या सहभागाबाबत नोंदविलेल्या निरीक्षणांबाबत माझी भूमिका स्पष्ट करणे ही माझी वैयक्तिक आणि सभागृहाप्रतीची जबाबदारी समजतो. माझी प्रकृती ठीक नसतानाही समितीचा सदस्य म्हणून तिच्या अनेक बैठकांमध्ये मी सक्रियपणे सहभागी झालो आणि*

*बैठकांना हजर राहण्यास असमर्थ असतानाही माझ्या सहकाऱ्यांच्या विचारार्थ टिपणे आणि सूचना पाठविल्या. घटनेचा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर प्रकृतीच्या कारणास्तव मी समितीच्या कोणत्याही कामकाजात सहभागी होऊ शकलो नाही आणि घटनेचा मसुदा दुरूस्तीसाठी करण्यात आलेल्या कोणत्याही सूचनांच्या श्रेयावर मी दावा करू शकत नाही...*

*.........घटनेच्या मसुद्याच्या संक्षिप्त अवलोकनावरून सदस्यांना हे पटेल की ही घटना लोकशाहीवादी सरकारच्या सच्च्या तत्वांवर आधारित असून वाढ आणि विस्तार यांना आवश्यक असणारी तत्वे घटनेतच समाविष्ट आहेत; तसेच जगातील सर्वाधिक प्रगत लोकशाही घटनांना अनुसरून ती आहे. घटना म्हणजे अखेर आपण तिचा कसा वापर करतो यावर सारे अवलंबून आहे, याचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे. याचे सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेची घटना, जी अंतिमत: विविध राज्यांनी मंजूर केली तेव्हा तिच्याबद्दल किमान उत्साह होता. परंतु ही घटना काळाच्या कसोटीवर उतरली असून उर्वरित लोकशाही जगतात आदर्श घटना म्हणून मानली जाते.......*

* * * * *

*पंडित गोविंद मालवीय : महोदय, अन्य काहीही बोलण्यापूर्वी हा घटनेचा मसुदा आपल्याला सादर करण्याच्या कृतीबद्दल आपण सर्वजण, मसुदा समिती, तिचे मेधावी प्रज्ञावान अध्यक्ष आणि आमचे स्नेही डॉ.आंबेडकर यांचे मी हार्दिक अभिनंदन करू इच्छितो. त्यांच्यासमोरची समस्या कठीण होती आणि ती त्यांनी अतिशय उत्तम प्रकारे हाताळली आहे. घटनेच्या मसुद्यातील अनेक बाबी काहीशा वेगळ्या असाव्यात अशी इच्छा असू शकते, परंतु कोठेही काहीही निर्माण केले तरी त्याबद्दल असेच वाटू शकते......*

* * * * *

*मंगळवार ९ नोव्हेंबर, १९४८*

---

*भारताच्या घटना समितीची बैठक घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सकाळी दहा वाजता सुरू झाली. माननीय उपाध्यक्ष (डॉ.हरेन कुमार मुखर्जी) अध्यक्षस्थानी होते.*

---

*श्री. आर. शंकर (त्रावणकोर) : महोदय, सर्वप्रथम घटनेच्या मसुदा रचनाकारांनी अत्यंत कार्यक्षमतेने आपले कर्तव्य पार पाडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन मी केले पाहिजे; आणि घटनेच्या मसुद्यातील तत्वांचे आपल्यासमोर अतिशय तरल आणि स्पष्ट विवेचन केल्याबद्दल डॉ.आंबेडकर यांचे विशेषकरून अभिनंदन केले पाहिजे. घटना मसुद्याच्या तपशीलात जाण्याचा माझा उद्देश नसून या घटनेसंबंधी एक-दोन बाबींवरच मी बोलणार आहे. घटनेचा मसुद्याची सर्वात प्रमुख वैशिष्टये म्हणजे अत्यंत शक्तिशाली केंद्र आणि काहीसे दुर्बल परंतु एकरूप घटक सर्व संस्थानांनी आणि प्रांतांनी एकाच मार्गाने जाणे शक्य व्हावे अशी मनोभूमिका संस्थानांच्या प्रतिनिधींनी स्वीकारावी असे कळकळीचे आवाहन डॉ.आंबेडकर यांनी केले आणि कालांतराने संस्थाने आणि प्रांत यांच्यात कोणताही भेद न ठेवता संघराज्याचे एकरूप घटक बनावे...*

*　　*　　*　　*　　*

*श्री. एम. अनंतशयनम अय्यंगार (मद्रास : सर्वसाधारण) : महोदय, मसुदा समितीने सादर केलेल्या घटनेच्या मसुद्याबाबत मूलभूत महत्वाचे आक्षेप घेण्यात आले आहेत. आपली प्राचीन संस्कृती अथवा परंपरा प्रतिबिंबित करणारे या घटनेत काहीही नसल्याचे मला मान्य आहे. पश्चिमेतील काही जुन्या घटनांचे - पश्चिमेकडील काही आधुनिक घटनांचेही नव्हे - तुकडे जोडून आणि भारत सरकार कायदा, १९३५ याची प्रतिकृती वापरून ही गोधडी तयार केली आहे हे सत्य आहे. हे एकत्र करण्यात आल्याचेही खरे आहे. यासाठी डॉ.आंबेडकर*

*जबाबदार नाहीत; घटनेच्या या स्वरूपाला फक्त आपणच जबाबदार आहोत. आपल्या प्राचीन संस्कृतीची स्मृती जागृत होईल असा ठसा या घटनेवर आपण उमटवला पाहिजे याचा विचार आपण केला नाही. डॉ.आंबेडकर यांच्यापेक्षा हा दोष आपला अधिक आहे...*

* * * * *

*श्री. रोहिणी कुमार चौधरी (आसाम : सर्वसाधारण) : महोदय, या अतीव महत्वाच्या चर्चेत सहभागी होण्याची संधी मला दिल्याबद्दल मी आपल्या प्रती कृतज्ञ आहे. परंतु पुढे बोलण्यापूर्वी मसुदा समितीचे सदस्य, समितीचे आदरणीय अध्यक्ष आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आमच्या गरीब आसाम प्रांताची आपल्या तारूण्यात सेवा करणारे आणि ज्यांचे आजही प्रेमाने आणि कृतज्ञतेने स्मरण करण्यात येते असे आपले घटनाविषयक सल्लागार यांना मी अभिवादन करू इच्छितो.....*

* * * * *

*श्री. एल. कृष्णस्वामी भारती (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, ...........घटनेच्या मसुद्याच्या विद्वत्तापूर्ण आणि प्रतिभावान विवेचनाबद्दल डॉ.आंबेडकर या सभागृहाच्या अभिनंदनास पात्र आहेत. मसुद्यातील तरतुदींसाठी ते अभिनंदनपात्र नाहीत कारण त्या तरतूदी त्यांच्या नाहीत हे स्पष्ट कारण आहे. सन्माननीय सदस्यांना स्मरत असेल की, घटनेच्या मसुद्यातील बहुतेक पोटकलमांवर या सभागृहात चर्चा आणि वादविवादानंतर निर्णय झाला होता. मसुदा समितीने सम्मिलित करण्यासाठी अगदी मोजक्या बाबी ठेवण्यात आल्या होत्या. मात्र त्यांची संगतवार रचना करण्याच्या परिश्रमांबद्दल सभागृह त्यांना धन्यवाद देईल....*

* * * * *

*श्री. विश्वंभर दयाल त्रिपाठी (संयुक्त प्रांत : सर्वसाधारण) : महोदय, ........थेट विषयावरच बोलायचे म्हणजे मसुदा समितीचे सदस्य आणि अध्यक्ष यांनी घेतलेले परिश्रम तसेच घटनेची योग्यता यांच्यासाठी त्यांचे अभिनंदन करणे ही केवळ औपचारिकता आहे. मी ही औपचारिकता पाळणार नाही. त्यांनी परिश्रम केले*

*आहेत आणि या घटना समितीमध्ये आपण निश्चित केलेल्या तत्वांच्या आधारे त्यांनी आपल्यासमोर घटनेचे पूर्ण रूप उभे केले आहे यात संशय नाही. घटनेच्या मसुद्यात लक्षणीय गुणविशेषता आहे याचीही मला जाणीव आहे. त्यांनी विविध देशांच्या घटनांचा बारकाईने अभ्यास केला आहे आणि त्यातून निवड करण्याचा प्रयत्न करून आपल्या देशाच्या गरजांच्या अनुसार त्यांचे अनुयोजन केले आहे, याबाबतही संशय नाही. घटनेच्या मसुद्याची ही प्रमुख गुणविशेषता आहे. एका शब्दात म्हणजे ही घटना ' सनातन ' आहे.....*

*　　*　　*　　*　　*

*श्री. एस. व्ही. कृष्णमूर्ती राव (म्हैसूर) : माननीय उपाध्यक्ष, घटनेच्या मसुद्यावर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे. मसुदा समिती आणि समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांचा बहुमान करणाऱ्या सदस्यांच्या आवाजात मी सहभागी होत आहे.*

*एकात्मिक आणि संघराज्यात्मक अशा दोन्ही प्रकारच्या विविध लोकशाही घटनांचे सर्वोत्तम अनुभव एकत्र करण्याचा प्रयत्न घटनेच्या मसुद्यात करण्यात आला आहे. अर्थातच कोणतीही घटना परिपूर्ण नसते आणि या सभागृहाची अंतिम संमती प्राप्त होण्यापूर्वी या घटनेलाही काही बदलांचा स्वीकार करावा लागेल.....*

*　　*　　*　　*　　*

*श्री. एन. माधव राव (ओरिसा संस्थाने) : माननीय उपाध्यक्ष, या चर्चेत सहभागी होण्याचा माझा हेतू नव्हता. परंतु चर्चेच्या ओघात घटनेच्या मसुद्यातील केवळ काही तरतुदींवरच नव्हे तर मसुदा समितीच्या कार्यपद्धतीबद्दल अनेक शेरे मारण्यात आले. समितीची कृती अथवा कृतीचा अभाव याबाबतच्या कथित दोषांवर टीका करण्यात आली. ही टीका ज्या गैरसमजांवर आधारलेली आहे, त्याबाबत काल श्री.अलादी कृष्णस्वामी अय्यर समितीच्या वतीने बोलले आणि श्री.सादुल्ला लवकरच बोलतील, ज्यायोगे त्यांचे निराकरण होईल. समितीच्या एका मोठ्या वर्गात असे गैरसमज असल्यास ते दूर करण्यामधील माझा वाटा समितीचा एक सदस्य*

आणि जेव्हा मी या समितीत सामील झालो तेंव्हा तिच्या अनेक बैठकांमध्ये सहभागी झाल्याच्या नात्याने मी उचलावा असे मला वाटले.

घटनेचा मसुदा सर्व बाबींची पूर्तता करत नाही किंवा आपणाला वैयक्तिकरित्या आवडले असते अशा प्रकारेही करत नाही हे खरे आहे. उदाहरणार्थ, सन्माननीय सदस्यांनी असे निदर्शनास आणले आहे की घटनेनुसार गोवधबंदी केलेली नाही, मूलभूत अधिकारांबाबत अत्यधिक तपशील आहे, राष्ट्रपित्याचा आणि राष्ट्रध्वज तसेच राष्ट्रगीत यांचा संदर्भ नाही. त्याचप्रमाणे दोन सन्माननीय सदस्यांनी बरोबर निरीक्षण नोंदवले आहे की घटनेच्या मसुद्यात देवाचा उल्लेख नाही. आपणा प्रत्येकाच्या लाडक्या कल्पना असतात; परंतु इतर संदर्भात अशा कल्पना अंतर्मूल्यामुळे कितीही योग्य अथवा मौल्यवान वाटल्या तरी त्या आपल्या हेतुबरोबर निगडीत असल्याखेरीज आणि घटना समितीने स्वीकारल्याखेरीज त्यांचा समावेश घटनेत करता येणार नाही.

या मसुद्यावर गांधीवादी तत्वज्ञानाची मोहर नाही आणि १९३५ च्या भारत सरकार कायद्यासह इतर काही तरतुदी परदेशी सामग्रीतून उसनवार करण्यात आल्या असल्या तरी प्राचीन भारतीय राज्यव्यवस्थेतील कोणतेही घटक या वस्त्रात विणलेले नसल्याच्या कारणावरून अनेक वक्त्यांनी टीका केली आहे.

लष्कर बरखास्त करणे, कायदेमंडळे नाकारणे अशी पावले उचलून गांधीवादी आदर्शांचे तर्कशुद्ध पालन करण्यास आमचे गांधीवादाचे अनुयायी मित्र तयार आहेत का? आम्हाला निश्चित आधारावर असे सांगण्यात आले आहे की विधिमंडळांचे कामकाज म्हणजे वेळेचा अपव्यय असे गांधीजी समजत असत; आपली न्याययंत्रणा मोडीत काढून तिच्या ठिकाणी एखादी साधी आणि अनौपचारिक न्यायदान व्यवस्था आणण्यास ते तयार आहेत का? कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला आणि सार्वजनिक कार्यकर्त्याला दरमहा ५०० रूपयांवर किंवा जी काही मर्यादा अंतिमत: ठरविण्यात आली त्यापेक्षा जास्त वेतन मिळू नये असा आग्रह ते धरणार आहेत काय ? हे सर्व करता येईल आणि करावे असा विश्वास असणारे काही काँग्रेस नेते मला माहित आहेत. परंतु घटना समितीने गेल्यावेळी निश्चित केलेल्या घटनेबद्दल आता आपण बोलत आहोत....

*　　*　　*　　*　　*

*सय्यद मुहम्मद सादुल्ला (आसाम:मुस्लीम) : माननीय उपाध्यक्ष महोदय, ..........मसुदा समिती स्वयंभू नाही. माझी आठवण बरोबर असल्यास तिची निर्मिती या सभागृहाच्या ऑगस्ट, १९४७ मधील ठरावान्वये झाली आहे. त्यावेळी गंभीर आजार झाल्याने त्या अधिवेशनास मी हजर राहू शकलो नव्हतो. परंतु कामकाजाच्या इतिवृत्तावरून मला असे दिसते आहे की उद्दिष्ट ठराव चौकटीच्या मर्यादेत मसुदा समितीला घटना तयार करण्यास सांगण्यात आल्याने आता येथे ऐकलेल्या टीकेस आम्हास सामोरे जावे लागेल. ही शक्यता त्या काळातही सूज्ञ मंडळींना जाणवली होती आणि मुंबई प्रांताचे विद्वान मुख्यमंत्री श्री (बाळासाहेब) खेर यांनी अधिकृत ठरावाला एक दुरूस्ती सुचवल्यानंतर हा निर्देश आपणाला देण्यात आला होता.......*

*मी आता श्री.खेर यांच्या भाषणातूनच वाचून दाखवतो. ही मसुदा समिती स्थापन करण्याबाबतच्या मूळ ठरावाला दुरूस्ती सुचवताना त्यावेळी श्री.खेर म्हणाले, की " घटनाविषयक सल्लागारांनी या घटना समितीने यापूर्वीच घेतलेले निर्णय सम्मिलित करून तयार केलेल्या भारतीय घटनेच्या मसुद्याची छाननी करण्याची जबाबदारी मसुदा समितीवर सोपवावी; तसेच संलग्न सर्व विषय आणि घटनेत जे विषय येणे आवश्यक असतील असे विषय समाविष्ट करावेत आणि मसुदा समितीने फेररचित केलेला मसुदा घटना समितीच्या विचारार्थ सादर करावा. "*

*...........ही दुरूस्ती सभागृहाने स्वीकारली होती. सन्माननीय श्री.खेर यांच्या या सभागृहातील स्वीकृत दुरूस्तीनंतर आम्ही आमचे अधिकारक्षेत्र ओलांडून बरेच पुढे गेलो आहोत असे घटना समितीच्या सदस्यांनी म्हणणे योग्य नाही.......*

* * * * *

*माननीय उपाध्यक्ष : आपण विषयाला धरून पुढे जाऊ या.*

*सय्यद मुहम्मद सादुल्ला : ......सन्माननीय सदस्यांना मी कसे सांगू की आम्ही परिश्रम केले, प्रयत्नांची शर्थ केली, तिन्ही खंडांमधील प्राचीन आणि प्रचलित अशा घटनांचा धांडोळा एक मसुदा बनविण्यासाठी घेतला. त्याचे वर्णन*

*केवळ एक गोधडी म्हणून करण्यात आले आहे. परंतु ज्यांच्याकडे कला आहे, हस्तकौशल्यावर ज्यांचे प्रेम आहे त्यांना निश्चित ठाऊक आहे की तुकडे एकत्र करूनही सुंदर अभिरचना, आवडेल अशी रूपरेखा निर्माण करता येते. आमच्या मसुद्यामध्ये त्रुटी असल्या तरी या सभागृहातील चर्चेकरिता आधार होण्यासाठी एक शक्य तेवढा पूर्ण दस्तऐवज देण्याचा, संपूर्ण चित्र या सन्माननीय सभागृहासमोर, उभे करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. घटना या विषयावर हाच शब्द अंतिम आहे अथवा त्यातील तरतुदींमध्ये काहीही न्यून नाही किंवा ही कलमे बदलता येणार नाहीत असे दावे मसुदा समितीने कधीही केलेले नाहीत. या सन्माननीय सभागृहासमोर अंतिम मंजुरीसाठी हा मसुदा ठेवण्यात आल्यावरूनच असे दिसते की आमची बांधीलकी एका अथवा दुसऱ्याही धोरणाला नाही.*

*........विविध समित्यांच्या शिफारशींबाबत जेथे आमचे मतभेद होते अथवा या सन्माननीय सभागृहाच्या स्वीकृत तत्वांमधील एखादा शब्द इकडेतिकडे बदलायचे साहस आम्ही केले त्या-त्या ठिकाणी तळटीपेत आम्ही पुरेसा संकेत दिला आहे ज्यायोगे तेथे नकळत काहीही समाविष्ट करता येणार नाही. याकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यात येत आहे कारण यापूर्वीच स्वीकृत तत्वे अथवा समित्यांच्या शिफारशी यापासून मसुदा समितीला दूर गेलेल्या विषयांवर लक्ष केंद्रीत करता यावे.*

*(श्री.सादुल्ला यांच्या भाषणानंतर खालीलप्रमाणे प्रस्तावमतास टाकण्यात आला - संपादक)*

*माननीय उपाध्यक्ष : " प्रश्न असा आहे की, घटना समितीच्या २९ ऑगस्ट, १९४७ रोजीच्या ठरावाला अनुसरून नियुक्त केलेल्या मसुदा समितीने तयार केलेला भारताच्या घटनेचा मसुदा आता घटना समितीने विचारात घ्यावा. "*

*प्रस्ताव संमत झाला.*

*त्यानंतर घटना समितीची बैठक सोमवार १५ नोव्हेंबर, १९४८ रोजीच्या दहा वाजेपर्यंत तहकूब झाली.*

* * * * *

## (३)

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताच्या घटना समिती समोर केलेले शेवटचे भाषण.

## " राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही. "

*दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ ला संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन त्यादिवशी भारताचे संविधान संमत झाले. त्याच्या एक दिवस आधी म्हणजे २५ नोव्हेंबर, १९४९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधानाचे शिल्पकार या शब्दांनी ज्यांचा सार्थ गौरव होतो, यांचे संविधान सभेत शेवटचे भाषण झाले.*

*संविधान निर्माणासाठी त्यांना किती परिश्रम घ्यावे लागले याची प्रचिती पुढील वृत्तांतावरुन येईल.*

*" चालू महिन्याच्या १७ तारखेस घटना समितीचे कामकाज तहकूब होईल असा अंदाज आहे. घटना सभा स्थगिती झाल्यास काही दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण विश्रांती घ्यावी लागेल. विश्रांतीसाठी सौ. माईसाहेबांच्या समवेत डॉ. बाबासाहेब बहुतकरुन काश्मिरला जातील असा रंग दिसतो.*

*संविधान सभेचे कामकाज चालू असता, डॉक्टरसाहेब रोज १२/१२, १४/१४ तास कामात व्यग्र असतात. येत्या वर्षाअखेर म्हणजे ३१ डिसेंबर, १९४९ चे आत त्यांना सर्व घटना पास करुन घ्यावयाची आहे. कारण नवी घटना, २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात यावी असा सर्वांचा संकल्प आहे. "*

*संविधान निर्मितीतील त्यांच्या योगदानाबद्दल आणि कर्तत्वाबद्दल संविधान सभेच्या बहुतेक सदस्यांनी आणि वृत्तपत्र क्षेत्रातील या संबंधातील जाणकारांनी त्यांची मुक्तकंठाने स्तुति केली. त्यातील काहींचे उद्‌गार पुढीलप्रमाणे—*

*" आर के. सिधवा— हे सर्वोत्तम संविधान आहे. हे लोकांना सांगणे मी माझे कर्तव्य समजतो आणि संविधान सभेचा प्रत्येक सदस्य हे सांगेल अशी माझी अपेक्षा*

*आहे. आपल्यात कितीही मतभेद असले तरी या संविधानाचा आपल्याला अभिमान आहे. आणि आपण जगाला हे जाहिर करु या जेणेकरुन जगाला ही जाणीव होईल की हा दस्तावेज संदर्भ घेण्यायोग्यतेचा आहे. २६ जानेवारी १९५० या ऐतिहासिक दिवशी आपण लोकसत्ताक सार्वभौम राज्य होऊ आणि त्या दिवशी या संविधानाला कायद्याचे स्वरुप प्राप्त होईल याचा मला अभिमान वाटतो. "*

*" पंडित ठाकूरदास भार्गव— मसुदा समिती आणि विशेषत:तिचे अध्यक्ष यांच्याप्रती आपण सर्वांनी कोणत्या शब्दात कृतज्ञता व्यक्त करावी हे मला कळत नाही. कायेदविषयक कुशाग्र बुध्दी, अथक परिश्रम, अत्युच्च दर्जाचे कौशल्य, दुर्दम्य आत्मविश्वास, आधुनिकतेशी संलग्नता या गुणांनीयुक्त मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी या संविधान सभेच्या माध्यमातून नेतृत्व केले आणि या संदर्भात निर्माण झालेल्या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक केली. "*

*" बेगम ऐझाज रसूल—संविधानाचे भारतीय जनतेच्या आशा आकाक्षांना मूर्त स्वरुप दिले आहे. शब्द योजना, अंतर्भूत तरतुदीच्या निकषावर संविधानाचे मूल्यमापन होणार असेल तर जगातील संविधानात आपले संविधान श्रेष्ठ दर्जा प्राप्त योग्यतेचे आहे. आणि त्याबद्दल आपल्याला असलेला अभिमान न्यायोचित आहे. नेत्रदीपक कार्य केल्याबद्दल मी डॉ. आंबेडकर आणि मसुदा समितीचे सदस्य यांचे अभिनंदन करते.*

*धर्मनिरपेक्ष राज्य हे आपल्या संविधानाचं महत्त्वपूर्ण वैशिष्टय आहे. धर्म-निरपेक्षतेच आग्रही प्रतिपादन हे आपल्या संविधानाचे पावित्र्य आहे आणि त्याचा आम्हास गर्व आहे. मला पूर्ण विश्वास आहे. ही धर्मनिरपेक्षता नेहमी जोपासली जाईल आणि कलंकित केली जाणार नाही. भारतातील लोकांचे ऐक्य त्यावर अवलंबून आहे. अन्यथा त्याशिवाय विकासाच्या आशा-आकांक्षा व्यर्थ ठरतील. "*

*संविधान सभेच्या दैनंदिन कामकाजाचा वृत्तांत दिल्ली तसेच बाहेरील वृत्तपत्रांना देण्याचे काम जे.पी. चतुर्वेदी या प्रसिध्द पत्रकाराकडे सोपविले होते. चतुर्वेदी हे भारतीय पत्रकारितेच्या चळवळीचे जनक समजले जातात. संविधान निर्मितीच्या कार्यातील डॉ. आंबेडकरांच्या योगदानाविषयी ते म्हणतात. " त्या काळात त्यांना*

*जवळून पाहण्याचा सन्मान मला लाभला. डॉ. आंबेडकरांना कोणीही आव्हान देणे अशक्य होते. ते जगातील सर्वच संविधानांचे अधिकारी विद्वान होते. त्यांचेशी चर्चा करायला मिळणे म्हणजे बौध्दिक मेजवानी होती व मला ही संधी मिळत असे.*

*दलितांच्या आणि शोषितांच्या उध्दारासाठी त्यांनी केलेला संघर्षच केवळ प्रामुख्याने, मुख्यत्वेकरुन सांगितला जातो. परंतु भारतीय नवीन प्रजासत्ताकाच्या पायाभरणीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबाबत काहीच उल्लेख केला जात नाही. आधुनिक मनू म्हणून त्यांना संबोधिले जाते. ज्या समाजातून त्यांचा उदय झाला त्यांच्या हितासाठी वेगळ्या कायद्यांना निर्धारित करण्याचाच केवळ त्यांनी प्रयत्न केला असे नव्हे तर त्यांनी नवीन कायदा दिला. भारतात बाल्यावस्थेत असलेल्या लोकशाहीला त्यांनी संविधानाच्या रुपानी कायदा दिला. संविधान निर्माण करणाऱ्या संविधान सभेतील पितामंहांची जेव्हा आपण आठवण करतो त्यावेळेस आपण हे विसरता कामा नये की भारताच्या संविधान सभेत डॉ. आंबेडकर हे सर्वात उत्तुंग व्यक्तिमत्व होत. ज्यांनी वर्तमान संविधानाची प्रत्यक्षात रचना केली. भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या उत्क्रातीला सुव्यवस्थित करण्यासाठी तसेच देशाची अखंडता सुरक्षित ठेवण्यासाठी त्याचे विचार दिशा दिग्दर्शीत करतील. ”*

*सुप्रसिध्द घटनातज्ञ एस.व्ही. पायली यांनी म्हटले आहे. “ डॉ. आंबेडकरांनी आपल्या सोबत विद्वता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठा व वक्तृत्व आणि अनुभव पणास लावले. अतिशय क्लिष्ट अशा प्रकारच्या प्रश्नावर देखील अतिशय दुर्लभ अशी त्याची पकड होती आणि आपली मते अशावेळी अतिशय प्रभावीपणे तितकेच सुलभपणे ते मांडीत. जगातील सर्व सुधारलेल्या राष्ट्राच्या घटनात्मक कायद्यांचे व त्यांचे अंमलबजावणीचे त्यांना प्रचंड ज्ञान होते. तसेच १९३५ च्या कायद्याचे बारकावेही त्यांना माहित होते. घटनेचा मसुदा चर्चिला जात असताना उद्‌भवलेल्या कोणत्याही टीकेला ते स्पष्ट आणि सुटसुटीतपणे स्पष्टीकरण देत. त्यांनी उत्तरे दिल्यानंतर सदस्यांच्या मनातील संदेह, गोंधळ, असंदिग्धपणा यांचे ढग नाहीसे होत. तर्कस्पष्ट युक्तिवाद, प्रभावी आणि सर्वांना समजणारे स्पष्टीकरण कोणत्याही मुद्याला तात्काळ प्रतिवाद करुन वाद संपुष्टात आणण्याची हातोटी त्यांच्याशिवाय*

*अन्य कोणत्याही सदस्यात नव्हती. हे सारे करीत असताना विरोधकाने एखादा रास्त मुद्दा मांडला तर तो समजून घेऊन स्विकारण्याचा उदारपणा देखील त्यांच्यात होता. म्हणूनच त्यांना आधुनिक मनू अथवा भारतीय राज्यघटनेचे जनक म्हणतात, ते साजेसेच आहे. "*

*बंगालच्या फाळणीमुळे तिथून निवडून आलेल्या काही सदस्यांचे संविधान सभेचे सदस्यत्व संपुष्टात आले होते. त्यात डॉ. आंबेडकरांचाही समावेश होता. तेव्हा पर्यंतच्या त्यांच्या कार्यावरुन संविधान सभेला त्यांच्यातील घटनातज्ञाची तसेच त्यांच्या मार्गदर्शनाची व सहकार्याची नितांत गरज भासायला लागली होती. हे डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मुंबई प्रांताचे तत्कालीन प्रधानमंत्री श्री.बी.जी.खेर यांना ३० जून १९४७ रोजी लिहिलेल्या पत्रावरुन दिसून येईल. ते आपल्या पत्रात लिहितात " दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार न करता आम्हाला असे वाटायला लागले आहे की, डॉ. आंबेडकरांचे संविधान सभा तसेच ज्या विविध समितीवर त्यांची नियुक्ती झाली होती त्यातील कार्य एवढे बहुमोल आहे की, आम्ही त्यांच्या योगदानापासून वंचित राहू इच्छित नाही. ते बंगालमधून निवडून आले होते. त्या प्रांताच्या फाळणीनंतर त्यांचे संविधान सभेवरील सदस्यत्व संपुष्टात आले. संविधान सभेचे पुढील सत्र दिनांक १४ जुलै पासून सुरु होत आहे. ते त्यात सहभागी व्हावेत यासाठी मी उत्सुक आहे. म्हणून ताबडतोब त्यांची निवड करण्यात यावी " त्याप्रमाणे जुलै १९४७ ला मुंबई प्रांतातून डॉ. आंबेडकरांची संविधान सभेवर नव्याने निवड झाली.*

*त्यांची निवड किती सार्थ होती हे संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान संमत करताना केलेल्या शेवटच्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या प्रती ज्या भावना व्यक्त केल्या त्यावरुन दिसून येईल. डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणतात " या खूर्चीत बसून संविधान सभेच्या कार्याचे मी प्रत्येक दिवशी निरीक्षण करीत आलो आहे. संविधान सभेच्या मसुदा-समिती वरील सभासदांनी किती उत्साहाने,चिकाटीने,निष्ठेने कार्य पार पाडले हयाची खरी जाणीव अन्य कोणापेक्षाही मला अधिक आहे. विशेषत: त्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर*

*यांनी आपल्या प्रकृतीची क्षिती न बाळगता ते काम तडीस नेले आहे. (टाळ्या) मसुदा समितीवर आणि तिच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करण्याचा जो निर्णय आपण घेतला त्यांच्याइतका अचूक निर्णय दुसरा कोणताही घेतला नाही.त्यांनी आपल्या निवडीची यथार्थता पटवून दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी जे हे कार्य केले त्याला एक प्रकारचा तेजस्वीपणा आणला. या संदर्भात समितीच्या इतर सदस्यांमध्ये भेदभाव करणे योग्य होणार नाही. मला माहित आहे की तिच्या अध्यक्षांप्रमाणेच त्या सर्वांनी आस्थेने तसेच एकनिष्ठेने कार्य केले आहे. आणि राष्ट्राच्या धन्यवादास ते पात्र आहेत. ”*

*“ डॉ. आंबेडकरांचा त्यानंतर देश परदेशात गौरव होत राहिला. चिरंतन स्मरणात राहावे असे महत्त्वाचे राष्ट्रकार्य त्यांनी करुन दाखविले होते. आंबेडकरांनी घटनेद्वारे अस्पृश्यतेचे कायमचे उच्चाटन केले होते. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हया श्रेष्ठ मानवी मूल्याचे अधिष्ठान भारतीय जीवनात प्रस्थापित केले होते. ” हयामुळे जगातील एक थोर घटनापंडित म्हणून त्यांना किर्ती लाभली. सुप्रसिध्द राज्यशास्त्रज्ञ आणि ऑक्सफर्ड व कॅब्रिज विद्यापीठांचे माजी नामवंत प्राध्यापक अर्नेस्ट वार्कर हयांनी १९५१ साली आपला ‘ प्रिन्सिप्रल्स ऑफ सोशन अँड पोलिटिकल थिअरी ’ हा अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिध्द केला. तो त्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेस (प्रीॲम्बल) अर्पण केला आहे. ग्रंथाच्या प्रस्ताविकात ते म्हणतात, “ माझ्या प्रस्तुत ग्रंथांचे विचारसार हया उद्देश पत्रिकेत समाविलेले आहे. भारतीय जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा प्रारंभ करताना हया श्रेष्ठ मानवी मूल्याचा अंगीकार केला हयाचा मला अभिमान वाटतो.*

*भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर ह्यांच्या कर्तृत्वाचा ह्यापरता मोठा गौरव तो कोणता असणार ! ”*

*लक्ष वेधणारी अद्वितीय व्यक्ती*

*“ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण जवळ जवळ ५५ मिनिटे चालले होते. त्यावेळी घटना समितीच्या भव्य हॉलमध्ये गंभीर शांतता पसरली होती. सर्व गॅलऱ्या भरगच्च झाल्या होत्या तरी, कोणाच्या श्वासाची अगर हातापायाची हालचाल*

*देखील कळून येत नव्हती. उत्कृष्ट वुलन सुट पेहरलेल्या, दुरुन धिप्पाड दिसणाऱ्या आणि मधून मधून श्रोत्यांकडे दृष्टीक्षेप करणाऱ्या एकाच व्यक्तीकडे सर्व प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित झाले होते. आणि ती व्यक्ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत. "*

*" डॉक्टर साहेबांच्या भाषणाच्या सुरुवातीस व शेवटी जो टाळ्याचा प्रचंड कडकडाट झाला त्याचे वर्णन करणे कठीण आहे. त्यांचेवर टाळ्यांच्या रुपाने गौरवाची वृष्टीच होत होती. भाषणाच्या शेवटी तर ज्यांनी त्यांनी डॉक्टर साहेबांशी हस्तांदोलन करुन त्यांना धन्यवाद दिले. "*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले—*

*" महोदय,*

*संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ ला झाली. त्याकडे पाहता आतापर्यंत २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवसांचा कालखंड लोटलेला आहे. या कालखंडात संविधान सभेची एकूण ११ सत्रे पार पडतील. या ११ सत्रांपैकी ६ सत्रे उद्दिष्टापूर्तीचा ठराव पारित करणे आणि मुलभूत हक्क, केंद्रीय संविधान, केंद्राचे अधिकार, प्रांतिक संविधान, अल्पसंख्याक या समित्यांच्या अहवालावर आणि अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जमाती यावर विचार-विनिमय करण्यासाठी खर्ची पडली. सात,आठ,नऊ, दहा आणि अकरा ही सत्रे मसुदा संविधानाच्या विचार विनिमयार्थ उपयोगात आणली गेली. संविधान सभेच्या या अकरा सत्राचे प्रत्यक्ष कामकाजाचे १६५ दिवस होतात. त्यापैकी मसुदा संविधानाच्या विचारार्थ सभेने ११४ दिवस उपयोगात आणले.*

*संविधान सभेने २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची निवड केली. तिची पहिली बैठक ३० ऑगस्टला झाली. ३० ऑगस्ट पासून १४१ दिवस चाललेल्या कामकाजादरम्यान ती समिती संविधान मसुदा तयार करण्याच्या कामात व्यस्त होती. संविधान सल्लागारांनी मसुदा समितीकडे कामकाजासाठी आराखडा दिला तेव्हा मसुदा संविधानात २४३ अनुच्छेद आणि १३ परिशिष्टे समाविष्ट होती. मसुदा*

समितीने संविधान सभेला सादर केलेल्या पहिल्या मसुदा संविधानात ३१५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे याचा समावेश होता. विचार विनिमयाच्या शेवटच्या टप्प्यात मसुदा संविधानातील अनुच्छेदांची संख्या वाढून ३८६ झाली. तिच्या अंतीम स्वरुपात मसुदा संविधानात ३९५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टांचा समावेश आहे. मसुदा संविधानात दुरुस्ती करण्यासाठी अंदाजे ७,६३५ दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. त्यापैकी २,४७३ दुरुस्त्या सभागृहात प्रत्यक्ष विचारार्थ सादर करण्यात आल्या.

मी या वस्तुस्थितीचा उल्लेख एवढयासाठी करतो आहे की, एकावेळी असे म्हटल्या जात होते की, आपले काम पूर्ण करण्यासाठी समितीने प्रदीर्घ कालावधी घेतला आहे. ती संथपणे काम करीत आहे आणि जनतेच्या पैशाची उधळपट्टी करीत आहे.रोम जळत असताना निरो फिडल वाद्य वाजवित बसला होता अशी स्थिती असल्याचे बोलले जात होते. या आक्षेपात काही तथ्य आहे काय ? इतर देशातील संविधान सभांनी त्यांचे संविधान निर्माण करण्यासाठी किती काळ घेतला ते पाहू या. काही उदाहरणे घेऊ या. अमेरिकेच्या सभेची बैठक २५ मे १७८७ ला झाली आणि चार महिन्यात म्हणजे १७ सप्टेंबर १७८७ ला तिने आपले काम पूर्ण केले. कॅनडाच्या संविधान सभेची पहिली बैठक १० ऑक्टोबर, १८६४ ला झाली आणि मार्च १८६७ मध्ये संविधानाचे कायद्यात रुपांतर झाले यासाठी २ वर्षे ५ महिन्यांचा कालावधी लागला. ऑस्ट्रेलियाच्या संविधान निर्मितीचे कामकाज मार्च १८९१ ला सुरु झाले आणि ९ जुलै १९०० ला कायदयाचे रुप प्राप्त झाले त्यासाठी त्यांना ९ वर्षे लागली. दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मितीच्या कार्याला ऑक्टोबर १९०८ मध्ये सुरुवात झाली. आणि २० सप्टेंबर १९०९ रोजी संविधानाची परिणती कायद्यात झाली. एक वर्षाच्या परिश्रमात हे घडून आले आहे. हे खरे आहे की, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या सभेने घेतलेल्या कालावधीपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला. परंतु कॅनडाच्या संविधान सभेपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला नाही आणि ऑस्ट्रेलियाच्या सभेपेक्षा खूपच कमी वेळ घेतला आहे. कोणी किती वेळ घेतला याची तुलना करताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांची संविधाने आपल्यापेक्षा फारच लहान आहेत. मी सांगितल्याप्रमाणे, आपल्या संविधानात ३९५ परिच्छेद

आहेत तर अमेरिकन संविधानात केवळ ७ आहेत. त्यातील पहिल्या चार अनुच्छेदांची विभागणी २१ उपविभागात झाली आहे. कॅनडाच्या संविधानात १४७, ऑस्ट्रेलियाच्या संविधानात १२८ आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधानात १५३ अनुच्छेद आहेत. दुसरी लक्षात ठेवण्यासारखी बाब अशी की, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मात्यांना संविधान दुरुस्तीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागले नाही. सादर करण्यात आलेल्या स्वरुपातच त्या संमत झाल्या. दुसरीकडे आपल्या संविधान सभेला २,४७३ दुरुस्त्यांचा विचार करावा लागला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता दिरंगाईचा आरोप मला बराचसा निराधार वाटतो आणि इतके कठीण काम इतक्या अल्पावधीत यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल या सभेने स्वत:चे अभिनंदन केल्यास काही वावगे होणार नाही.

मसुदा समितीने केलेल्या कामाच्या दर्जाकडे पाहाताना श्री. नाझीरुद्दीन अहमद यांना ती पूर्णतया नाकारणे हे आपले कर्तव्य आहे असे वाटते. त्यांच्या मते मसुदा समितीने केलेले कार्य हे केवळ नाकारण्यायोग्यच आहे असे नव्हे तर ते निश्चितपणे त्याहीपेक्षा खालच्या दर्जाचे आहे. मसुदा समितीने केलेल्या कार्याबद्दल स्वत:चे मत व्यक्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे आणि श्री.नाझीरुद्दीन यांनाही आहे. मसुदा समितीच्या कोणत्याही सभासदापेक्षा आपण अधिक बुध्दिमान आहोत असे श्री.नाझीरुद्दीन अहमद यांना वाटते. मसुदा समिती त्यांच्या या दाव्याला आव्हान करु इच्छित नाही. याउलट संविधान सभेला ते मसुदा समितीवर नियुक्त करण्याच्या योग्यतेच आहेत असे वाटले असते तर आपल्यात त्यांचे स्वागत करण्यात मसुदा समितीला आनंदच वाटला असता. संविधान निर्मितीच्या योगदानात जर त्यांना काही स्थान मिळाले नाही तर तो निश्चितपणे मसुदा समितीचा दोष नाही.

मसुदा समितीवरील स्वत:चा रोष व्यक्त करण्यासाठी नाझीरुद्दीन अहमद यांनी तिला नवीन नाव दिले आहे. ते मसुदा समितीला भरकटणारी समिती असे म्हणतात. हा टोमणा दिल्याबद्दल नाझीरुद्दीन यांना निश्चितच आनंद होत असेल यात शंका नाही. परंतु त्यांना याची स्पष्ट जाणीव दिसत नाही की अनियंत्रितपणे वाहत जाणे आणि वाहताना नियंत्रण ठेवणे यात फरक आहे. परिस्थितीवर

*नियंत्रण असल्याशिवाय मसुदा समिती कधीही वाहत गेली नाही. मासा गळाला लागणार नाही अशा ठिकाणी केवळ ती गळ टाकून बसली नव्हती. जो मासा तिला पकडायचा होता, तो ज्या ठिकाणी मिळेल, अशाच ठिकाणी ती पाण्यात गळ टाकून बसली होती. अधिक चांगले शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वाहवत जाणे नव्हे. हे करण्यामागे मसुदा समितीचे अभिनंदन करण्याचा नाझीरुद्दीन अहमद यांचा उद्देश नसला तरी, त्यांनी मसुदा समितीचे अभिनंदन केले आहे असेच मी समजतो. मसुदा समितीने दोषपूर्ण वाटणाऱ्या दुरुस्त्या बाजूला सारुन त्याऐवजी तिला योग्य वाटणाऱ्या दुरुस्त्या स्वीकारण्याचा प्रामाणिकपणा आणि धैर्य जर दाखविले नसते तर ती आल्या कर्तव्यापासून ढळली व प्रतिष्ठेच्या खोट्या समाजाला बळी पडली म्हणून ती दोषी ठरली असती. ही जर चूक असेल तर अशा चुका नि:संकोचपणे मान्य करुन त्या दुरुस्त करण्यासाठी मसुदा समितीने पुढाकार घेतला याचा मला आनंद आहे.*

*एकमेव सदस्याचा अपवाद वगळता संविधान सभेच्या सदस्यांनी मसुदा समितीने केलेल्या कार्याचा गौरवच केला याचा मला आनंद वाटतो. मसुदा समितीने घेतलेल्या परिश्रमाला उस्फूर्तपणे स्वीकारुन त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केल्यामुळे मसुदा समितीला आनंद होईल याची मला खात्री आहे. संविधान सभेचे सदस्य आणि मसुदा समितीचे माझे सहकारी यांनी माझ्यावर जो अभिनंदनाचा वर्षाव केला त्यामूळे मी इतका सद्गदित झालो आहे की त्याच्या प्रति माझी कृतज्ञता पूर्णत: व्यक्त करण्यासाठी माझ्याजवळ पुरेसे योग्य शब्द नाहीत. संविधान सभेत येताना अनुसूचित जातींच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यापलिकडे माझी दुसरी मोठी आकांक्षा नव्हती. यापेक्षा अधिक जबाबदारीचे कार्य करण्यासाठी मला आमंत्रित करण्यात येईल याची पुसटशी सुध्दा कल्पना मला नव्हती. सभेने मसुदा समितीवर माझी निवड केली तेव्हा माला फार आश्चर्य वाटले. मसुदा समितीने तिच्या अध्यक्षपदी माझी निवड केली तेव्हा तर माझ्या आश्चर्याला पारावर उरला नाही. मसुदा समितीत माझे मित्र सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्यासारखी माझ्यापेक्षा अधिक मोठी चांगली आणि अधिक योग्य माणसे होती. माझ्यावर इतका*

*विश्वास व्यक्त करुन आणि जबाबदारी सोपवून त्यांनी माझी निवड केली आणि देशाची सेवा करण्याची मला संधी दिली यासाठी मी संविधान सभा आणि मसुदा समितीच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो. (हर्षध्वनी)*

*मला देण्यात आलेल श्रेय केवळ माझे नाही. संविधान सभेच घटनात्मक सल्लागार सर बी.एन. राव ज्यांनी मसुदा समितीच्या विचारार्थ संविधानाचा कच्चा मसुदा तयार केला, त्यांचाही यात अंशत: वाटा आहे. श्रेयाचा काही वाटा मसुदा समितीच्या सदस्यांचाही आहे. मी सांगितल्याप्रमाणे ही समिती १४१ दिवस कार्यरत होती आणि तिची, नवीन सूत्रे शोधून काढण्याची कल्पकता आणि विचाराच्या विविध मुद्यांना सामवून घेण्याच्या सहनशक्तीशिवाय संविधान निर्मीतीचे हे अवघड कार्य यशस्वीरित्या पूर्णत्वास गेले नसते. श्रेयाचा मोठा वाटा संविधानाचा आराखडा तयार करणारे प्रमुख श्री. एस. एन. मुखर्जी यांच्याकडेही जातो. गुंतागुंतीच्या प्रस्तावांना सर्वात सोप्या आणि स्पष्ट कायदेशीर स्वरुपात परिवर्तित करण्याची तसेच कठोर परिश्रम घेण्याची त्यांची क्षमता कदाचितच कुणात आढळेल. समितीला लाभलेली ती एक ठेव आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय संविधानाच्या पूर्णत्वासाठी सभेला आणखी बरीच वर्षे लागली असती. श्री.मुखर्जी यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा उल्लेख करणे मला टाळताच येणार नाही. किती कठीण काम त्यांनी केले आहे. किती कठोर परिश्रम त्यांनी घेतले आहेत. कधीकधी मध्यरात्रीपर्यंत ते राबले आहेत याची मला जाणीव आहे. त्याचे प्रयत्न आणि त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचे आभार मानतो. (हर्षध्वनी)*

*संविधान सभा जर विविध घटकांचा विस्कळीत समुदाय राहिली असती तर सिमेंटचा उपयोग न करता तयार केलेला रस्ता, जिथे इकडे काळा दगड तर तिकडे पांढरा दगड याप्रमाणे प्रत्येक सदस्य आणि प्रत्येक गट हा स्वत:तच एक कायदा असता. तर अशा स्थितीत मसुदा समितीला तिचे काम करणे फार अवघड झाले असते. गोंधळाशिवाय त्या ठिकाणी काहीच दिसले नसते. समितीतील कॉंग्रेस पक्षाच्या या शिस्तीमुळेच मसुदा समितीला संविधानातील प्रत्येक अनुच्छेद आणि प्रत्येक दुरुस्तीच्या भवितव्याची खात्री असल्यामुळे, संविधान सादर करणे*

*सुकर झाले. त्यामुळे मसुदा संविधान सभेमध्ये सुगमरित्या पारित होण्याचे श्रेय कॉंग्रेस पक्षाला सुध्दा द्यावे लागेल.*

*जर सर्व सदस्यांनी पक्ष शिस्तिला घट्ट बांधून घेतले असते तर संविधान सभेचे कामकाज खूपच निरस झाले असते. पक्ष शिस्तिच्या ताठरतेमुळे या सभेच रुपांतर होय बा च्या समुहात झाले असते. सुदैवाने त्यात बंडखोरही होते. त्यात श्री.कामत डॉ.पी.एस.देशमुख, श्री.सिधवा. प्रा.सक्सेना आणि पं.ठाकुरदास भार्गव यांचा समावेश होता. त्यांच्या सोबतच प्रा.के.टी.शाह आणि पं.हृदयनाथ कुंझरु यांचा उल्लेख मी केलाच पाहिजे. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे बहुधा सैध्दांतिक होते. मी त्यांच्या सूचनांचा स्वीकार करु शकलो नाही याचा अर्थ त्यांच्या सुचनांचे मूल्य कमी होते. समितीच्या कामकाजात जिवंतपणा आणण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे महत्त्व कमी होते. असे नाही. मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्याशिवाय संविधानाच्या मूलभूत तत्वांच्या स्पष्टीकरणाची संधी मला मिळाली नसती. जी संविधान पारित करण्याच्या तांत्रिक बाबीपेक्षा आधिक महत्त्वाची आहे.*

*आणि शेवटी अध्यक्ष महोदय, या सभेचे कामकाज ज्या पध्दतीने आपण हाताळले त्यासाठी मी आपले आभार मानायलाच हवे. या सभेच्या कामकाजात ज्या सदस्यांनी भाग घेतला. त्यांना आपण जी आपुलकीची आणि सन्मानाची वागणूक दिली ती कधीही विसरता येणार नाही. मसुदा समितीने आणलेल्या काही दुरुस्त्या केवळ तांत्रिक स्वरुप असण्याच्या आधारावर काही प्रसंगी नाकारण्याचा प्रयत्न झाला. ते क्षण माझ्यासाठी फारच चिंताजनक होते. संविधान निर्मितीच्या कार्याला पराभूत करण्याच्या उद्देशाने पुढे आणलेल्या कायद्याच्या ताठरपणाला आपण परवानगी दिली नाही. यासाठी विशेषत्वाने मी आपला आभारी आहे.*

*संविधानाचे जेवढे समर्थन करता येणे शक्य होते तेवढे माझे मित्र सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर आणि श्री.टी.टी.कृष्णमाचारी अय्यर यांनी केले आहे. त्यामुळे संविधानाच्या गुणवत्तेविषयीच्या चर्चेत मी शिरु इच्छित नाही. कारण माझ्या मते, संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही.*

*तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णत: संविधानाच्या स्वरुपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग जसे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका निर्माण करुन देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वत:च्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते संवैधानिक मार्गाचा अवलंब करतील की क्रांतीकारी मार्गाचा अवलंब करतील? त्यांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केल्यास संविधान कितीही चांगले असो ते अयशस्वी होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज नाही. आणि म्हणून भारतीय लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे जाणून घेतल्याशिवाय संविधानाबाबत कोणताही निर्णय घेणे निरर्थक ठरेल.*

*साम्यवादी पक्ष आणि समाजवादी पक्ष या दोन घटकांकडून संविधानावर मोठया प्रमाणात नापसंती व्यक्त करण्यात येत आहे. ते संविधानाच्या प्रती नापसंती का व्यक्त करतात? खरोखर संविधान वाईट आहे म्हणून ते नापसंती व्यक्त करतात काय? निश्चितपणे नाही असे मी म्हणतो. साम्यवादी पक्षाला कामगारांच्या हुकुमशाही तत्त्वांवर आधारलेले संविधान हवे आहे. हे संविधान सांसदीय लोकशाहीवर आधारित असल्यामुळे ते संविधानाचा निषेध करतात. समाजवाद्यांना दोन गोष्टी हव्या आहेत. पहिली गोष्ट त्यांना हवी आहे ती अशी की, ते जर सत्तारुढ झाले तर मोबदला न देता खाजगी संपत्तीचे राष्ट्रीयीकरण किंवा सामाजीकरण करण्याचे संविधानाने त्यांना स्वातंत्र्य दिलेच पाहिजे. समाजवाद्यांना पाहिजे असलेली दुसरी गोष्ट अशी की, संविधानातील मुलभूत अधिकार निरपेक्ष आणि कोणत्याही निर्बंधाशिवाय असावे जेणेकरुन त्यांच्या पक्षाला सत्ता प्राप्त करण्यात अपयश आले तर, केवळ अनिर्बंध टीका करण्याचेच नव्हे तर राज्य उलथून पाडण्याचेही स्वातंत्र्य त्यांना हवे आहेत.*

*प्रामुख्याने या दोन कारणांमुळे संविधानावर टीका करण्यात येत आहे. संसदीय लोकशाहीच तत्त्व हाच केवळ राजकीय लोकशाहीच आदर्श प्रकार आहे असे मी मानत नाही. मोबदला न देता खाजगी संपत्ती ताब्यात घेण्याचे तत्त्व इतके पवित्र आहे. की त्यापासून फारकतच घेता येत नाही असे मी म्हणत नाही. मुलभूत अधिकार हे कधीही अनिर्बध असू शकत नाही आणि त्यावर घातलेले निर्बध केव्हाही उठविता येत नाही. असेही मी म्हणत नाही. मला सांगायचे ते हे की, संविधानातील अंतर्भुत मते ही आजच्या पिढीची आहेत किंवा प्रस्तुत विधान जर तुम्हाला अतिशयोक्तीपूर्ण वाटत असेल तर मी म्हणेन की संविधान सभेच्या सभासदाची ती मते आहेत. संविधानात त्यांच्या अंतर्भाव केल्याबद्दल मसुदा समितीला दोष का देण्यात यावा? मी म्हणतो की संविधान सभेच्या सभासदांवर सुध्दा हे दोषारोपण का करण्यात यावे? अमेरिकेच्या संविधान निर्मिती प्रक्रियेत अतिशय महत्त्वाची भुमिका बजावणारा अमेरिकेतील मुत्सद्दी जेफरसन, यांनी काही भारदस्त, अतिमहत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. जे संविधान निर्मात्यांना कधीही नजरेआड करणे परवडण्यासारखे नाही. एके ठिकाणी त्यांने म्हटले आहे, ते असे की :*

*" प्रत्येक पिढी, बहुसंख्यांकाच्या इच्छेप्रमाणे स्वता:ला बांधून घेण्याचा अधिकार असलेल्या एका स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे आहे. येणाऱ्या पिढीला कोणी बंदिस्त करु शकत नाही, जसे दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना करता येत नाही. "*

*दुसऱ्या एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे. ते असे की :*

*" देशहितासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांना स्पर्श करता येणार नाही किंवा त्यात फेरबदल करता येणार नाही. त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांना उत्तरदायी धरता येणार नाही कारण लोकांच्या हिताची जबाबदारी विश्वस्तपणे ज्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी त्यांना काही अधिकार बहाल करण्यात आले आहेत. कदाचित सत्तेचा दुरुपयोग करणारा राज्यशाहीविरुध्द हे परिणामकारक प्रावधान असू शकेल परंतु ही कल्पना राष्ट्राच्या दृष्टीने मात्र अतिशय असंमजसपणाची आहे. तरी आपले कायदेपंडीत आणि धर्मगुरु हे तत्त्व सामान्यतया बिंबविण्याचा*

*प्रयत्न करतात आणि समजतात की, आपली मागची पिढी आपल्यापेक्षा अधिक मुक्तपणे भूतलावर वावरत होती. आपल्याला बदल करता येणार नाही असे अपरिवर्तनीय कायदे लादण्याचा तिला अधिकार होता. त्याचप्रमाणे भावी पिढीला बदलविता येणार नाही असे कायदे आपण केले आणि ते भावी पिढीवर लादले तर वास्तवात हे जग मेलेल्यांचे असेल. जिवंत लोकांचे असणार नाही. ''*

*जेफरसनने जे सांगितले आहे, ते केवळ सत्यच नाही तर ते निखळ सत्य आहे, हे मी मान्य करतो. त्याबद्दल दुमत होऊ शकत नाही. जेफरसनने सांगितलेल्या तत्त्वाकडे संविधान सभेने पाठ फिरविली असती तर तिच्यावर निश्चित पणे दोषारोपण करता आले असते, निषेधसुध्दा करता आला असता. परंतु मी विचारतो, असे आहे का ? वस्तुस्थिती याउलट आहे. एखाद्याने केवळ संविधान दुरुस्ती प्रावधानाचाच पडताळा घ्यावा. कॅनडाच्या संविधानात दुरुस्ती करण्याचा लोकांचा अधिकार जसा नाकारला गेला आहे तसे संविधान सभेने आपल्या संविधानात अंतिमतेचे आणि बिनचुकतेच शिक्कामोर्तब केलेले नाही किंवा अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाप्रमाणे घटना दुरुस्ती असाधारण शर्ती आणि अटींच्या पूर्ततेवर अवलंबून ठेवला नाही. याउलट संविधानदुरुस्तीसाठी आपल्या संविधान सभेने अतीशय सुलभ पध्दतीची तरतूद केली आहे. संविधानावर टिका करणाऱ्या कोणत्याही टिकाकारला मी असे आव्हान देते की, आपल्यासारखी अवस्था असणाऱ्या, जगातील कोणत्याही देशाच्या संविधान सभेने दुरुस्तीसाठी असे प्रावधान केल्याचे सिध्द करावे. संविधानाप्रति असंतुष्ट असणाऱ्यांना केवळ २/३ बहुमत प्राप्त करावे लागेल आणि प्रौढ मतदान पध्दतीने निवडलेल्या संसदेत त्यांच्या बाजूने २/३ बहुमतही ते प्राप्त करु शकत नसतील तर संविधानावरील त्यांचा असंतोष हा सर्वसाधारण जनतेचा असंतोष आहे असे मानता येणार नाही.*

*संविधानाशी संबंधित अशा एका महत्वपूर्ण मुद्याच्या संदर्भात मी आता बोलू इच्छितो सत्तेचे वाजवीपेक्षा जास्त केंद्रीकरण करण्यात आले असून प्रांतांना नगरपरिषदांच्या पातळीवर आणले आहे अशी एक गंभीर तक्रार करण्यात येते. हे स्पष्ट आहे की, हा दृष्टिकोन केवळ अतिशयोक्तीपूर्णच आहे असे नव्हे तर*

*संविधानाला नेमके काय घडवून आणायचे आहे याबाबतच्या गैरसमजावर तो आधारलेला आहे. केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध लक्षात घेण्यासाठी ज्या मूलभूत तत्वांवर ते आधारित असतात ते लक्षात घेणे आवश्यक आहे. संघराज्यतत्वाचे मूलभूत तत्व असे आहे की, विधीमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या सत्तेची केंद्र आणि राज्यातील विभागणी ही केन्द्राच्या कोणत्या कायद्यानी करावयाची नसून ती संविधानानेच केलेली असते. संविधान हेच करीत असते. आपल्या संविधानांतर्गत केलेली असते. संविधान हेच करीत असते. आपल्या संविधानांतर्गत असणारी राज्य त्यांच्या विधिविषयक किंवा कार्यकारी अधिकारांसाठी कोणत्याही प्रकारे केंद्रावर अवलंबून नाहीत. या संदर्भात केंद्र आणि राज्ये समान पातळीवर आहेत. अशा संविधानाला केंद्रीभूत म्हणण्यात यावे हे समजणे अवघड आहे. असे असू शकेल की, दुसऱ्या कोणत्याही संघराज्य संविधानात आढळणार नाही इतके, विधीमंडळ आणि कार्यकारी मंडळाचे व्यापक क्षेत्र, संविधानाने केन्द्राला दिलेले आहे. असेही शक्य असू शकेल की, शेषाधिकार राज्यांना न देता केंद्राला देण्यात आले आहेत. परंतु ही वैशिष्ट्ये म्हणजे संघराज्याची मूलतत्वे नव्हेत. मी सांगितल्याप्रमाणे संघराज्याची प्रमुख ओळख म्हणजे केंद्र आणि घटकांमध्ये विधीमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या सत्तेची संविधानाने केलेली विभागणी होय. हे तत्व आपल्या संविधानात अंतर्भूत आहे. याबाबत कोणतीही चूक असू शकत नाही. म्हणून राज्यांना केंद्राच्या अधिकारात ठेवण्यात आले आहे, असे म्हणणे चुकीचे होईल. या विभागणीची सीमा केंद्राला स्वत:च्या इच्छेने बदलविता येणार नाही. न्यायपलिकेला सुध्दा नाही. यासंदर्भात असे योग्यच म्हटले गेले आहे की,*

*“ न्यायालयांना सुधारणा करता येईल. पण एकाच्या जागी दुसरे आणता येणार नाही. जुन्या अन्वयार्थात सुधारणा घडवून नवीन युक्तिवाद ते करू शकतील. नवीन दृष्टिकोन पुढे ठेवता येतील. अल्पमताच्या फरकाने दिलेले निर्णय ते बदलवू शकतात परंतु त्यांना पार करता येणार नाहीत. अशा सीमारेषा आहेत. अधिकाराच्या निश्चित वाटपात ते नव्याने फेरबदल करू शकत नाहीत. अस्तित्वात असलेल्या अधिकाराची व्याप्ती ते वाढवू शकतील, परंतु एका सत्तेला दिलेला अधिकार नि:संशयपणे दुसऱ्याला देता येणार नाही. ”*

*संघीय पध्दतीला पराभूत करणारा केंद्रीकरणाचा हा पहिला आरोप निश्चितच निष्प्रभ ठरतो.*

*दुसरा आरोप असा की, राज्यावर कुरघोडी करण्याचा केन्द्राला अधिकार देण्यात आला आहे. हा आरोप मान्य केलाच पाहिजे. परंतु अशा कुरघोडी करण्याच्या अधिकारांच्या तरतुदी असल्यामुळे संविधानाचा निषेध करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात घेतल्याच पाहिजे. त्यापैकी पहिली गोष्ट अशी की, कुरघोडी करण्याचे अधिकार संविधानाच्या सर्वसाधारण वैशिष्ट्यांचा भाग नाहीत. त्यांचा उपयोग आणि अमल नि:संदिग्धपणे आणीबाणीच्या काळापुरताच सीमित ठेवला आहे. दुसरी विचारात घेण्याची बाब अशी की, आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर कुरघोडी करण्याचे अधिकार केंद्राला देण्याचे आपण टाळू शकतो का? आणीबाणीच्या काळातसुध्दा असे कुरघोडीचे अधिकार केन्द्राला असण्याचे समर्थन ज्यांना मान्य नाही. त्यांना या विषयाच्या मुळाशी असलेल्या समस्येची स्पष्ट कल्पना दिसत नाही. " द राऊंड टेबल " या प्रसिध्द मासिकाच्या डिसेंबर १९३५ च्या अंकात ही समस्या एका लेखकाने इतक्या स्पष्टपणे विशद केली आहे की त्यातील काही भाग उद्‌घृत करण्यासाठी मला दिलगिरी व्यक्त करण्याची गरज वाटत नाही. लेखक म्हणतो :*

*" राजकीय व्यवस्था या अधिकार आणि कर्तव्ये यांच्यातील गुंतागुंत असून, जी अंतिमत: नागरिकांनी कुणाच्या किंवा कोणत्या सत्तेच्या प्रति आपली निष्ठा व्यक्त करावी, या प्रश्नाशी निगडित असते. सामान्य परिस्थितीत हा प्रश्न निर्माण होत नाही. कायदा सुरळीतपणे अंमलात येत असतो. एका क्षेत्रात एका सत्तेचा तर दुसऱ्या क्षेत्रात दुसऱ्या सत्तेचा आदेश मानून माणूस आपले व्यवहार करीत असतो. परंतु संकटसमयी कुणाचा आदेश मानायचा याबाबत संघर्ष निर्माण होऊ शकतो आणि अशा प्रसंगी मात्र अंतिम निष्ठेचे विभाजन होऊ देता कामा नये हे स्पष्ट आहे. निष्ठेसंबंधीचा निर्णय हा अंतिमत: कायद्याच्या न्यायालयीन अन्वयार्थावर घेता येवू शकणार नाही. कायदा हा वस्तुस्थितीशी सुसंगत असायलाच हवा अन्यथा तो अगदीच निष्प्रभ ठरेल. जेव्हा सर्व शिष्टाचार बाजूला ठेवले जातात.*

*त्यावेळी उघड प्रश्न असा की नागरिकांच्या शेष निष्ठेवर कुणाची सत्ता असावी, केद्राची की घटकराज्यांची ? ”*

*या समस्येवरील उपाय या प्रश्नाचे उत्तर कोण कसे देतो यावर अवलंबून असून तोच खरा प्रश्न आहे. आणीबाणीच्या प्रसंगी नागरिकांची शेष निष्ठा ही घटक राज्यांसोबत न राहता केंद्रासोबत असावी. बहुसंख्य लोक या मताचे असतात याबद्दल शंका असू नये. कारण सामाईक उद्दिष्टपुर्तीसाठी आणि देशाच्या एकूणच हितसंबधांच्या जपणुकीसाठी केंद्र सरकारच कार्यरत असते. यासाठीच आणीबाणीच्या काळत केन्द्राला जादा अधिकार देण्याचे समर्थन निहित आहे. आणि सरतेशेवटी आणीबाणीचे अधिकार केंद्राला देण्यामागे राज्यांवर कोणते उत्तरदायित्व येते? एवढेच की, आणीबाणीच्या काळात स्वत:चे स्थानिक हितसंबंध जोपासण्यासोबतच, राज्यांनी एकूण राष्ट्राचे मत आणि हितसंबंध विचारात घ्यावे. ही समस्या ज्यांना नीटपणे कळलेली नाही तेच याविरूध्द तक्रार करतील.*

*याठिकाणी मी माझे भाषण संपविले असते, परंतु माझे मन देशाच्या भवितव्याबाबत इतके चिंताग्रस्त आहे की, त्यासंबंधातील माझी मते व्यक्त करण्यासाठी या प्रसंगाचा मी उपयोग करावा असे मला वाटते. २६ जानेवारी, १९५० ला भारत एक स्वतंत्र राष्ट्र होईल. (हर्षोल्लास) त्याच्या स्वातंत्र्याचे काय होईल? तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेविल की पुन्हा गमावून बसेल? हा विचार माझ्या मनात प्रथम उभा राहतो. असे नाही की भारत हा यापूर्वी कधीही स्वतंत्र नव्हता. मुद्दा हा आहे की त्याने असलेले स्वातंत्र्य एकदा गमावले आहे. तो पुन्हा दुसऱ्यांदा ते गमाविल का? भवितव्याबाबतचा हाच विचार मला सर्वाधिक चिंताग्रस्त करतो. भूतकाळात भारताने केवळ आपले स्वातंत्र्य गमावले असे नव्हे तर ते देशातील काही लोकांच्या बेईमानी आणि विश्वासघातामुळे गमावले गेले ही वास्तविकता मला अधिक अस्वस्थ करते. महम्मद बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले त्यावेळी दहार राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी महम्मद बीन कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजुने कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजुने लढण्याचे नाकारले. महम्मद घोरीला भारतावर*

*आक्रमण करण्याचे निमंत्रण देणारा जयचंद होता. आणि त्याने त्याला पृथ्वीराज विरूध्द लढण्यासाठी स्वत:च्या आणि सोळंकी राजांच्या मदतीचे आश्वासन दिले. जेव्हा शिवाजी हिंदुंच्या मुक्तीसाठी लढत होता त्यावेळी इतर मराठा, सरदार आणि रजपूत राजे मोगल सम्राटांच्या बाजुने युध्द लढत होते. जेव्हा शीख राज्यकर्त्यांचा नि:पात करण्याचा प्रयत्न इंग्रज करीत होते तेव्हा त्यांच्या प्रमुख सेनापती गुलाबसिंग शांत बसला आणि शिखांचे राज्य वाचविण्यासाठी त्याने शिखांना मदत केली नाही. १८५७ ला भारतातील बहुतांश भागांनी इंग्रजांच्या विरूध्द स्वातंत्र्ययुध्दाची घोषणा केली. तेव्हा शीख बघ्याच्या भूमिकेतून त्या घटनेकडे पाहात राहिले.*

*इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे. जातींच्या आणि संप्रदायांच्या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रुंसोबतच भिन्न आणि परस्पराविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. ह्या वास्तवाच्या जाणीवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्वप्रणालीला मोठे मानतील? मला माहित नाही. पंरतु एवढे मात्र निश्चित की जर पक्षांनी स्वत:च्या तत्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले. तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवार राहणार नाही आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. या संभाव्यतेविरूध्द लढण्यासाठी आपण कटिबध्द व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे. (हर्षध्वनी)*

*२६ जानेवारी, १९५० ला भारत एक लोकसत्ताक देश होईल तो या अर्थाने की, भारतात त्या दिवसापासून लोकांचे, लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार प्राप्त होईल. तोच विचार माझ्या मनात येतो, ह्या लोकसत्ताक संविधानाचे काय होणार? हा देश ते अबाधित ठेवण्यासाठी समर्थ राहील की पुन्हा तो ते गमावून बसेल. माझ्या मनात येणारा हा दुसरा विचार आहे. आणि पहिल्याप्रमाणेच तो मला चिंतातूर करणारा आहे.*

*भारताला लोकशाही म्हणजे काय हे माहित नव्हते असे नाही. एक काळ असा होता की, भारत हा गणराज्यांनी भरगच्च होता आणि जिथे कुठे राजेशाही असेलच तर ती एकतर निवडलेली किंवा सीमित असायची. त्या प्रणाली कधीही अनिर्बंध नव्हत्या. भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असे नाही. बौध्द भिक्खू संघाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, त्यावेळी केवळ संसदच होती असे नव्हे संघ हे दुसरे काही नसून संसदच होते- तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या सांसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहीत होते आणि त्यांचे ते पालन करीत होते. बसण्याच्या व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेव्दारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादिबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुध्दाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधीमंडळाच्या नियमावधीतूनच त्यांनी ते स्वीकारले असले पाहिजेत.*

*ही लोकसत्ताक पध्दती भारताने गमावली. पुन्हा दुसऱ्यांदा तो ती गमावणार काय? मला माहित नाही. परंतु भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की- लोकशाही प्रदीर्घकाळापर्यंत उपयोगात नसल्यामुळे ती अगदीच नवीन भासण्याची शक्यता आहे- जिथे लोकशाही हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरूप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरूप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देईल. जर प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे.*

*केवळ बाह्य स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक*

*उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपुर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गाचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल.*

*दुसरी महत्वाची गोष्ट जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते “ लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्यांच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्यांच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणे करून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील. ” संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरूषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओ कॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, “ कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही. कोणतीही स्त्री स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही. ” इतर देशांच्या तुलनेत भारताला हा सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर*

*कोणत्याही देशाच्या राजकारणात दिसणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्त किंवा व्यक्तीपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.*

*तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी की, केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुध्दा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे. जो स्वातंत्र्य समता आणि बंधुता यांना जीवनतत्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य समता आणि बंधुता ह्या तत्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. तो त्रयीचा एक संघ निर्माण करतात. ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही, समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय. स्वातंत्र्यशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरित्या अस्तित्वात राहाणार नाहीत. त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलीस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णत: अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करूनच आपण सुरूवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्राला आपला भारतीय समाज हा श्रेणीबध्द विषमतेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निकृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी, १९५०*

ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील. परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मुल्य या तत्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्व आपण नाकारित राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो. तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्वाचे तत्व मान्य करणे ही होय. बंधुत्व म्हणजे काय? जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करून देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे. ती किती कठीण आहे. हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याचया अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांकितलेल्या गोष्टीवरून कळून येईल.

ब्राईसच्याच शब्दात मी उद्घृत करू इच्छितो. ती घटना अशी-

" काही वर्षापूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रेवार्षिक अधिवेशनात त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करून त्यात सर्व लोकांसाठी असलेल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यु इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले, हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशिर्वाद दे उत्स्फुर्तपणे ते त्या दिवशी मान्य करण्यात आले. यावाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला धर्मपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी ' राष्ट्र ' या शब्दावर आक्षेप घेतले,

*त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्टाचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे तो शब्द गाळण्यात आल आणि 'हे प्रभो. या संयुक्त राज्यांना आशिर्वाद दे या शब्दांचा स्वीकार करण्यात आला.*

*ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना ' भारतीय लोक ' या शब्दाची चीड येत असे. ' भारतीय राष्ट्र ' म्हणणे ते पसंत करीत असत. मी या मताचा आहे की, आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल, त्यानंतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचे महत्व आम्हाला कळेल आणि आमच्या उद्दिष्टपूवर्तीसाठी कोणत्या मार्गाचा आणि उपायांचा अवलंब करावा याचा आम्ही गांर्भ्याने विचार करू शकू या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशिय कठीण आहे अमेरिकेतील लोकांना जेवढे कठीण होते त्याहीपेक्षा कितीतरी पटीने कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट, त्या समाजजीवनात विभागणी करतात त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती-जातींमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहवयास मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वतंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरासारखा केवळ बाह्य देखवा असेल.*

*आपल्यासमोर असलेल्या अवघड, जिकिरीच्या कामाबद्दल माझ्या या प्रतिक्रिया आहेत. काहींना त्या कदाचित फार आनंददायी वाटणार नाहीत. या देशात*

*राजकीय सत्ता ही मुठभर लोकांची मक्तेदारी राहिली आहे आणि बहुतांश लोक केवळ ओझे वाहणारे प्राणीच नव्हे तर भक्ष्यस्थानी असलेले प्राणी झाले आहेत. हे कोणालाही नाकारता येणार नाही. या मक्तेदारीने त्यांना केवळ विकासाच्या संधीपासूनच वंचित ठेवले असे नव्हे तर मानवी जीवनाचे महत्वही कळणार नाही इतका त्यांचा नि.पात केला आहे. हे पददलित वर्ग त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. स्वतऱ्च राज्य करण्यासाठी ते आतूर झाले आहेत. पददलित समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा वर्गसंघर्ष आणि वर्गयुध्द होण्याइतपत वाढू देता कामा नये. त्याचा परिणाम घर दुभंगण्यात होईल. तो निश्चितपणे विनाशकारी दिवस असेल अब्राहम लिंकन यांनी समर्पकरित्या म्हटल्याप्रमाणे, दुभंगलेले घर अधिक काळपर्यंत टिकू शकत नाही. त्यांच्या आकाक्षाच्या पूर्तीसाठी जेवढ्या लवकर त्यांना संधी उपलब्ध करून देता येईल तेवढे ते मूठभरांच्या हिताचे, देशाच्या हिताचे. त्यांच्या स्वतंत्र्याच्या रक्षणार्थ आणि त्याच्या लोकसत्ताक संरचना टिकून राहण्यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात समता आणि बुंधुत्व प्रस्थापित करण्यानेच हे शक्य होणार आहे. त्यामुळेच त्यांच्यावर मी इतका भर दिला आहे.*

*मी सभागृहाला अधिक थकवू इच्छित नाही. स्वातंत्र्य ही आनदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले तर त्यासाठी आपल्याशिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळवेगाने बदलतो आहे. आपले लोक सुध्दा नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत. लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येवू लागला आहे. आत त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे. आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे लोकांकरिता निवडलेले शासन या तत्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे*

*असेल तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पहिजेत की जेणेकरून लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधन्य देण्याकडे वळतील. यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बल ठरता कामा नये देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही. "*

*(संदर्भ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-३, १९४६ ते १९५६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, सन २००२.)*

* * * * *

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक**, भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेस आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत.